# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACIAR OR NEWS OF BERAR.

VOL. V. AKOLA: SATURDAY EVENING JANUARY 8 1870 NO. 2

पुस्तक ५. अकोला, शनिवार [illegible] जानुआरी सन १८७० [illegible] अंक २

कायद्यासंबंधी नवीन [illegible] पुस्तक

## वऱ्हाडरिपो[illegible]

अकोलें एथें [illegible] कमिटी होऊन विच्यार ठरला आहे [illegible] ल कामदार, अकोले वगैरे लोकांच्या उप योगाकारितां कायदा कानूसंबंधी व सरकारी कामकाज आणि कामदार यां संबंधी माहितीचें दर [illegible] एक स्वतंत्र पुस्तक काढित जा[illegible] वऱ्हाडरिपोर्टर असें त्यास नाव [illegible] त्याप्रमाणें सर्व सिद्धता करून हल्लीं या जाहिरातीवरून सर्वांस कळविण्यांत येतें कीं, सन १८७०इसवीचे जानुआरी महिन्यापासून हें पुस्तक निघेल, व प्रतिमहिन्याचे अखेर तारखेस वांटलें जाईल. हें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत [illegible] [illegible]

[illegible]

तां याचे अशा सोई करितां त्यावर पृष्ठांक वेगवेगळे घातले जातील.

या पुस्तकांतील मोठ्या महत्वाचें जें पहिलें प्रकरण सदरीं नमुद केलें आहे तें तयार करून देण्या विषयीं रा. रा.

[illegible]

बाहेर गावचे घेणारास टपाल हाशिल पडेल. वर्षाचे बारा [illegible]

[illegible]

## नोटिस.

[illegible]

[illegible] कोर्टांत फिर्याद करून [illegible] सुद्धां रुपये द्यावे लागतील व शिवाय या नोटिशीचा खर्चही द्यावा लागेल हें तुम्हांस कळावें. तारीख २९ माहे दिसेंबर सन १८६९ इ०.

( सही ) धनसुकदास नथमल कोठारी राहणार खामगाव.

[illegible]

( सही ) [illegible] दुकान [illegible] गाव दस्तुरखुद.

नोटिस — करिम भाई [illegible] [illegible] प्रमाणें मेहेकर [illegible] खालीं सही [illegible] यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडे [illegible] बाकी रुपये [illegible] शिवाय व्याज येणें आहे करितां ही नोटिस पोहोचल्या पासून [illegible] दिवसांत सर्व रुपयांचा उलगडा करून देणे नाहींतर [illegible] प्रमाणे नोटिशीचे खर्चा सह फिर्याद करून रुपये घेऊं तारिख ३१ माहे दिसेंबर १८६९ इसवी.

( सही ) [illegible] कृष्ण दुकान [illegible] गाव दस्तुरखुद.

नोटिस — खंडुजी वलद सटवाजी माळी राहणार [illegible] तालुके मेहेकर [illegible] यांजकडून नोटिस देण्यात येते कीं तुमचेकडे [illegible]

[illegible]

मजकूर हल्लीं वस्ती नांद्रे परगणे घाटबोरी तालुके मेहेकर जिल्हा बुल्डाणें इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुम्ही माझे नवरे लग्नाचे असून तुम्ही दुसरी गंधर्वाची बायको केल्यामुळें तुम्ही तिच नादीं लागून मजला न नांदावितां गांजणूक वगैरे करून काढून दिलें त्याजलाही च्यारवर्षे झालीं मध्यंतरीं मी एक दोन वेळां मजला

[illegible] त्याकारितां आले असून पातुर आणि [illegible] या दरम्यान रानांत म्हणजे [illegible] मारठोक करून काढून दिलें आणि तुजला मी नांदवीत नाहीं. पाहिजे तिकडे जावें म्हणून बोलला हेंही तुम्ही कायद्याविरुद्ध केलें, आतां तुम्हास या नोटिशीनें इतकेंच कळवितें कीं, या नोटिशीचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आंत मजला गांजणूक वगैरे न करितां लोक रीतीप्रमाणे व देश रिवाजाप्रमाणें तुम्ही मजला घेऊन जाऊन माझी नांदणूक करावी. अगर नांदणूक न केल्यास रीतीप्रमाणें अन्नवस्त्र मिळणेंविषयीं तजवीज करीन.

आणखी या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, तुम्ही मजला गांजणूक वगैरे न करितां रीतीप्रमाणें नांदविलें असतां मी नांदण्यास राजी आहे अगर तुम्हास मजला [illegible] दोणें नसल्यास [illegible] आहे यास्तव तुम्हास सदरीं लिहिले मुदतीचे आंत मजला नांदविणें असल्यास घेऊन जाऊन माझा संसार करावा नाहीं पेक्षां असें तुम्हास करणें नसल्यास मी जातींत जाऊन जातीचे विचारें दुसरा गंधर्वाचा नवरा करीन कळावें ता० ३० दिसेंबर सन १८६९ इसवी मुक्काम मेहेकर.

( सही ) कमळा[illegible] कृष्णा सुतार मी [illegible] मजकूर हल्लीं नांद्रे तालुके मेहेकर निशाणी खुद.

## वऱ्हाडसमाचार.

शनिवार सायंकाल ता० ८ जानुआरी.

[illegible]

## सलामाविषयीं.

[illegible] सलामाविषयीं [illegible] मजकूर [illegible] ला होता व त्यांत शेवटास इतकेंच सुचविलें होतें कीं, लोकांकडून सलाम करवून घेण्याचे कामीं जितका आग्रह किंवा राग धरावा तितकाच विच्यार उलट सलामाचे कामींही ठेवावा. याविषयीं आमचे वाचकांस आठवण असेल. त्याविषयीं आमचे कानावर असें आलें आहे कीं, कित्येक युरो

पियन लोकांस तो मजकूर आवडला नाहीं,
व नेटिव लोकांनीं सलाम करीत जाऊंनये
एतत्सूचक तो लेख होता अशी कित्येकां-
ची समजूत झाली आहे. सबब त्याचे
खुलाशाकरितां त्याच प्रकरणावर आन आ
णखी थोडा मजकूर लिहिण्यास आम्हीं आ
पले वाचकांची परमाणगी घेतों.

उद्दामपणानें लोकांनीं वागावें असा त्यां
स उपदेश करण्याचा वर्तमानपत्र कर्त्यां-
चा धर्म नाहीं. व आम्हीं तसा उपदेश
कोणास केला ही नाहीं. उलटें नमनास
प्रतिनमन करावें व न करणें बरोबर नाहीं
असें आम्हीं धडधडित म्हणत असतां त्यां
लेखाचा तसा अर्थ झाला ही गैर समजूत
होय.

वऱ्हाडांतील रयत सरकारी युरोपियन
अधिकारी लोकांस पाहून सलाम करीत
नाहीं असा त्या गरीब बिचाऱ्यांवर आळ
आलेला पाहून आम्हांस वाईट वाटतें.
मोगलाई राज्यांतील "उठतां लाथ, बस-
तां बुकी" खाऊन दीन झालेली वऱ्हाड-
ची प्रजा माजुरीपणानें साहेब लोकांस स-
लाम सुद्धां करणार नाहीं हें घडणें असंभा
व्य आहे. सरकारचा एक शिपुरडा खेडे
गावांत गेला तर गावकऱ्यांच्या सलामाचा
त्यावर वर्षाव होत असतो व कोणी कार
कून, फौजदार, अगर तहशीलदार गावांत
गेल्यास गावकरी लोक किती वाकून स-
लाम करितात, व त्यांच्या घोड्याबरोबर
किती धावत असतात तें बहुत वेळां आ-
म्ही पाहिलें आहे व साहेब लोक गावांत
आले तर लोक फार लवून त्यांस सलाम
करितात व ते गावांत असतपर्यंत मोठ्या
घोळक्यानें त्यांबरोबर राहतात; आणि
असें आहे तर वऱ्हाडची सर्व प्रजा उद्दाम
पणानें युरोपियन लोकांस सलाम सुध्धां क
रित नाहीं असें कसें म्हणावें?

मुसलमान लोकांत व त्यांचे राज्यांत स
लामाची अदबी फार आहे? व इकडे मुस-
लमानांचें राज्य बहुत दिवस होतें त्यामु-
ळें ती पध्दत इकडील लोकांत पडून गेली
च आहे. आणि आमच्या हिंदुलोकांत तर
पुर्वापार रूढ आहे कीं.

श्लोक

रिक्तपाणिर्नपश्येतु, राजानंदैवतांगु
रुं॥ दैवज्ञंभिषजंमित्रं, फलेनफलमा
दिशेत् ॥ १ ॥

म्हणजे राज्याधिकारी, देवता, गुरु,
( श्रेष्ठ ) ज्योतिषी, वैद्य, मित्र यांचें दर्शन
घेणें आहे तर रिकाम्या हातानें जाऊंनये,
कांहीं तरी फल घेऊन जावें. व याचपध्धती
वरून राज्याधिकाऱ्यांस व इतर थोर लोका
स नजराणे पाठविण्याची, व दारचे कांहीं
जिन्नस आंबे, केळी, फणस वगैरे निघाले
म्हणजे त्यांच्या भेटी पाठविण्याची चाल प-
डलेली आहे पुढें लोकांत गरीबी आली व
अधिकाऱ्यांनीं नजराणे भेटी वगैरे घेऊ नये
त म्हणून सरकारचे ठराव झाले तेव्हां अ
से प्रकार राज्याधिकार नात्याचे बंद झाले
तरी श्रेष्ठ अगर मित्र या नात्याचे अजून
चालू आहेतच व गरीबलोकांत भेटीची
अनुकूलता नाहींशी झाली तेव्हां फल नाहीं
तर नाहीं, आपले दोन हस्तक व तिसरें म
स्तक त्यांच्या पदीं अर्पावें म्हणजे ते अनुग्रह
करितील अशी समजूत निघाली व ती प्र
माणें सरकारी अधिकाऱ्यांचे पायांतलि बु-
टांवर मस्तक ठेवणारे गृहस्थ ही आम्हीं पा
हिले आहेत. तेव्हां हिंदू लोक अभि वंदना
स इतके दक्ष असतां त्यांवर त्याच बाबदीं
त या वऱ्हाडामध्यें उलटा उद्दाम पणाचा
दोष येता तेव्हां हा केवळ सोन्याचाच गु-
ण नव्हे, कांहीं सोनाराचा ही गुण असा-
वा अशी आम्ही कल्पना करितो.

कांहीं साहेब लोकांस सलाम करून घे
णें व उलट आपण सलाम करणें आवडत
नाहीं म्हणून ते आपल्या वर्तनावरून स-
लामाची मनाई दाखवितात व त्यावरून ग
रीब वऱ्हाडी प्रजेस कधीं कोणी साहेब भे-
टले तर असें वाटतें कीं हे त्या सलाम न
आवडणाऱ्या वर्गांतील असतील कीं काय!
न जाणो! म्हणून क्वचित साशंक राहतात
तरी त्यांत प्रीति संपादन व क्रोध निवार-
ण हेच गुण असतात.

दुसरें, हल्लीं इंग्लिश सरकारचें राज्य होऊ
न खातो फार वाढल्यानें साहेब लोक फार झा
ले आहेत, एक राज्याधिकारी युरोपियन
मुख्य साहेब लोक, त्या खालीं पोर्च्युगीस
हाफकास्ट, कानवर्ट (ख्रिस्ती झालेले ) आ
पणांस साहेब म्हणवितात व साहेबांचाच
पेहराव करितात व आगमाड्या झाल्यानें,
खरे व नकली असे असे अनंत साहेब लो-
क देशांत फडकूं लागले. पुढें पलटणीती
ल गोरे शिपाई दहा वीस रुपये पगार वाले
तेही साहेबच व साहेबांच्या पदरचे नोकर
बुटलेर, बबर्ची, रेल्वे वरील ड्राइवर, गार्ड
वगैरे बहुतेक पाटलून, बूट, व टोपी वापर
णारे तेव्हां अडाणी रयतेच्या दृष्टीनें सर्व-
साहेबच तेव्हां साहेबांची संख्या दशकाचे
आंत होती ती सहस्राकडे वळूं लागली म
ग तर रयतेचा फारच गोंधळ होऊं लागला
व मग युरोपियन अधिकाऱ्यांस व एकाद्या
सिनोरास सारखी सलामी झडण्यांत वैषम्य
उत्पन्न होण्याचा व सलाम करणाऱ्याचे ठा
यीं नावड होण्याचा समय आला. त्याच
प्रमाणें सोलजर लोक दारू पिऊन गावांत
येऊन दांडगाई करूं लागले तेव्हां त्यांस
वाकून सलाम पहिल्यानें करावा किंवा बुटा
चे लाथेचा त्यांचा प्रसाद पहिल्यानें घ्यावा
याविषयीं गोंधळ होऊं लागला सारांश अ-
शा बहुत कारणावरून सलामाची म्हणजे
अभि वंदनाची प्रवृत्ती प्रतिपक्षां कडूनच वें
गळ्या तऱ्हेची होत गेली त्यास रयतेचा
उपाय नाहीं.

आम्हांस वाटतें कीं सलामाच्या सन्मान
मिळण्याची प्रवृती देशांत अवश्य व तंतो
तंत राखिलीच पाहिजे असे इकडील युरो
पियन अधिकाऱ्यांस वाटत असेल व क्वचि
त कोणी सलाम न केल्यानें अपमान होत
असेल तर त्याविषयीं एका सक्तीच्या जा-
हिर नाम्यानें सर्वत्र ही गोष्ट विदित करा-
वी म्हणजे जलद अमलांत येईल. व दुस
रा प्रकार असा कीं. साधारण रितीनें रय
तेस हे श्रेष्ठ अधिकारी आहेत असें
अपोआप कळावें ह्मणून युरोपियन अधिका
ऱ्यांनीं एकटे गावांत येऊंनये थोडे तरी शि
पाई अगर स्वार बरोबर वागवीत जावें.
फौजदार तहशिलदार इत्यादिकांस सलाम
व्हावा व श्रेष्ट साहेब लोकांस होऊंनये यां-
तील तारतम्य पहिलें तर तहशिलदार व
गैरेस त्याचा अधिकार नात्याचा तो सला
म झडत असतो व हें त्यांच्या ढळढळींत
इतमामावरूनच दिसून येतें सबब साहेब
लोकांच्या दिमतीस शिपाई वगैरे असवात
च त्यांतून कांहीं त्यांनीं बरोबर वागविल्या-
स गुलगलण्यावांचून व कांहीं त्रास झाल्या
वाचून त्यांचे मनोगत सिद्धीस जाणार आहे
असें आम्हास वाटतें.

( पुढें चालू. )

## जळगाव येथील शाळांचा समारंभ.

तारीख २३ दिसेंबर सन १८६९ इ-
सवी रोजी सायंकाळीं च्यार वाजतां जळ-
गांव येथील सर्व शाळांतील मुलांस बक्षिसें
वांटण्याचा समारंभ तेथील इंग्लिश मराठी
स्कुलांत झाला. डेप्युटी एजुकेशनल इन-
स्पेक्टर जिल्हा अकोला यांनीं जळगांवांती
ल सर्व संभावीत लोकांस च्यार वाजता ये-
ण्याचें बोलावणें केलें होतें तरी सर्व लोक
तीन वजण्याच्या सुमारास जमले. मेहेरबा-
न डाक्तर सिंक्लेयर साहेब विद्याखात्याचे
डैरेक्टर ज्यांची कीर्ति सर्व वऱ्हाडांत प्रसृ-
त झाली आहे ते त्या समयास जळगांव
येथें आले होते त्यांस भेटून त्यांच्या तोंडचे
दोन शब्द ऐकावे अशी लोकांची फार
इच्छा होती यामुळें ते लवकर आले होते.
साहेब आल्यानंतर त्यांनीं तहशिलदार यांस
अध्यक्षस्थानीं बसविलें मग इंग्लिश मराठी
शाळेतील कांहीं मुलांनीं मराठी सहावे पु-
स्तकांतील व चवथ्या पुस्तकांतील पदें ग-
ळ्यावर म्हटलीं मुलांनी दिंड्या, साक्या, व
पदें म्हटलीं तेव्हा मेहेरबान साहेब व सर्व मं
डळी फार खुष झाली. दोघां मुलांचे गळे
फार उत्तम असल्यामुळे त्यानीं मंडळीचें
मनोरंजन चांगल्याप्रकारें केलें नंतर साहेबां
नीं भाषण केलें त्याचें तात्पर्य थोडक्यांत
लिहितों.

आज येथें मुलींची शाळा, हिंदुस्थानी
शाळा व इंग्लिश मराठी शाळा यांतील
विद्यार्थ्यांस बक्षीसें द्यावयाचीं आहेत या
समारंभास येथील संभावीत गृहस्थ आले
यामुळें त्यांचे आम्हीं फार आभारी आहों.
हैदराबादेतील मेहेरबान रेसिडेंट साहेबां-
च्या मडुम साहेबांनीं वऱ्हाडांतील मुलींच्या
शाळेतील उत्तम मुलींस देण्याकरितां पद-
कें पाठविलीं आहेत तीं आपण पहावीं
( यावेळेस साहेबांच्या हेडक्लार्कानीं तीं पद
कें सर्वांस दाखवीलीं.) आम्हीं सालगुद-
स्तां हैदराबादेस गेलों होतों तेव्हां मडुम
साहेबांनीं आम्हांस इकडील सर्व शाळांची
हकीकत विचारली आणि कांहीं तरी मु-
लींस इनाम देण्याची इच्छा प्रदर्शीत के-
ली. आणि विचारलें कीं कोणत्या प्र-
कारचीं बक्षीसें मुलींस आवडतील आम्हीं
परत आल्यानंतर कांहीं नेटिव गृहस्थांस
विचारून याप्रकारचीं पदकें लोकांस आ-
वडतील असें कळविल्यावरून त्यांनींही पा-
ठविलीं आहेत यांतील येक पदक तहशी-
लदार साहेब आजच्या परीक्षेत जी मुल-
गी उत्तम ठरली आहे तीस देतील.

तीन साडे तीन वर्षांपूर्वीं आम्ही
वऱ्हाडांत आलों तेव्हां मुसलमान लोकांची
स्थीती विद्येच्या संबंधानें फार वाईट होती
आम्ही मुसलमान लोकांस शाळा पाहि
जेका म्हणून विचारलें असतां आम्हांस शा
ळा नको असा साफ जबाब देत असत प
रंतु पुढें थोडेच दिवसांनी एक एक शाळा
मागू लागले व एक वर्षानंतर पुष्कळ शा-
ळा झाल्या अद्यापिही मुसलमान लोकांत वि
द्येची स्थिती जशी असावी तशी नाहीं परं
तु ती चांगली व्हावी याकरितां आम्हाकडू
न प्रयत्न चालले आहेत अकोल्यांत नार्मल
स्कुल झालें आहे त्याचा एक उद्देश हिंदु-
स्थानी मास्तर तयार करण्याचा आहे तेथें
चांगले मास्तर तयार झाले म्हणजे हल्लीं-
च्या ज्या शिक्षकांस गणित वगैरे शाळेंती
ल विषयांची माहिती नाहीं त्यास नार्मल
स्कुलांत पाठऊन त्यांचे जागेवर तयार झा-
लेले लोक पाठविण्याची तजावीज करून
ही व्यवस्था सुरू झाली म्हणजे मुसलमान
लोकांत पुष्कळ सुधारणा होईल अशी आ-
ह्मांस आशा आहे.

इंग्लिश मराठी शाळेचे कायमचे हेड-
मास्तर रा. रा. वामन गणेश यानीं येथें
फार श्रम केले व ही शाळा चांगल्या
दशेस आणली. एलिचपुर जिल्ह्याचे डेपु-
टी इन्स्पेक्टर हे आजारी पडल्यामुळें
वामन गणेश यांची त्या जाग्यावर अक्टीं-
ग नेमणुक केली वामन गणेशानीं येथें
फार मेहनत घेतली या करितां त्यांची
कोणत्या तरी रितीनें बढती करावी असें
आम्हांस वाटलें यांमुळें त्यांची इलिचपुरा
स नेमणूक केली या व्यवस्थेमुळें येथील
शाळेचें कांहीं नुकसान जाहलें खरें परंतु
पुढें अशाप्रकारचें नुकसान होण्याची पा-
ळी इकडे कधीं येणार नाहीं आम्हीं येथें
हेडमास्तर पाठविण्याची तजवीज लवकरच
करूं सालमजकूरचे कांपीटिटीव परिक्षेंत
येथील दोन मुलगे उतरले येणें करून
आम्हांस फार संतोष जाहला आणि आम
ची अशी आशा आहे कीं पुढले वर्षीं या
पेक्षाही अधिक मुलें उतरतील.

यानंतर साहेबानीं कांपिटिटीव परीक्षेंत
पास झालेल्या मुलांस अकोलें किंवा उमरा
वती येथील हैस्कुलांत विद्याभ्यासाकरितां
जाण्याविषयीं पुष्कळ उपदेश केला मग सा
हेबांच्या सांगण्यावरून तहशिलदारांनीं मु-
लींस व मुलांस इनामें वाटलीं पुढें पानसु
पारी वाटल्यानंतर सभा विसर्जन झाली.

## NOTIFICATION.

*The Hyderabad Residency, the 10th December 1869.*

No. 112.

Examinations will be held on the 10th January 1870 at Secunderabad, by a Medical Officer selected by the Deputy Inspector General of Hospitals, Hyderabad Subsidiary Force, and at Akola and Oomerawuttee under the directions of the Department of Public Instraction of Candidates for admission to the Subordinate Medical Department, Berar—Hospital Assistant Class.

The necessary qualifications are:—

1st.—A certificate of health.

2nd.—A certificate of successful vaccination, or of marks of having had small-pox.

3rd.—Age 15 to 19.

4th.—Respectable family.

5th.—A thorough knowledge of the Hindustani language, so as to be able to read it fuently, and write it in the Persian character correctly and legibly from dictation.

6th.—A knowledge of the first four Rules of Arithmetic, Addition, Substraction, Multiplication, and Division.

It will be optional for Candidates to pass an examination in English also; if successful, they will be entitled to the increased rates of pay herein mentioned.

From the date of admission, successful Candidates will be considered Government servants, and will be required to spend one year at an Hospital to acquire practical knowledge of dispensing, &c.; after passing a successful examination in this subject, they will be further required to study for three years at the Hyderabad Medical School, before passing their final examination.

Hospital Assistants must engage to serve the Local Government for seven years; they will receive pay at the rate laid down in G. O. G. G., No. 550 of 1868, para. 36, *viz.*, monthly pay as follows:—

| | For those qualified in the English language. | | | For those not qualified in the English language. | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Rs. | A. | P. | Rs. | A. | P. |
| 1st Class Hospital Assistant of above 14 years service. | 68 | 0 | 0 | 40 | 0 | 0 |
| 2nd Ditto. ditto. above 7 ditto...... | 40 | 0 | 0 | 30 | 0 | 0 |
| 3rd Ditto. ditto. above 7 ditto...... | 25 | 0 | 0 | 20 | 0 | 0 |
| Passed Medical Pupils. ........................ | 16 | 0 | 0 | 12 | 0 | 0 |

During their period of pupilage; they will receive monthly pay as follows:—

| | Passed in English. | | | Not passed in English. | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Rs. | A. | P. | Rs. | A. | P. |
| During 1st year of Hospital training. .................. | 7 | 0 | 0 | 5 | 0 | 0 |
| Do. 2nd do., or 1st year at Medical School......... | 8 | 0 | 0 | 6 | 0 | 0 |
| Do. 3rd do., or 2nd do. do. ......... | 9 | 0 | 0 | 7 | 0 | 0 |
| Do. 4th do., or 3rd do. do. ...... .... | 10 | 0 | 0 | 8 | 0 | 0 |

From amongst the successful Candidates on the present occasion, a certain number will be selected who have passed the most complete examination; these will be permitted to commence their studies at the Hyderabad Medical School on the 1st of February next.

(By Order.)

W. TWEEDIE,

*Officiating fist Assistant Resident.*

## SCIENTIFIC EDUCATION IN BOMBAY.

*(Pall Mall Gazette.)*

The Director of Public Instruction in Bombay, in his last annual report, published in the Bombay overland papers of the 15th ult., says of a proposal to teach geology in Grant Medical College, "I find no means of teaching geology in Bombay." This statement will surprise no one who knows the history of the Indian medicel services since they were thrown open to competition. For years past, in Bombay at least, there has been the greatest difficulty in finding properly qualified men for scientific appointments. The Medical and Physical Society of Bombay, once widely known for its activity and the value of its transactions, has now virtually ceased to exist. Those who connect these deplorable facts with competition do not urge them as arguments against that system. They would merely draw attention to the fact that whilst under the old system of patronage the Indian medical services produced an unbroken series of distinguished naturalists and eminent physicians, the series closed when they were opened to competition. They might argue, indeed, that the competitive system is not in this case carried out faithfully in its principles, and that the true remedy is to adapt it to the fact that appointments in the Indian medical services are not in great demand. This year the candidates were exactly equal in number to the appointments competed for, and only one of them was unsuccessful. Under the present rules of the Indian medical colleges the professors are appointed to the various chairs, in virtue not of special qualifications for them, but of their military offices, the professorships being, in fact, *ex officiis;* it is not surprising that the Director of Public Instruction in Bombay should express a hope that the Grant Medical College may be "delivered from other than educational control."

## वऱ्हाड.

पोलीस कडील कोर्ट इन्स्पेक्टर रा० गुणवंत राव सदाशिव यांस माजी पो० सुप०रिं० फयाडली साहेब यांणीं सस्पिंड केलें होतें; त्या खटल्याचा निकाल मे० मोफीट साहेब सु० पोलिस यांणीं करून खटल्यांत हांशील नाहीं; म्हणून ठरवून कामावर रुजू केलें.

एथील स्मालकाज कोर्टांतील तारि १ जानेवारि सन १८७० पासून नाजरची जागा कमी झाली.

चांदूर—एथें ता० २४ मिनहुरोजीं प्रात:काळीं आठवाजतां वार्षिक परिक्षेबद्दल बक्षीस बांटण्याचा समारंभ रा. रा. लक्ष्मण बाळाराम तहशिलदार दर्यापूर यांचे दिवाणखान्यांत झाला. त्याप्रसंगीं मे. अ. कमिशनर साहेब अध्यक्षस्थानीं असून मे. रावसाहेब चिमणाजी राजाराम ए. इ. व तहशिलदार साहेब चांदूर चीफ कानस्टेबल, व डे. ए. इ. चे शिरस्तेदार, व सावकार व पाटिल पाडे वगैरे ग्रामस्त लोक सुमारें १०० जमले होते. तालुका स्कुलांतील मुलांस ६ रुपयांचें व मुलींस ही सदहू किमतीचीं बुकें बक्षिस दिलीं. नंतर दर्यापूरचे तहशिलदार यांचे बंधू रा. रा. मोहनसिंग बाळाराम यांनीं त्यांच्यावतीनें मुलींस १५ रुपयांचे खण बक्षिस दिले सदहू प्रसंगीं अ. कमिशनर साहेब यांणीं इंग्रजींत संभाषण केलें त्याचा सारांश मराठींत डे. ए. इ. साहेब यांणीं फार समर्पक व सुरसं भाषण केलें व पानसूपारी अतरगूलाबहोऊन सभाविसरजन होण्याचे अगोधर मूलिंचे शाळेकरितां स्वतंत्र गृह असण्या विषयींचा हेतु कित्येक सभासदांनीं केल्यावरून शाळेकरितां १७० रुपये वरगणी जमली.

## अकोला.

मेहेरबान कमिशनर साहेब यांनीं डेपुटी कमीशनर साहेबांकडे वकील लोकांस काम करण्या करितां एकेक कोडतात मुक्रर नेमावया विषयीं लिहून आल्यावरून डेपुटी साहेबानीं असिस्टंट कमिशनर, एक्ट्रा असिस्टंट कमिशनर व तहशीलदार यांस यांचे मत सध्यां कोणचे वकील तुमचे कोर्टांत काम करितात तुम्हीं कोणचे वकीलांस कबुल आंहा व कोणते वकीलाची खुशी कोणचे कोर्टांत काम करावयाची आहे याविषयीं विचारलें आहे.

आम्ही मागचे आठवड्यांत रा. गंगाराम बापुजी शीरस्तेदारांवर कांहीं अर्ज झाले आहेत असें लिहिलें होतें त्याप्रमाणें अर्ज करणारास असीस्टंट कमिशनरांनीं बोलाऊन त्यांची जबानी घेतली [illegible] त्यानें अर्ज केला नाहीं व अर्जावर माझी सहीनाहीं. असें सांगितलें म्ह[illegible] प्रकरण डेपुटी कमिशनर साहेबांक[illegible] आल्यामुळें त्यांजकडे पुन्हा [illegible]

✓ सलाम नकेल्याबद्दल बक्षीस— तारिख ६ जानेवारी रोजी डपुटी कमिशनर साहेबांचे कचेरी[illegible] अमलदारानें गरीब लोकांनीं [illegible] केल्याबद्दल साटक्याचे बक्षीस [illegible]

हवा—या [illegible] अर्थी [illegible] संध्याकाळचे प्रहरीं [illegible] केली त्यामुळें रस्त्यांत पा[illegible] होतें.

[illegible] गवगवा आला आहे [illegible] स्टांप पाहिजे त्यांस तो ख[illegible] नसल्यामुळें मिळत नाहीं [illegible] गरजवंत लोकांस [illegible] स्टांप विकत घ्यावे लागतात तर अधिकारी लोकांनीं [illegible] बेळीं जो स्टांप ज्यास पाहिजे तो स्टांप मिळेल अशी तजविज राखावी.

मे. डायरेक्टर सिंक्लेअर साहेब व राव साहेब श्रीराम भिकाजी जटार डे. ए. इ. हे खामगावांकडे गेल्याचें कळतें.

## जाहिरात.

सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येते कीं कैदी खुराकी करितां जे सामान दररोज लागतें तें दररोज देऊन महिना अखेर झाला म्हणजे तहसीलदार तालुके अकोलें यांजकडून दर हपत्यास बाजार नीरखा प्रमाणें एकंदर महिन्यांत जें सामान झालें असेल त्याजबद्दल पैसा हिशोबानें मीळेल तर ज्याची हें काम घेण्याची खुशी असेल त्यांनीं जेल सुपरिंटेंडेंट साहेब यांचे समक्ष हजर व्हावें कळावें तारिख ७ माहे जानेवारि १८७० इसवी.

(सही) जे. पारकर जेलर.

## वर्तमानसार.

काबुल—ता० २७ दिजंबर पर्यंत नूतन बातमी अशी समजते कीं, सर इस्मायलखान आणि अमीर शियरअली यांजमध्यें जो बेबनाव झाला होता त्याबद्दल सख्यत्व झालें. शियर अलीस काबुल, गिझनी, कंदाहार आणि खोरम या ठिकाणचा काय तो सर्व वसूल मिळतो. बाकी राहिलेल्या देशांमधून वेळेवर वसूल येत नाहीं येवढेंच नाहीं तर जुलमानेंही घ्यावा लागतो. तुर्कस्थानांत तर याचा अद्याप पगडा पडावा तसा पडला नाहीं व याच्या बापासारिखा पडेल किंवा नाहीं याचा मोठा विचार आहे.

पूर्व वऱ्हाडांतील चंद्रपूर शहरानजीक कोळशाच्या खाणीं सांपडल्या आहेत नागपूर रेलवे लाइनी पासून हिंगणघाट पर्यंत जो लोखंडी रस्ता बांधताहेत तोच चंद्रपूर पर्यंत न्यावा म्हणून हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे. ने. ओ.

पुनर्विवाहाच्या शास्त्रार्थाचा वाद करण्यास वे. रा. विठोबा अंणा दप्तरदार कऱ्हाडकर हे उभे रहात नाहींत. सबब अण्णांनीं केलेल्या "विधवाविवाहसंहार" नामक ग्रंथाचें सशास्त्र खंडन आम्हीं कसें करतों तें वे. रा. विष्णुशास्त्री पंडित हे लोकांस दाखवूं लागले आहेत. कालरोजीं नारायण पेंठेंत मांडव्यांच्या घरीं सायंकाळीं चार वाजल्यापासून सात वाजेपर्यंत दोनशें मंडळी पुढें विष्णुशास्त्री यांनीं अणाच्या कांहीं शंकांचें खण्डन केलें व त्याप्रमाणें आजही ही करणार आहेत. झालेल्या भाषणाचा पहिला भाग छापून गांवांतील शास्त्रज्ञ व सभावीत मंडळीला वांटला. त्याची एक प्रत आम्हाकडेही आली ती आम्हीं आभारपूर्वक स्वीकारून ह्याचा सर्वांनीं व विशेषेकरून शास्त्रज्ञ पुरुषांनीं चांगला विचार करावा, अशी आम्हीं सूचना करितों. ज्ञा. च.

रावलपिंडी.—या ठिकाणीं दिजंबर महिन्याच्या २० व्या तारखेस धरणीकंप झाला. याचा वेग सुमारें २० पासून ३० सेकंद पर्यंत होता. हा वायव्येकडून आला असावा, याच वेळेस आकाश घडघडून थोडासा पाऊस ही पडला. याच्या वेगाचा धक्का मनुष्यांस सांगला समजण्यासारखा होता कित्येक लोक घर अंगावर पडेल किंवा काय अशा भीतीनें बाहेर पडेल. व कांहीं घरांच्या व बराकांच्या भिंतींस त्याच्या योगानें भेगीही पडल्या, परंतु सांगण्या सारखी नासाडी झाली नाहीं.

सर सालरजंग निझाम सरकाराचे प्रतीनिधी यांणीं राज्य कारभार संबंधानें उर्दू भाषेंत ग्याझिट काढलें आहे. नेमणूका बदल्या पगाराची बडती. ती वगैरे सर्व हाकीकत त्या पत्रांत लिहिली जाऊन ह्याची एक एक कापी निझाम सरकारच्या प्रत्येक मोठ्या अधिकाऱ्याकडेस पाठविली जाईल व इतर लोकांस ह्या पत्रा बदल प्रत्येक महिन्यास दोन रुपये पडतील.

मुंबईस ही वकिलीची परीक्षा फेब्रुवारीचे ७ वे तारिखेस होईल.

हायकोर्टांतील जज्जानीं पुढें लिहिल्या गृहस्थांस वकिलीच्या परीक्षेचे परीक्षक नेमले—आनरबल मि. जस्टिस मेलविल, मि. खंडेराव चिमणराव बेंदरकर, खानसाहेब करसेटजी रस्तमजी, कल्याणचे सबॉर्डिनेट जज्ज आणि ए. एम. क्यापटन सोलापुचे स. जज्ज. इं. प्र.

## जाहिरखबरा.

नोटिस—कोंडजी वल्लद रायाजी पडोळे राहाणार नागझरी खुर्द तालुके मेहेकर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुजकडे आमचे-येणें लावणीचे गहु ८१ मण हे सालमजकुरचे हंगामावर देउ व पूर्वीचे गहू साडे पांच पायली हे दिढी सुद्धां सालमजकूरचे हंगामावर देऊं म्हणून रोखा तारिख १७ माहे जानेवारी सन १८६८ इसवीचा आहे त्याप्रमाणें दिल्हे नाहीं तर ही नोटिस पावल्यापासून ८ आठ दिवसाचे आंत सदर हू गहुं सवा दोन मण दीडशेर दिढी सुद्धां आणून दावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून रुपये घेण्यांत येतील कळावें तारिख १ माहे जानुएरी १८७० इ०

( सही ) रतन चंद आसकरण मारवाडी- रा० देउळगाव माळी.

---

नोटिस—शिवराम वल्लद बाळाजी नाच्या रहाणार जानेफळ यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस तुमचेकडे खाते बाकी रुपये १२ शिवाय व्याज येणे आहे सबब ही नोटीस पोहोचल्यापासून १५ दिवसाचे आंत सर्व रुपयाचा उलगडा करून देणें नाही तर शिरस्त्याप्रमाणें नोटिशीचे खर्चासुध्धां फिर्यादी करून घेतले जाईल तारिख ३१ माहे दिसेंबर सन १८६९

(सही) सखाराम कृष्ण दुकान डोनगाव दस्तूर खुद.

---

## जाहिरनामा.

जाहिरनामा—खानदेश जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट यांजकडून

सर्व लोकांस प्रगट करण्यांत येतो कीं तालुके नशिराबाद येथील माजी मामलेदार श्रीधर विठ्ठल दाते यानें जुलमानें देहेनगी वगैरे घेतली असोन तो हल्लीं हजर मिळत नाहीं. बहुतकरून त्याचे सगे लोक मिरज कोलापुराकडे आहेत तिकडे तो असावा असें वाटतें. यास्तव जो मनुष्य सदरहु इसमास पकडून देईल अगर ज्याचे खबर वरून तो धरला जाईल त्यानला दोनशे २०० रुपये बक्षीस देण्यांत येतील हें सर्वांनीं समजावें. हा जाहिरनामा आजपासून येक वर्ष पावेतों कायम राहील पुढें रद्द असे. तारिख १९ डिसेंबर सन १८६९ इसवी मुक्काम नागतुली.

यशवंत बाळकृष्ण
प्रोबेशनरी चिटणीस.

C. Ashburner.
दि० मा०.

---

### शिक्षक मित्र

हें पुस्तक ता० १९ फेब्रुआरी सन १८७० च्या सुमारास तयार होईल. ह्यांत मास्तर लोकांस आणि मास्तर होऊं इच्छिणारे लोकांस उत्कृष्ट साह्य करणारे विषय आहेत. ह्या मासख्याचें पुस्तक अद्याप पर्यंत झाल्या विषयीं आमचे ऐकण्यांत आलें नाहीं याजकरितां सर्व विषयांचें वर्णन यांत श्रमानें केलें आहे. ह्या पुस्तकाची किंमत एक महिन्याचे आंत आगाऊ पाठविणारास टपाल खर्चासुद्धां ११ आणे, नावें मात्र पाठविणारांस १३ आणे व मागांहून घेणारास १४ आणे पडतील. ह्या पुस्तकाचे संबंधानें किंमतीचे पैसे किंवा पत्र पाठविणें झाल्यास नाशीक येथें ज्ञानमंदार छापखान्याचे म्यानेजर यांजकडे पाठवावें नाटपेड पत्रें स्वीकारलीं जाणार नाहींत. तरी या कामास सर्वांनीं विशेषें करून स्कूलमास्तर लोकांनीं साह्य करावें अशी आमची प्रार्थना आहे.

हरि भास्कर टिळक
एडिटर आणि म्यानेजर ज्ञा. मं.
गंगाधर रघुनाथ पुरंदरे.
अ. स्कूल मास्तर.

---

## जाहिरात.

### नवीन पुस्तक

### वरावर्दी हिशेबसंग्रह.

हें वरावर्दी हिशेबसंग्रहाचें नवें पुस्तक आम्ही तयार करून नागपूर युनियन प्रेस छापखान्यांत सुंदर ठसे छापावर छापून तयार केलें आहे. पुस्तकाचा साच्या चतुष्पत्री असून पृष्ठें सुमारें ६० आहेत. यांत मुख्य विषय. रेघांचे गुणाकार, उपयोगी कोष्टकें, हिशेब करण्याचे सामान्य नियम सुमारें १००, व त्या नियमास अनसरून अनेक प्रकारचें व्यवहारी प्रश्न सुमारें ४५० उत्तरा सहित, आणि जमीन मोजणी वगैरे त्यांचे हिशेब इत्यादि रीति सह सोडून दाखविले आहेत.

या पुस्तकाची किंमत ६ आणे ठेविली आहे. बाहेर गांवचे घेणारांस टपाल हशील पडणार नाहीं एकठोक १० प्रती घेणारास तेवढ्याच किमतींत ११ प्रती दिल्या जातील.

पैसा तिकिटांनीं पाठवावा, नाटपेड पत्रें घेतलीं जाणार नाहींत. पत्रें खालच्या पत्त्यावर पाठविलीं असतां तावडतोब पुस्तकें रवाना होतील.

तारिख १ जानेवारी सन १८७० इसवी. मुकाम अकोला.

नारो रघुनाथ मोहळकर
मराठी मार्मल स्कूलचे मास्तर
अकोला प्रांतवऱ्हाड

---

## विकावयाचीं पुस्तकें.

### कायद्यासंबंधीं

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| पिनलकोड १८६० चा ४५ | २ | ० | ० |
| नादारीची रुळ …. …. | ० | ६ | ० |
| पोलिसाच्या रुळी …. …. | ० | ३ | ० |
| मुं०इला०चीं मुलकी सर्कुलरें … | ४ | ० | ० |
| जाइंट रुळ …. …. | ० | २ | ० |
| स्माल. को. आक्ट १८६९ चा १ | ० | ४ | ० |
| पैमाषीचा आक्ट १८६९ चा १ | ० | ४ | ० |
| फौजदारी गुन्ह्यांची जंत्री… | ० | ३ | ० |

### पोथ्या वगैरे.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| अध्यात्मरामायण. … | ४ | ० | ० |
| व्रत कौमुदी …. | ० | १२ | ० |
| प्रायश्चित्तेंदुशेखर. …. | ० | १२ | ० |
| नृसिंव्ह चंपू. …. | ० | ४ | ० |
| धर्मसिंधू. …. … | ३ | ४ | ० |
| धनंजय विजय काव्य. …. | ० | ४ | ० |
| अमरकोश सटिप्पण. … | १ | ० | ० |
| रामनवमी व्रतोद्यापन कथा. | ० | २ | ० |
| अनुस्मृती. …. …. | ० | ३ | ० |
| भीष्मस्तवराज. . …. | ० | २ | ० |
| अपरोक्षानुभूती. . …. | ० | ३ | ० |
| संस्कृत आरत्या. . . | ० | २ | ० |
| प्राकृत आरत्या. … | ० | १ | ० |
| पंचरत्नीगीता सोवळ्याचे बांधणीची. | १ | ४ | ० |
| रुपावळी. … | ० | २ | ० |
| समासचक्र. …. | ० | १ | ० |
| शिवकवच. …. | ० | २ | ० |
| पांडुरंग महात्म. …. | ० | ८ | ० |
| चमत्कार चिंतामणी. …. | ० | १३ | ० |
| बभ्रुवाहन आख्यान. …. | ० | ३ | ० |
| गोत्र मालिका. …. | ० | ४ | ० |
| काशीप्रकाश. . . | ० | १२ | ० |
| गायन प्रकाश. . . | ० | ४ | ० |
| सौभाग्य रत्न. . . | ० | ३ | ० |
| सामुद्रिक लक्षण. …. | ० | ८ | ० |
| हिंदुस्थानी एकादश स्कंध. | १ | ० | ० |
| शिवलिलामृतें उत्तम. …. | ११ | ० | ० |
| ,, दुसरी. …. | १ | ४ | ० |
| संतलीलामृत. …. | २ | ८ | ० |
| विवेक सिंधू. …. | ० | ८ | ० |
| दासबोध. . . . | ५ | ० | ० |
| चतुश्लोकी भागवत. …. | ० | ४ | ० |
| कर्मविपाक. …. . . | ० | ४ | ० |
| परनामृत. . . . | ० | ४ | ० |
| व्यंकटेश स्तोत्र. . . | ० | १ | ० |
| पंचायतन नामावली. …. . | ० | ३ | ० |
| शिवसहस्त्र नामावली. …. | ० | ३ | ० |
| ध्रुवचरित्र. …. …. | ० | १ | ० |
| भजन. . . . . | ० | १ | ० |
| चक्रव्यूह. . . . . | ० | १ | ० |
| रत्नमाला भास्कर दामोदर कृत. | ० | ६ | ० |
| सत्यनारायण व्रत कथा.प्राकृत. | ० | ४ | ० |
| भुपाळ्या. . . . . | ० | १ | ० |
| धावे. . . . . | ० | १ | ० |
| हरिपाठ. . . . . | ० | १ | ० |
| अमृतरावाचे कटाव शुकरंभा चरित्र | ० | ४ | ० |
| नलाख्यान. . . . | ० | ३ | ० |
| आर्या मोरोपंती उद्योग पर्व. | १ | ८ | ० |
| ,, ,, वनपर्व. | १ | ८ | ० |
| ,, ,, द्रोणपर्व. | २ | ० | ० |
| ,, ,, मंत्ररामायण. | १ | ८ | ० |
| वामन पंडितकृत श्लोक संग्रह भाग पहिला. | ० | १२ | ० |
| सदर्हू भाग दुसरा. . . | ० | १२ | ० |

### वाचन संबंधी

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| हिंदुस्थानी वेताळ पंचविशी. | १ | ० | ० |
| ,, सिंहासन बत्तिशी. | १ | ० | ० |
| मराठी वेताळ पंचविशी. . | ० | ८ | ० |
| सुरस व रागदारीच्या लावण्या. | १ | ४ | ० |
| चमत्कारीक गोष्टी. . . | ० | ८ | ० |
| घाशीराम कोतवाल. . | २ | ० | ० |
| बहारदानीष भाग १ . | ० | ८ | ० |
| ,, भाग २. . | ० | ८ | ० |
| रुक्मिणी हरण नाटक. . | १ | ८ | ० |
| हरिश्चंद्र नाटक. . . . | १ | ० | ० |
| विराटपर्व नाटक. . . | १ | ० | ० |
| विक्रमोर्वशी नाटक (संकृत ) | ० | ८ | ० |
| वालीबध नाटक. . . . | ० | ६ | ० |
| आगगाडीचें नाटक. . . | ० | ५ | ० |
| इंग्रजांची बखर. . . . | ० | ६ | ० |
| वसंतमाला. . . . . | १ | ४ | ० |
| सर्वेपरिज्ञान. . . . | ३ | ० | ० |

### मुलांकरितां पुस्तकें.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| बालज्ञान. . . . . | ० | २ | ० |
| इंग्रजी पहिलें पुस्तक उच्चार व अर्थ यांसहित. | ० | ३ | ० |
| भुगोलविद्या. . …. | ० | २ | ० |
| बालव्याकरण. …. | ० | ० | ९ |
| स्कूलडायलाग. …. . | ० | २ | ० |
| अंक लिपी. . . | ० | १ | ६ |
| अंकगणित प्रश्नसमुदाय. . | ० | ५ | ० |
| तोंडचे हिशेबाचीं पुस्तकें. . | ० | १ | ६ |
| कित्ता मोडीचा. . . . | ० | ० | ६ |
| कित्ता बाळबोध. . . | ० | ० | ३ |

हीं पुस्तकें रोख किमतीस वऱ्हाड समाचार छापखान्यांत विकत मिळतील. बाहेर गांवचे नेणारांस डांकहाशिल शिवाय पडेल.

---

### किमतीचे ठराव.

| | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| एक अंकास … … | | ६ |
| फुटकळ … … … | ० | ६ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

### नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०४
एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

### TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribert that their Subscriptions, for the presens and past years, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

---

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत मागेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ०६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर

---

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरु केलें त्यास सवा दोन वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं कस्न

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धे आण्या प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० के०

# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. V, AKOLA :—SATURDAY EVENING, JANUARY 15, 1870 NO. 3

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १५ माहे जानुएरी सन १८७० इ० अंक ३


### कायद्यासंबंधी नवीन मासिक पुस्तक

## वऱ्हाडरिपोर्टर.

अकोलें एथें कित्येक गृहस्थांची कमिटी होऊन विच्यार ठरला आहे कीं, वऱ्हाडांतील कामदार, वकील वगैरे लोकांच्या उपयोगाकारितां कायद्या कानूसंबंधी व सरकारी कामकाज आणि कामदार यां संबंधी माहितीचें दर महिन्यास एक स्वतंत्र पुस्तक काढित जावें, व वऱ्हाडरिपोर्टर असें त्यास नाव द्यावें. त्याप्रमाणें सर्व सिद्धता करून हल्लीं या जाहिरातीवरून सर्वांस कळविण्यांत येतें कीं, सन १८७०इसवीचे जानुआरी महिन्यापासून हें पुस्तक निघेल, व प्रतिमहिन्याचे अखेर तारखेस वाटलें जाईल. हें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत टाइपावर सुंदर रितीनें छापिलें जाईल, व थोरल्या चतुष्पत्री साच्याचीं याचीं ३२ पृष्ठें असत जातील. यांत विषय येतील ते येणेंप्रमाणें:—

१. ला आफ एव्हिडन्स, ला आफ कंट्राक्टस्, ला आफ टार्टस्, जूरिस्प्रुडन्स, इक्विटी, इत्यादि कायद्यांसंबधी महत्विक विषयांवर इंग्लिश विद्वानांनीं वेगवेगळे उत्तम ग्रंथ केलेले आहेत त्यांतील निवडक वेच्यांचीं भाषांतरें, किंवा निर निराळ्या ग्रंथ कर्त्यांच्या व्याख्या, अथवा त्यांवर निबंध.

२. मुंबई, मद्रास, व कलकत्ता हायकोर्टांचे ठराव, पंजाब व लखनौ चीफ कोर्टांचे ठराव, हैदराबाद रेसिडेन्सी कोर्टाचे ठराव, व वऱ्हाडच्या दोन्ही भागांच्या कमीशनरांचे ठराव, यांतून जे जे विषय उपयोगाचे व महत्विक असतील ते.

३. न्यायखात्या शिवाय मुलकी, पोलिस वगैरे खात्यांतील वऱ्हाडास लागू ठराव, सर्क्युलरें वगैरे.

४. सिविल प्रोसिजर, क्रिमिनल प्रोसिजर, पिनलकोड वगैरे मोठाले कायद्यांवर कामेंटरीज् म्हणजे टीका झालेल्या आहेत त्यांतून कधीं कांहीं भाषांतरें.

५. हिंदुस्थान सरकारचे नवीन कायदे ठरतील व वऱ्हाडास लागू होतील त्यांचीं मराठी भाषांतरें.

६. वऱ्हाडांतील सरकारी कामा विषयींच्या, कामदारांविषयींच्या, व कायद्या कानू विषयींच्या खबरा; तसेच कोणी कायद्याच्या अगर वहिवाटीच्या बाबदींत सवाल घातले, अगर घातलेल्या सवालास समर्पक उत्तरें दिलीं तर त्या विचक्षणा, व अशाच प्रकारचे इतर किरकोळ विषय.

---

इतकीं प्रकरणें दरमहा या पुस्तकांत थोड्या बहुतानें घेतलीं जातील व तीं वेगवेगळीं काढून घेऊन स्वतंत्र पुस्तक बांधितां यावें अशा सोई करितां त्यावर पृष्ठांक वेगवेगळे घातले जातील.

या पुस्तकांतील मोठ्या महत्वाचें जें पहिलें प्रकरण सदरीं नमुद केलें आहे तें तयार करून देण्या विषयीं रा. रा. विष्णु सदाशिव पिसोळकर एथील कमीशनर साहेबांचे क्लार्क आफ धि कोर्ट यांनीं साहेबांचे परमाणगीवरून कबूल केलें आहे व त्यावरूनच या कमिटीस या पुस्तकाचे काम हातीं घेण्यास विशेष उत्तेजन आलें. आहे.

### या पुस्तकाची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचो अगाऊ दिल्यास | ६ ८० |
| " मागाहून. " | ७८८ |
| सहा महिन्याची अगाऊ दिल्यास | ३८८ |
| " " मागाहून " | ४ |
| फुटकळ एक महिन्याचे अंकास | ८१२ |

बाहेर गावचे घेणारास टपाल हाशिला बद्दल वर्षाचे बारा आणे सदरहू किमती शिवाय द्यावे लागतील.

पुस्तक घेण्याचें सुरू केल्यापासून वर्षाची अगाऊ किंमत देणें ती दोन महिन्यांचे आंत, व सहा महिन्यांची देणें तर एक महिन्याचे आंत दिली पाहिजे. हें पुस्तक घेऊं इच्छिणारांनीं आपलीं नांवें अकोल्यास खालीं सही करणराकडे अगर रा. रा. खंडेराव बाळाजी फडके वऱ्हाडसमाचारकर्ते यांजकडे पाठवावीं.

वऱ्हाड प्रांतीं हा उद्योग पहिलाच आहे व तो चांगल्या रितीनें सफळ व्हावा अशी इच्छा आहे, आणि तो आश्रय दात्यांचे कृपादानावर अवलंबून आहे; या साठीं बहुत युरोपियन कामदार गृहस्थ व वकील लोक या अल्प सेवेचा आदर करून या प्रयास आश्रय देतील अशी आशा आहे व [illegible] घडल्यास त्यांचे उपकार मानूं.

तारीख १ जानेवारी सन १८७०

देवराव विनायक वकील
वऱ्हाडरिपोर्टरचे
म्यानेजर.

---

### शिक्षक मित्र

हें पुस्तक ता० १५ फेब्रुआरी सन १८७० च्या सुमारास तयार होईल. ह्यांत मास्तर लोकांस आणि मास्तर होऊं इच्छिणारे लोकांस उत्कृष्ट साह्य करणारे विषय आहेत. ह्या मासल्याचें पुस्तक अद्याप पर्यंत झाल्या विषयीं आमचे ऐकण्यांत आलें नाहीं याजकरितां सर्व विषयांचें वर्णन यांत श्रमानें केलें आहे. ह्या पुस्तकाची किंमत एक महिन्याचे आंत आगाऊ पाठविणारास टपाल खर्चासुद्धां ११ आणे, नावें मात्र पाठविणारांस १३ आणे व मागांहून घेणारास १४ आणे पडतील. ह्या पुस्तकाचे संबंधानें किंमतीचे पैसे किंवा पत्र पाठविणें झाल्यास नाशिक येथें ज्ञानमंदार छापखान्याचे म्यानेजर यांजकडे पाठवावें नाटपेड पत्रें स्वीकारलीं जाणार नाहींत. तरी या कामास सर्वांनीं विशेषें करून स्कूलमास्तर लोकांनीं साह्य करावें अशी आमची प्रार्थना आहे.

हरि भास्कर टिळक
एडिटर आणि म्यानेजर ज्ञा. मं.
गंगाधर रघुनाथ पुरंदरे.
अ. स्कूल मास्तर.

## वऱ्हाडसमाचार.

शनिवार सायंकाळ ता० १५ जानुआरी.

लाभीं हर्ष नको विषादहि नको निंदा प्रशंसा नको ॥ हानीचा मनिं शोक तूं धरू नको देहीं अहंता नको ॥ कोणाचें इतिकृत्य तें स्मरू नको माझें तुझें हें नको ॥ आप्तांशी ममता नको गुरुपरब्रम्हासि सोडूं नको ॥ १ ॥

---

अकोला शहरांतील विद्वज्जनांस ठाऊकच आहे कीं फार दिवस झाले परंतु ह्या शहरांत एकादी सार्वजनिक सभा स्थापन झाली नाहीं. प्रस्तुत सभा उत्पन्न हाण्यास कांहीं अडचणी नाहींत अशा समजुतीनें आमच्या कांहीं मित्रांनीं पुढील जाहिरात प्रसिद्ध करविली आहे.

### जाहिरात

"सर्व विद्वज्जनास कळविलें जातें कीं एकादी ज्ञानवृद्धिप्रयत्नप्रवर्तक सभा अकोलें मुक्कामीं असणें हें फार इष्ट आहे. अशी सभा उत्पन्न करण्या विषयीं हेतु पुष्कळांच्या अंतःकरणांत गर्भित असेल ह्यांत संशय नाहीं परंतु तो हेतु दृश्य होण्यास प्रतिबंधक जो विद्वत्तातारतम्यज्ञानसंजनित लज्जा तिचें पटल दूर करून हेतुरूप स्फुलिंगास प्रखर होण्यास इंधनीभूत जो विद्वत्समागम त्याची संधी दवडूंनये. ही गोष्ट जाणविण्यास व एक सार्वजनिक सभा स्थापित करण्याची सामग्री सिद्ध करण्यास येत्या शनिवारीं म्हणजे ता० २२ जानेवारीस वऱ्हाड समाचार हपिसांत रात्रौ ८ वाजतां विद्वज्जनांनीं येण्याची मेहर्बानी करावी."

हा उद्देश फार स्तुत्य आहे. व अकोल्याचे लोकांनीं या कामीं अवश्य झटावें असें आमचें आग्रहपूर्वक त्यांस सांगणें आहे.

---

(लिहून आलेला मजकुर.)

## ईश्वरप्रार्थना.

आलीकडे दिवसानुदिवस ज्या त्या कामांत लोकांनीं सुधारणा करण्याचा क्रमानें सपाटा चालविला आहे. अमक्या कामांत सुधारणेचें पाऊल नाहीं असें क्वचित, परंतु त्या सर्व चालींत इंग्रजांचें अनुकरण केलें आहे असें स्पष्ट दिसतें. आणि तेंही ठीकच "यथा राजा तथाप्रजा" हल्लीं ईश्वरप्रार्थना करण्याची तऱ्हा लोकांनीं काढली आहे हें फार चांगलें आहे व असें अगदीं अगत्याचें आहे. अनंतकोटिब्रम्हांडनायक सृष्टिकर्ता जो भगवान त्याची प्रार्थना सर्वांनीं मिळून करणें हें त्याणें दिलेल्या सर्व वस्तूंविषयीं आपण त्याचे ऋणी आहोत असें कृतज्ञतापूर्वक दाखविणें आहे आतां या प्रार्थनेच्या नवीन चालीचा विच्यार केला असतां ही चाल आमचे देशत व लोकांत प्राचीन काळा पासून चालू आहे अशी खात्री होते. मात्र इतर सर्व चालींमध्यें ज्याप्रमाणें फेरफार झाला आहे त्याप्रमाणें ह्या चालींतहि जाहला आहे. तरी सांप्रत नवीन तरुण विद्वानांनीं जी अगदीं नवीन तऱ्हा काढिली आहे त्यापेक्षां तितका फेरबदल झालेला काढून टाकते तर फार चांगलें झालें असतें. आणि वास्तवीक पाहिल्यांत पुढें होतां होतां आमच्या जुन्या चालीच्या वळणावरच ही नवीन तऱ्हा जावयाची असें अनुमान होतें. कारण त्या जुन्या चालींत त्याज्य अशा गोष्टी थोड्याच आढळतील. यास्तव तितक्या काढून टाकाव्या व ती सुधारावी येणें करून इग्रजांचें अनुकरण म्हणजे नक्कल केल्याचा दोष येणार नाहीं व निर्दोष पणें सर्व लोकांस मान्य होऊन तेही अनुकूल होतील व ग्राह्य करतील. अशी ती ईश्वर प्रार्थनेची जुनी चाल कोणती म्हणाल तर ऐका, जिला आपण कथा अथवा कीर्तन असें म्हणतों ती. या कीर्तनाचा मूळ उद्देश बहुतांनीं एकत्र जमून ईश्वरप्रार्थना करावी असाच खरा, आणि विच्यार करून पाहिल्यास एकसारखे फार वेळ बोलणारास कंटाळा येऊन त्याचें तोंडही दुखूं लागेल. तसेच ऐकणारांसही कंटाळाच यावयाचा. यास्तव लोकरंजनार्थ व विश्रांती करितां त्यांत वाद्यांचा व सुरस गायनाचा उपयोग होऊं लागला. हें नीटच झालें परंतु अशी ईश्वरभक्ती केल्याचें फळकाय ? हें सांगून अशी भक्ती केली कोणी व कोणास तेणेंकरून काय फल प्राप्त झालें हें सांगतांना दाखल्या करितां कांहीं भगवद्भक्तांच्या गोष्टी मध्यें येऊं लागल्या. असें होतां होतां अज्ञानजनमनरंजनार्थ व निद्रापारिहारार्थ हसण्याकरितां त्यांत कांहीं नकलांचाही प्रवेश झाला. या शेवटचे चालीपासून तर मूळ हेतूस फारच धक्का बसला व तिचाच फैलाव फार झाला. हल्लीं जे हरदास आपण पाहतों व ज्या कथा आपण ऐकतों त्यांत नकलांचेंच प्राबल्य व तोच गुण विशेष. मूळतत्व जाणणारे अगदीं कमी. मात्र आरंभीं थोडें ब्रम्ह निरूपण करितात व मध्यें कांहीं तरी आख्यान सांगून शेवटीं पुनः पूर्वपदावर येतात.

कीर्तनाप्रमाणेंच पुराण हा एक ईश्वर प्रार्थनेचा प्रकार आहे परंतु त्यांत इतिहासाच्या गोष्टी फार असून कवीनें लाघव करून अतिशयोक्तीची तर सीमाच करून सोडली आहे.

अज्ञान शूद्रादिकांत या ऐवजीं गोंधळ होत असतात.

सारांश सर्व लोकांत एकत्र जमून ईश्वर प्रार्थना करण्याचा प्रकार पहिल्यापासून आहे मात्र मूळ हेतू मनांत आणून त्या प्रमाणें होऊं लागल्यास नवीन तऱ्हा काढण्याचें कारण नसून श्रमही करावे लागणार नाहींत. त्यांतच सुधारणा केली पाहि

जे. प्रथम त्यांतील पांचट नकला व अति लांघवी गोष्टी काढून टाकल्या पाहिजेत आणि सृष्टीरचनेची, तिचे सौंदर्याचीं वर्णनें व जगदीशाची स्तुती यानीं भरलेल्या सुंदर कविता असाव्या.

(पुढें चालू)

## अकोल्यांतील कापसाचा तग.

आम्हांस "फिरस्ता" या सहीचें येक पत्र आलें आहे त्यांत तो असें लिहितो कीं "मी अकोटास गेलों होतों तेथील कापसाचा व्यापार पाहून मला खुशी झाली. नंतर खामगावास गेलों तेथें तर कापसाच्या तगाची, गिराहिकांची आणि बोजांची गरदी पाहून माझें मन भांबावलें. पुढें फिरत फिरत अकोल्यास आलों. दोन वर्षां मागें याच हंगामांत मी अकोल्यास आलों होतों तेव्हां येथें तग नव्हता, व्यापारी नव्हते, कापुसही बव्हता आणि हाली येऊन पाहातों तों मोठाच फरक नजरेस पडला. शहराचे व पेठेचे दरम्यान भव्य पटांगण राखून त्यांत कापसचा तग मोठा मांडला आहे. आंत इमारती होत आहेत, सडका आहेत, दाबण्याचे प्रेस मांडले आहेत, कपाशीचे शकडा बोजे पडले आहेत, उदमी व दलाल यांची दिवसभर गर्दी होऊन राहिली आहे, वजनें चाललीं आहेत हें पाहून अति आश्चर्य वाटलें. माझा येक मुनीम व्यापारा करितां अकोल्यास आहे परंतु अकोल्यांत कापसाचा व्यापार एवढा मोठा जमला असेल असें मला बिलकुल वाटलें नव्हतें. पुढें तपास करितां खामगावचे खालोखाल येथें घडामोड होत आहे असेंही दिसून आलें या हंगामांत खामगावास २००० बोजे आले व अकोल्यास १७०० आले यावरून एथेंही असाच क्रम चालेल तर फार मौज होईल."

खरेंच आमच्या अकोल्यास तग होऊन थोडाच काल झाला आहे हें, व व्यापाराचें मान दिसत आहे हें मनांत आणिलें असतां फार संतोष होतो. खामगांवची पेठ जमल्यास पाच पंन्नास वर्षें झालीं आहेत आणि २ वर्षांत अकोल्यानें त्याच्या खालोखाल टूम उडवावी हें पाहणें वास्तवीकच मोठें समाधानाचें नाहीं काय? ईश्वर करो आणि येथील व्यापार दिवसानुदिवस अधिक भरभराटीने चालो व एथें इंग्लिश व्यापाऱ्यांच्या कंपन्या आणि वाफेचीं यंत्रें सुरू होवोत.

आम्हास वाटतें कीं अकोल्यांतील कापसाचे व्यापाराचे वढतीचे कामीं लोकांनीं सरकारी अधिकाऱ्यांचे उपकार मानिले पाहिजेत. त्यांच्याच प्रयत्नाचें हें फळ आहे व त्यांच्याच कृपेनें तें वृद्धीतें पावेल.

## वऱ्हाड.

**बुलढाणा**—तालुके चिखली मौजे मंढाळें या गांवीं या महिन्याच्या आरंभीं एक परमटकडील आफिसर आपल्या सर्व खटल्यासह उतरला असतां एक कोंबडी आणण्याच्या निमित्तानें त्याजवळील एका चपराशानें मौजे मजकूर येथील एका वडाऱ्याच्या बायकोशीं तंटा केला, आणि तिचे हातांतून बळात्कारानें कोंबडी हिसकून घेऊन त्या बाईच्या पोटावर एक काठी मारली. ती इतकी जोरानें लागली कीं, तिचे काळजास धक्का बसून ती बाई पाव तासाचे आंतच मरण पावली. हल्लीं तो शिपाई पोलिसाचे ताब्यांत असून त्याविषयीं इनसाफ चालू आहे. गोरे कातडयाच्या लोकांचे खाण्याचे जिन्नस मिळण्याकरितां काळ्या मनुष्याचा जीव घेतला तरी कांहीं चिंता नाहीं असा निकाल होईल कीं काय? असा आमच्या बातमीदारास संशय आहे. पण तसें होणारनाहीं. असाच या तालुक्यांतील देऊळगांव राजा या ठिकाणींही पैशाच्या लोभास्तव एका मोठ्या मनुष्याच्या खून झाला असें ऐकतों. तेथील चीफ कानस्टेबलची बदली होऊन त्या खुनाचे चवकशीस एक इन्स्पेक्टर व दोन चीफ कानस्टेबल गेले आहेत, तपासाअंतीं काय परिणाम होतो तो पहावा. श्री० रासुजीराव राजे हे एकाएकी खुर्चीवर बसले असतां मरण पावले म्हणून कांहीं संशयाचा मजकूर सरकारचे कानावर एका संभावित गृहस्थानीं घातला आणि तेंच कारण वरील मनुष्यांस तपासण्याकरितां पाठविण्याचें झालें असें समजतें.

ता० ८ रोजीं येथील असिस्टंट कामिशनर इलियट साहेब तालुक्यांतून फिरत असतां चिखली मुक्कामीं गेले होते. तेथील मुलींचे शाळेची परीक्षा घेऊन एका मुलीस रसिदंट साहेबांचे पत्नीनें पाठविलेले रुप्याचे पदकांपैकीं एक पदक बक्षिस दिलें. तें देण्या पूर्वी त्यांनीं थोडा मजकूर इंग्रजींत वाचून त्यांतील भावार्थ तेथील हेडमास्तर रा. रा. वामन कृष्ण देशमुख यांजकडून जमलेल्या लोकांस कळविला. मुलांची शाळा पाहून साहेब तर खुष झाले. परंतु मुलींचे शाळेची स्थिती चांगली नाहीं म्हणून त्यांस वाईट वाटलें. एथील मुलींची शाळा अलीकडे बरेच दिवस मोडकळीस आली आहे असें ऐकतों. एथील च्यार सुज्ञ व थोर गृहस्थांस स्त्रीशिक्षणापासून काय लाभ होतो व स्त्रियांस ज्ञान प्राप्त झाल्यापासून मुलांच्या स्थितींत फरक पडण्यास किती सुलभ व चांगलें साधन होतें हें समजत नसोंव असें नाहीं. पण त्यांनीं स्त्रियांचे विद्येकडे जास्ती लक्ष्य पुरवून मागें मिळालेलें नांव राखावें हें योग्य आहे.

**वणी**—जिल्ह्यांतील दारव्हे तालुक्यापैकीं कसेब नेर या गावाहून लाडखेडास जाण्याचा रस्ता लाडखेडचे जवळ घाट चढण्यास व उतरण्यास जरा खडतर आहे व त्यापासून एकादे वेळ जिवास धोका होण्याचाही संभव आहे म्हणजे गाडया माल भरून जाणाऱ्या खालीं मोडतात व उलटतात. तो गावकऱ्यांकडून अगर सरकारी कांहीं सांगशनानें दुरुस्त झाल्यास उपयोग होईल. बाजारचे मोठे कसबाचा जाण्याचा तो रस्ता आहे.

तहशिलदार दारव्हे यांणीं कितीएक कुरणें उगांतील गवत गावकऱ्यांचीं मोफाट जनावरें जाऊन खात असत तीं बारीकपणानें तपासून त्यांचा लिलाव करून सरकारी फायदा केला आहे. ही नजर सरकारी कामांत हुशारीचीच समजली पाहिजे.

शहर सुधारणुकेकडेल जेथें ३४ वें कलम लागू आहे तेथें सक्त नजर देऊन सफाई ठेवणें योग्यच परंतु जेथें ३४ कलम लागू नाहीं असल्या खेडे गांवांत अंमल चालविला असतां लोकांस त्रास होतो व अंमलदारांनीं तेथें सक्ती करणें हा जुलूम ते लोक समजतात.

एलिचपुरच्या उतरेस सुमारें ५ कोसांवर भैरव म्हणून एक देव आहे, तेथें प्रति वर्षी कार्तीक शुद्ध १५ पासून मार्गशीर्ष शुद्ध ५ पावेतों मोठी यात्रा भरते. सुमारें १००००० एक लक्ष किंवा सवा लक्ष मनुष्यें जमा होतात. यंदां यात्रा चांगली भरली होती. एलिचपुरचे डेपुटी कामिशनर क्यापटन स्पोन्स्की साहेब यांणीं यात्रेचा चांगला बंदोबस्त ठेविला होता. व्यापारी लोकांची दुकानें चांगल्या शिस्तीने बसवून बंदोबस्ताकरितां एक पोलिसचें ठाणेंही यात्रा उठे पर्यंत ठेविलें होतें. यात्रेस पाण्याचें फार दुर्भिक्ष होतें म्हणून व्यापाऱ्यांकडोन वर्गणी घेऊन तेथील झरे उपसून काढिले. व एक नवीन झरा खणला त्यास पाणीही चांगलें लागलें आहे त्यास छोटेंसें धरण बांधलें. या मुळें यात्रेस पाण्याची चांगली समृध्धी होऊन सर्व आबाल वृद्ध यात्रेची मौज पाहून सुरक्षित आपल्या घरीं गेले. एलिचपुरचे तहशिल० मि० याद अली यांणीं या कामांत चांगली मेहनत घेतली. ही एक महत्वाची गोष्ट आहे. त्या ठिकाणीं पाण्याचा मोठा काळ पडे व चोरटयाचें मोठें पिके. परंतु यंदां त्या बिचाऱ्यांस वाटाण्याची अक्षद लागली.

इलिचपुरचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर रा० रा० बाळकृष्ण शास्त्री कित्येक महिने रजेवर आहेत व अजूनही त्यांची प्रकृती बरी झाली नाहीं म्हणुन त्यांनीं आणखी च्यार महिन्यांची रजा घेतली व तोंपर्यंत रा० रा० वामन गणेश परांजपे हेच त्यांचें काम पाहतील. परांजपे यांची जळगावची हेड मास्तरची जागा पुष्कळ दिवस रिकामी राहिली आहे व कोणास नेमलें नाहीं तर आणखी ही च्यार महिने रिकामी राहून शाळा बिघडेल सबब रा० वासुदेव सदाशिव पिसोळकर यांस डायरेक्टर साहेबांनीं जळगावास तूर्त ५० रुपयांवर हेडमास्तर नेमिले आहेत पिसोळकर हे अकोला हाय स्कुलांत शिकलेले असून म्याट्रिक्युलेटेड आहेत. व त्यांस ही जागा पहिल्यानेंच मिळाली हें भूषण व उत्तेजन आहे.

**खामगांव**—येथें मे. ओडहौस साहेबांची नेमणूक झाल्यापासून या शहराचें मोठें भाग्य उदयास आल्यासारखें झालें आहे. साहेब मवसुफ सुधारणेच्या व लोकहिताच्या कामास मनापासून झटतात, व विद्वान आणि हुशार आहेत यामुळें ते लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांस आवडते असे झाले आहेत. ही अंमलदारांची काम करण्याची एक शैली आहे. अकोल्यास ७००० पोलिसपट्टिचा आकार होऊन गवगवा कितो झाला! पण खामगावास २२००० रुपये पट्टीचा आकार होऊन लोकांचा बोंभाट नाहीं. याचें कारण ओडहौस साहेबांनीं गरीब गुरीब व लहान व्यापारी यांजवर पट्टीचा बोजा विशेष म्हणण्यासारखा लादला नाहीं, ठोकळ असाम्यांवर मात्र पट्टी ज्यास्ती बसाविली त्यामुळें सरकारचें नुकसान नाहीं व रयतेस त्रास नाहीं अशी तोंड निघाली—खामगावास मुनसिपळ कमिटीचेंही काम काम फार सुरळीत चाललें आहे. नवे रस्ते व पूल चालू आहेत. शहरा बाहेरील नवीन पेठ वाढत आहे, दुकानें नवीं नवीं होत आहेत, जागयास व भाडयास तेजी येत आहे, युरोपियन व्यापाऱ्याच्या १०, १२ पेढया आहेत, शेकडों खंडया कापूस येत आहे, वाफेच्या यंत्रांनीं कामें चाललीं आहेत, व जिकडे तिकडे पैसा खेळत आहे हें पाहण्याची फारच मौज आहे. व आतां तर नुकताच हंगाम सुरू झाला आहे. तेव्हां येथील पेठेस दररोज अधिकाधिक शोभा येत जाईल असें म्हणण्यास हरकत नाहीं—सरकारी रेलवेचें काम खुप झपाटपानें चाललें आहे. जलमकडून ३ मैल रेल पसरले, व खामगावाकडुन दोन मैल खडी टाकून रस्ता दारेसुत तयार केला, मधील दोन मैलांचे टप्यांत लहान ओढयांच्या पुलांचें काम चाललें आहे व तेंही आठ पंधरा दिवसांत पुरें होईल. नंतर रेल पसरून पुढील महिन्याच्या १५ वे तारेखस आगगाडया जाण्या येण्यासारखी रस्त्याची सर्व सिद्धता होईल. व फेब्रुवारी अखेर गवरनर जनरल साहेब येऊन आगगाडी चालू करण्याचा समारंभ करणार आहेत—विद्याखात्याच्या डायेरक्टर सा० ची स्वारी येथें आली आहे. इंग्लिश मराठी, हिंदुस्थानी, व मुलींची अशा तिन्ही शाळांच्या परिक्षा झाल्या. बक्षिसें वाटण्याचा समारंभ शुक्रवारीं होणार होता त्याची हकिकत पुढें कळवू. इंग्लिशमराठी स्कुलाचा बेतबात, मुलांचा अभ्यास, व मास्तरची तत्परता पाहून साहेब फार खुषझाले. हें तेथील मि. एदलजी हेडमास्तर यांस भूषण होय. व तेत्या भूषणास लायक आहेत असा आमचा अभिप्राय आहे.

## अकोला.

The Commissioner West Berar received a telegram from Calcutta purporting that Lord Mayo viceroy and Governor General of India, will visit Khamgaum to open the state railway about the end of February 1870. His Royal Highness the Duke of Edinburgh, it seems, will not be able to visit Berar.

The moment the state railway-work is completed Mr. Izat our energetic Executive Engineer will commence the bridge over the Morna River. We hope the Executive Engineer will so expedite the bridge work as to profit the Akola public thereby during the ensuing monsoon.

We are happy to announce that Major Allardice and Captain Ford are expected back to Berar about the end of this month.

We are glad to state that Dr. Sinclair our able Director, who visited Khamgaum during the last week, examined the schools of that town and being satisfied with the proficiency of pupils and with order and discipline of schools specially of the English Marathi School, awarded prizes to the successful students, and we hear he has now procceded towards Basim.

It is gratifying to record that Mrs. Saunders has very generously transmitted silver medals to be awarded to each of the female schools in Berar and accordingly Dr. Sinclair during his recent visit to Khamgaum presented one to the best pupil of the female school there.

Our Akola Library building is now completed, and it will be opened with usual ceremony by Mr. Lyall our commissioner on monday morning the 18th Instant.

शेगावास गेल्या महिन्याचे अखेरीस अकोल्याचे पोलिस सुपरइंटेंडंट क्या० जेमिसन साहेब यांनीं पाटिल पटवारी लोकांची सभा भरविली होती. व तींत मौजे आपातापा येथील मानाशींग पाटिल यानें खोपरखेडयाचे डाक्यांत चांगली मदत केली होती त्याबद्दल त्याची शिफारस करून त्यास बक्षीस दिलें. दुसरे जे जे लोक अशी चांगली सरकारास मदत करितील त्यांची वाहवा होईल व त्यांस बक्षीस मिळत जाईल असें बोलले. हे पोलीस सुपरइंटेंडंट इकडे आल्यापासून गुन्हे फार थोडे झाले व तेही बहुतेक पत्यांत आले आहेत असें ऐकण्यांत आहे.

असें ऐकण्यांत आलें आहे कीं मेजर अलार्डाइस साहिब व क्यापटन फोर्ड साहेब विलायतेस रजेवर आहेत ते या महिना अखेरीस इकडे येणार.

विद्याखात्याचे डायरेक्टर डाक्टर सिंक्लेयर साहेब खामगावाकडे आहेत व तेथून बाळापूर, वाडेगाव व पातुर येथील शाळा पाहून वाशिमाकडे जाणार असें ऐकण्यांत आहे.

थंडी पुष्कळ पडूं लागली आहे. व हवा स्वच्छ आणि निरोगी झाली आहे.

मि० ऐझेट साहेब खामगाव रेलवे कडे मदतीस गेले आहेत ते ८।१० दिवसांनीं परत येतील व नंतर येथील नदी वरील पुलाचें काम झपाट्यानें सुरू होणार आहे असें कळतें.

कमिशनर साहेबांची स्वारी येथेंच आहे. या आठवड्यांत पुसद तालुक्याकडे जाणार असें ऐकतों.

कमिशनर साहेबांस तारायंत्रांतून वर्तमान आलेलें त्यांनीं मेहेरबानीनें आम्हांस कळविलें आहे तें हें कीं—खामगावची रेलवे फेब्रुवारी महिन्याचे १९ वे तारखेचे सुमारास पुरी होईल. व त्याच महिना अखेरीचे सुमारास गवरनर जनरल लार्ड मेयो हे खामगावास येऊन आगगाडीच्या सुरवातीचा समारंभ करितील, व या समारंभास आपले महाराणी साहेबांचे चिरंजीव ड्यूक साहेब हिंदुस्थानांत आलेले खामगावास येतील असा अजमास होता परंतु त्याप्रमाणें दुसऱ्या कित्येक विशेष कामामुळें त्यांचें येणें होत नाहीं.

## जाहिराती.

**नो**टिस—बमनजी उकडजी आणि कंपनी,—गंगाधर जोरावरमल्ल,—वहुलासराय वस्ती अकोला यांस रामलाल बाबणलाल वस्ती अकोला याजकडून देण्यांत येते कीं, आपणाकडून नोटिस वऱ्हाडसमाचार अंक १ पुस्तक ५ तारीख १ जानेवारी सन १८७० इसवीचे पत्रांत आली ती तारीख ६ माहे मिनहूस मजला पावली तिचें उत्तर देतों तें येणें प्रमाणें:—

१. या नोटिशी पूर्वी आपणाकडून एक पत्र रजिष्टर आलें त्याचें उत्तर इकडून देण्यांत आलें आहे. दुसरें पत्र मुद्दाम आलें, त्याचेंही उत्तर इकडील साकल्य वर्तमानसहित देण्यात आलें आहे तीं दोन्ही उत्तरें आपणास पावलींच आहेत त्याजवरून या नोटिशीचा जाब देणें उरला आहे असें नाहीं परंतु दाखला रहाण्यावर नजर देऊन या नोटिशीचाही जाब देत आहे.

२. मेहेरबान शेट गंगाधर जोरावर मल वहुलासराय या उभयतानींही त्या नोटिशी खालीं सह्या केल्या तें पाहून मात्र आश्चर्य भासलें. कारण कीं, मेहेरबान बमनजी उकडजी हे आपले जिमदारीचे कामाचे जबाबदारीस सिद्ध असून आम्हाकडील हिशोब मागत आहेत हें त्यांस योग्य होतें. परंतु हे उभयतां उमरावती जिल्ह्याचे कामाचे जबाबदारींतून मुक्त आहेत कीं काय हा विच्यार मेहेरबान बमनजी उकडजी करतीलच आणि मेहेरबान बमनजी उकडजी यांणीं एकंदर माझे सुद्धां त्रिवर्गांस नोटिस देण्याची होती तसें केलें नाहीं व असें झाल्यानें जे जबाबदार तेच जबाबसंबंधीं नोटिस देणार असें होतें तेव्हां दिलेली नोटिस कपटाची आहे असें मानिलें पाहिजे.

३. नोटिसींत हिशोब बेभरवशाचा दिल्या बदल लिहिलें त्यास मी हिशोब मुळींच दिल्हा नाहीं मेहेरबान गंगाधरजी सेट यांचे जवळ सर्व आरंभा पासून कागद पत्र हिशोब वगैरे आहे त्यांणीं आपणास दिल्हा असल्यास नकळे परंतु त्यांस उचित होतें कीं माझे अनुमतानें हिशोब देण्याचा होता आणि माझी सही त्यावर घेण्याची होती तसें त्यांणीं केलें नाहीं त्याप क्षी बिन माहितगार माहितीचा काय जवाब देईल हें आपण जाणतच आहात.

४. इलिच पुरचे डी. दप्तरचें काम मेहेरबान हुलासरायजीचे अंकित होतें त्यांणीं तो हिशोब आज पर्यंत मजला दिल्हा नाहीं आतां ते व गंगाधरजी येकत्र होऊन हिशोब काय समजले असतील तें खरें.

५. वह्या व इतर कागद मागून नेल्या बद्दल आपण नोटिशींत लिहिलें त्यास मेहेरबान बमनजी उकडजी साहेब यांचा तगादा हिशोबाविषयीं लागला तेव्हां मे० गंगाधरजीस कळविला त्यांणीं कारकून व गुमास्ते बसऊन हिशोब तयार केल्याचें कळतें. परंतु माझा अधिकार या बाबतींत असून मजला त्यांनीं निराळे कां केलें असेल हें समजत नाहीं. जेव्हां तगादा निविष्ट आहे म्हणून म्हटलें तेव्हां त्यांणीं २ वह्या खात्याच्या व सहा वह्या तपशिलाच्या माझे हवालां केल्या यांशिवाय एकही इतर कागद दिला नाहीं. ज्या वह्या दिल्यात्यांत जमाखर्च शेवटपर्यंत नाहीं व मागून रुपये ४१००० आणिले त्याची काय व्यवस्था हेंही त्यांत नाहीं आणि शराकतनाम्यांत पैसा तिऱ्हाइताकडे असावा तोही नेम पुरा कोणींच केला नाहीं व मख्यासंबंधीं सामान वगैरे तेंही त्यांणींच घेतलें त्याचाही जमाखर्च नाहीं मे. बमनजी उकडजी यांचे जलदीमुळें आम्ही वगैरेस हिशोबाविषयीं म्हणावें तर ते सर्व सेटसाहेबांचे विद्यमानाचे आणि गुमास्ते वगैरे असून त्यांचे अंकितांत आहेत त्यापक्षीं आम्हांसीं रुख मिळत नाहींत तेव्हां मेहेरबान बमनजी उकडजी यांणीं त्रिवर्गांस धरल्याखेरीज हा प्रकार निदर्शनास येणार नाहीं. कारण ज्या कारणास नोटिस दिली तें कारण त्यांणीं आपलेजवळ ठेऊन ज्याचेजवळ हिशोब नाहीं त्यास नोटिस देऊन मेहेरबानापाशीं खरेंपणा दाखवितात ही हिमतीची गोष्ट आहे. आतां कपट भावीक लोक येकीकडे राहून मेहेरबांन बमनजीचे चित्तांत मीच लबाड दिसलों तेव्हां मिळून केलेले धंद्याचें फळ अगोदर इतकेंच मात्र माझे पदरांत पडलें आहे. अस्तु जशी कंबरबंदी मेहेरबान बमनजी उकडजी यांणीं हिशोबाचे सफयी विषयीं केली आहे तशी शेवटपर्यंत राहून सकळ सफाई व्हावी अशी आशा त्यांचे पासून आहे.

६. न्याय जो आहे तो अपराधी व निरपराधीपणाची तुळणा करित आहे आणि न्यायाचे कोटींत तरी जो परिणाम आपसांतील उघड किंवा ऐकीव आहे तोच येणार परंतु शेट साहेबांची इच्छा त्या हद्दी पर्यंत पोहोचविण्याची असल्यास माझा उपाय नाहीं. मी जो जो समय प्राप्त होईल त्यास सादर होणें भाग पडल्यास हजर होईन परंतु माझी वासना नाहीं. बाकी सफाई विषयीं ईच्छित आहे व झाल्या सफाईतच माझा फायदा आहे.

७. अधिकार तुम्ही चवघांनीं प्रथमारंभीं मजला दिल्हा व पुढें तुम्हीच मजला सोडून आपआपली वहिवाट केली व मजला जे त्या उभयतांनीं काम सांगितलें तें मीं केलें. आतां हिशोबाविषयीं परिणामीं त्यांणीं मजला दाखवावें व आपण येकीकडे राहावें हें मात्र उचित नव्हतें. अस्तु आतां मी हिशोब किंशोब त्यांचे अंकित असल्यांत पराधीन आहे व पराधीन होण्याचें कारण विश्वास. जर तसा विश्वास न ठेऊ तर चालते धंद्यास व्यत्यय येता त्यापक्षीं, मेहेरबान बमनजी उकडजी याणी मजसुध्दां आम्हां त्रिवर्गांस ही या बाबतींत धरावें अशी इच्छा आहे ती ते पूर्ण करितीलच. या हिशोबा संबंधी जे मुळा पासून कारकून गुमास्ते सेटजीचे होते ते आताही होनह्यात असून त्यांचे अंकित आहेत. सर्वांस सेटसाहेबानीं मिळवून हिशोब आज रुई वाजवी माझे मुकाबिल्यानें करावा. मी सर्वस्वी हजर आहे व दिलापासून इच्छा धरून होतों. मुळींच मजकडील अधिकार त्यांणीं योग्य रीतीनें चालविला नाहीं. जर चालविते व कायम ठेविते तर मी त्यांस लिप्त न करितों. जसे ते मुळापासून लिप्त आहेत तसे आतांही राहून हिशोब मजला समजाऊन द्यावा हें त्यांस उत्तम आहे.

सदर्हूवरून मजकूर ध्यानांत ठेवावा कळावें ता० १४ जानेवारी सन १८७०

(सही) बाबणलाल रामलाल साहू मक्तेदार दस्तुर खुद.

---

**नो**टिस—राजश्री राघोजी वलद जानजी माळी वस्ती कसबे वाडेगांव तालूके बाळापूर यांस खामगांवाहून धन सुखदास नथमल कोठारी यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हाकडे आमची खाते बाकी संमत १९२४ कार्तीक शुद्ध १ पावेतो तुमचे रुजूंन रुपये २१८७॥= येकावि शे सत्यासी रुपये दहा आणे शिवाय व्याज असें घेणें आसून तुम्ही आज पावेतो कांहिच उलगडा केला नाहीं सबब ह्या नोटिसिनें तुम्हांस कळविण्यांत येतेकीं ही नोटीस तुम्हांस पोचल्या पासून पंधरा दिवसचे आंत सर्व व्याजा सुद्धां रुपयांचा उलगडा करून द्यावा न केल्यास या नोटिसीचे खर्चा सह सर्व रुपये येकंदर वसूल कर्णे करितां कोर्ट मार्फत तजविज करण्यांत येईल हें तुम्हांस कळावें तारीख २८ दिसेंबर सन १८६९ इसवी. मुकाम खामगाव.

(सही) धनसुकदास नथमल.

---

**नो**टिस—कादरखा बेद मुसलमान वस्ती ताजनापेठ यांस कळावें कीं अम्हापाशीं तुम्ही ज्यानमंहमद मोमीन याचे मार्फत करार केला कीं मी शेख आहे तुम्ही आपली मुलगी नामे बुऱ्हाण मजला द्यावी त्याजवरून तुम्ही चांदीच्या जिनसा व कापड किमंत रुपये ५ च्या दिल्या व आम्ही आपली मुलगी देण्याचा निश्चय केला हल्लीं तुम्हीं शेख नसून पठाण आहां तेव्हां आमची व तुमची सोयरीक होत नाहीं करितां या नोटिशीचे तारखेपासून आपल्या जिनसा न्याव्या, जर मुदती प्रमाणें न न्याल तर पुढें तुमची कांहीं एक सबब ऐकली जाणार नाहीं व या नोटिसीचा सर्व खर्च घेतला जाईल कळावे तारीख १४ माहे जानेवारी सन १८७० इसवी मुकाम अकोलें.

(सही) इमाम मुदीन वलद सेख जमन मुसलमान वस्ती ताजना पेठ निशाणी खुद हातची.

---

**नो**टिस—मुळचंद गंगारामजी साहू दुकान परगणें लाडनापुर तालुके जळगांव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही तारिख १९ माहे डिसेंबर सन १८६९ इसवी चे वर्तमान पत्रांत नोटिस दिली कीं आमची जागा लाडना पुरीं आहे ती तुम्ही पंधरा दिवसाचे आंत खाली करून द्यावी नाहीं पेक्षां दिवाणी कोडतांत फिर्याद करूं त्यास भाइजी तुमची व आमची या जागेच्या बाबतींत ओळख देखील नाहीं आम्हांस एथें येऊन राहाण्यास सुमारें वीस बावीस वर्षें झालीं ते वेळीं गावकरी यांणीं आम्हांस पाडित जागा दाखवून दिली ती जागा आम्ही आपले पैशानें तयार करून आज पावेतो राहतो व सरकारास जागेची पट्टीही देतों विनाकारण आम्हांवर नोटिस दिल्यानें उतर देणें पडलें त्यास सदरहु नोटिसीचे उत्तराचा खर्च व आकोल्यास जण्या येण्या बदल जो खर्च लागला ते रुपये आज पासोन आठ दिवसांत आमचे दुकानीं दाखल करणें नाहींपेक्षां सदरहु रुपया बद्दल व विनाकारण नोटिसीनें आमची इजत घेतल्या बद्दल रितीप्रमाणे दिवाणी कोडतांत फिर्याद करूं कळावें तारिख १० माहे जानेवारी सन १८७० इसवी.

(सही) गिरधारीलाल रामसुक ताटवाती.

---

**नो**टिस—देवलाल कन्हया लाल दुकान बाळापुर यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते ऐशिजे तुम्हाकडेस आमची खातेबाकी येणें आहे त्याजबाबद तुम्ही गुदस्त सालचे कार्तिक महिन्यांत हिशेब केला व निघालेली बाकी दोन महिन्यांत देण्याचें कबूल करून गेलांत पण त्याप्रमाणें आजवर कांहींच पैसा दिला नाहीं सबब तुम्हास ही नोटिस दिली आहे तरी आजपासून १० दिवसांचे आंत खाते बाकीचा व्याजासह उलगडा करावा सदरील मुदतींत उलगडा नकेल्यास तुम्हावर दिवाणीत दावा केला जाईल. कळावे ता० १३ जानेवारी सन १८७०

(सही) नानकराम संतुकलाल दुकान खामगांव द. खु.

---

**नो**टिस—सेखलाल वलद आमद कागदी व अबदुलकरीम वलद अमिर कागदी वस्ती कसबे येरंडोल तालुके मजकूर जिल्हा खानदेश यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते ऐशिजे तुम्ही शके १७९१ अश्वीन वद्य ३ रोजीं रुपये ५२५ कर्ज घेऊन १५ दिवसांत देण्याचा करार केला त्याप्रमाणें रुपये अद्याप दिले नाहींत सबब ऐन रुपये ५२५ व शिवाय व्याज कबूल केल्याप्रमाणें असे एकंदर रुपये ही नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांत आणून देऊन पावती घ्यावी वरील मुदतींत सव्याजरुपये नआणिल्यास तुम्ही ज्या कोरेकागदाच्या गड्या गहाण ठेविल्या आहेत त्या विकून रुपये घेऊन बाकी राहील त्याजबद्दल तुम्हावर दिवाणीत दावा केला जाईल. ता० १३ माहे जानेवारि सन १८७० इ०.

(सही) नानकराम संतुकलाल दुकान खामगाव दस्तुर खुद

## वर्तमानसार.

मुंबईतील स्त्रियांच्या नार्मलस्कुलांत मि० एदलजी जमशेटजी खोरी यांस इंटरप्रिटर म्हणजे दुभाषी नेमिलें. मुख्य शिक्षक युरोपियन स्त्री आहे व तिला मराठी, गुजराथी वगैरे येत नाहीं हें आमच्या वाचकांस ठाऊक असेलच.

नाशीक येथील इंजीनियर आफिसांतील पूर्वीचे जे रायटर, हेडकारकून होते ते दूर होऊन त्यांचे जागेवर सोलापुरचे आफिसांतील लोक एथें येऊन आपआपले कामावर हजर झाले आहेत.

नाशीक जिल्ह्यापैकीं सावरगाव तालुका व निफाड तालुका हे अहमदनगर जिल्ह्यास मिळणार आहेत अशी वदंता आहे.

सरकारांतून असा ठराव झाला आहे कीं, शंभर रुपयांहून कमी पगाराचे नौकरीचा बदली घेतल्यास नेमणाऱ्या अधिकाऱ्याच्या मर्जीस येईल तितका रजेवर गेलेल्या नौकराचे पगारांतील बाकी राहिलेल्या पैशांतील पगार देववावा.

परीक्षा—दर वर्षीं सबार्डिनेट माजिस्त्रेटच्या कामाची परीक्षा जिल्ह्यांत होत होती ती बंद करून हैकोर्टांत व्हावी असा ठराव झाला आहे.

सोलापूर शहराहून चार मैलांवर तलाव बांधण्याचें काम चाललें होतें तें संपलें आहे ह्या तलावांत हल्लीं वीस फूट खोल पाणी आहे व आणखी पाणी येत आहे. तलाव पाण्यानें भरल्यानंतर त्यांत साठ फूट खोल पाणी राहील व त्याचा घेर ७ चौरस मैल होईल. ह्या तलावाभोंवतालचा देखावा फारच सुंदर आहे व जे लोक सोलापुरास जातात ते तो तलाव पाहिल्याविना जात नाहींत. ज्ञा० प्र०

नगर—आमचे मेहरबान जड[illegible] प्रकृती नादुरस्त असले कार[illegible] रीख १८ जानेवारी पासू[illegible] ची रजा मागण्याचा अर्ज [illegible]

नगर—मे० हावलाक साहेब रिविन्यू कमिशनर व डायली साहेब कलेक्टर ता० ७ मि० रोजीं प्रातःकाळीं येथील नंबर १च्या व नंबर९ च्या व मुलींच्या शाळेंत गेले होते व शाळांचीं चांगली स्थिती पाहून फार खूष झाले असें समजतें.

सर रिचर्ड कौच मुंबईचे चीफ जस्टिस यांस, सर बारन्स पीकाक हे विलायेतेस गेल्यानंतर, कलकत्ता हायकोर्टाचे मुख्य जज्ज नेमणार आहेत.

शिंदे आलिजाबाहादर यांणीं आपले राजधानीस येण्याकरितां तारीख २ जानेवारी रोजीं कलकत्ता शहर सोडिलें. महाराजा करितां स्पेशल ट्रेन काढिली होती.

ग्रेट इस्टर्न— या नावाचें मोठें जहाज या महिन्याच्या सोळाव्या तारखेस मुंबईस येणार असें कळतें. हें जहाज पाहण्यासारखें आहे असें म्हणतात. आणि तें पाहण्याकरितां टिकिटा काढण्याचा मक्ता एकानें२९००० रुपयांस घेतल्याचें कळतें.

"इंडियन मिरर" वरून कळतें कीं, काशींत एक पंडित आले आहेत त्यांणीं मूर्तिपूजेच्या विरुद्ध पुष्कळ व्याख्यानें दिलीं. काशींतील पंडित त्यांच्या बोलण्याचें खंडण करण्यास अद्यापपर्यंत धजावले नाहींत.

युनिव्हर्सिटी फेलो— दरसालच्या रीतप्रमाणें आपल्या युनिव्हर्सिटीमध्यें फेलोच्या नेमणुका झाल्या त्यांतील नेटिवांचीं नावें आम्ही घेतों.

डाक्तर आत्माराम सदाशिव जैकर.
करसेटजी नसरवानजी कामा एस्क्वायर
गोपाळरावजी टिळक एल्. सी. ई.
हरिचंद सदाशिवजी एम. ए. सि. इं.
नगिनदास तुळशीदास मरफातिया बी. ए. एल एल बी.
नाना मोरोजी एस्क्वायर.
रघुनाथ नारायण खोटे एस्क्वायर.
रहिमतुल्ला महमद सयानी बी. ए. एल एल. बी.
सोराबजी शापुरजी बंगाली एस्क्वायर.
आनरेबल विनायकराव आपासाहेब कुरुंदवाडकर.

गवरनर जनरल इनकौन्सिल यांनीं, पंजाबमध्यें युनिवर्सिटी स्थापन करण्याकरितां जर रयतेकडून २१,००० रुपये जमा होतील तर सरकारांतूनही तितके देण्याविषयीं कबूल केल्याचें कळतें.

भोसावळ येथील वादळ—येथें चालू महिन्याचे ३ ऱ्या तारखेस भयंकर वादळ झालें. संध्याकाळचे पांच वाजतां वायव्य दिशेस घण मेघ दिसून विजा चमकण्यास आरंभ झाला. पाऊस वीस मिनिटांत एक इंच पडला. वाऱ्याचा सोसाटा इतक्या जोराचा सुटला होता कीं, नवीन बिलायती पत्र्यांचीं आच्छादनें ज्या दुकानावर, स्टेशनावर वगैरे होतीं तीं फाटून चिंधड्या झाल्या येवढेंच नाहीं तर अजिबात उडून गेलीं. कांहीं गाड्या रेलवेवरून खालीं पडल्या व कांहीं एकमेकींवर आपटून फुटल्या. मोठालीं झाडें कडब्याचे ताटाप्रमाणें मोडून पडलीं, परंतु या सर्वांत इतकेंच सुख मानावयाचें कीं, मनुष्यांस अगदीं इजा झाली नाहीं. एकंदर सर्व खराबी अर्ध्या लक्षाची झाली असावी.

मुं. ग्या.

नोटिस—रामदत्त हरजस साहू दुकान अकोट हल्लीं अकोलें व रामराव सदाशिव गुमास्ते निसबत रामदत्त हरजस रहाणार अकोट यांस नोटिस देण्यांत येते कीं, तुमचा ऐवज शहर हैदराबाद येथील अदालतींत येणें होता त्याबद्दल तुम्ही आपले मुखत्याराचे मार्फतवकील वगैरे नेमून देण्याकरितां आमचे चुलते गोपाळराव रामचंद्र यांजकडून रुपये १०० चलनी घेऊन ते रुपये आम्हांस देण्याकरितां कबूल केले असून शहर मुक्कामाहून तुम्ही आपले मुखत्याराचे सहीनिशीं चिठ्ठी पाठविली त्याचे रुपये किती एक वेळ मागितले असतां अद्यापपर्यंत येत नाहींत त्यास ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आत तुम्ही आमचे रुपयांचा उलगडा करून देणें न दिल्यास हे रुपये व्याजासह व या नोटिशीचे खर्चासह घेण्याबद्दल तुम्हावर दिवाणी कोडतांत फिर्याद केली जाईल कळावें तारीख ६ जानेवारी सन १८७०

( सही ) पांडुरंग गोविंद वकील.

नोटिस—बापु वल्लद सिवराम पाटील मौजे मछींदरखेड तर्फ माटरगाव तालुके बाळापुर. हिरालाल बाळचंद अगरवाले जळगांव हल्लीं वस्ती जळम याजवर नोटिस देतों कीं, तुम्ही मार्गशीर्ष म्हणजे तारीख २३ दिसेंबर सन १८६८ इसवी रोजीं दस्तऐवज रुपये ९०६॥ चा लिहून घेतला असून दस्तऐवजांतील रुपये दिले नाहीं याजविषयीं मागणें तुम्हाकडे बहुत वेळा केलें परंतु करार करीत गेला असून देण्यांत आले नाहीं सबब या नोटिशीनें कळवितों कीं, आज तारखेपासून आठ दिवसांचे आंत रुपये द्यावे नाहीं तर सदरील दस्तऐवज पोकळ आहे आणि ठकबाजी केल्याबद्दल शिरस्ते प्रमाणें फिर्याद करूं हो नोटिस लिहून दिली सही ता० ७ माहे जानेवारी सन १८७०

( सही ) बापु वल्लद शिवरामपाटील द. खु.

नोटिस—जालमशिंग वल्लद मोतिरामशिंग वस्ती बारशी टाकळी तालुके अकोलें यास नोटिस देण्यांत येते कीं, मौजे दोनद बरखेड व अंजनी या तीन गांवचे जंगलांत आम्ही गुरें चारिलीं नाहींत काजळेश्वरचे जंगल कृष्णराव लक्ष्मण यास रोख रुपये देऊन विकत घेतलें. मागणी केली तेव्हां दंऊं हें कळविलें हो तुमचे मनकल्पनेची गोष्ट आहे तुम्हास म्हणण्याचा कांहीं संबंध नसून कधींच म्हटलें नाहीं विनाकारण नोटिस दिल्याबद्दलें व या नोटिशीचे खर्च असें नुकसान भरून घेऊं कळावें ता० १२ जानेवारी सन १८७०

( सही ) जयाजी वल्लद पुंजाजी पाटील
सुभानजी वल्लद श्रावणजी
नारायणजी वलद झिंगराजी पा.

नोटिस—बापुवल्लद शिवराम पाटील मौजे माचिंदर खेड तर्फ माटरगांव तालुके बाळापुर—हिरालाल बाळचंद अगरवाला तालुके जळगांव हल्लीं वस्ती जळंब याजवर नोटिस देतों कीं, इमामवल्लद बहादूर पाटील जात मुसलमान तुरकाचे पहूर तालुके बाळापुर याचें आम्हांस देणें असून याजबद्दल तुम्ही हवाला घेऊन सालबंदी प्रमाणें रुपये द्यावे आणि इमाममजकूर याजला पावती लिहून दिली त्यांत सालबंदीनें रुपये बापु पाटील याजपासून द्यावे असा करार नामा झाला असतां एकदम रुपये मागणें करिता ते एकदम रुपये मजकडून मिळत नाहींत जी सालबंदी ठरली आहे त्याप्रमाणें रुपये देण्याची आदाइ करीन एकदम रुपये घेण्याविषयीं फिर्याद केली असतां रुपये देणार नाहीं आणि ह्या नोटिशीचा खर्च तुम्हापासून घेईन कळावें. तारीख ७ जानेवारी सन १८७०

( सही ) बापुवल्लद सिवराम पाटील द. खु.

## नवीन पुस्तक

### वरावर्दी हिशेबसंग्रह.

हें वरावर्दी हिशेबसंग्रहाचें नवें पुस्तक आम्ही तयार करून नागपूर युनियन प्रेस छापखान्यांत सुंदर ठसे छापावर छापून तयार केलें आहे. पुस्तकाचा साच्या चतुष्पत्री असून पृष्ठें सुमारें ६० आहेत. यांत मुख्य विषय. रेघांचे गुणाकार, उपयोगी कोष्टकें, हिशेब करण्याचे सामान्य नियम सुमारें १००, व त्या नियमास अनसरून अनेक प्रकारचे व्यवहारी प्रश्न ४९० उत्तरासहीत, आणि जमीन मोजणी व मोटपांचे हिशेब इत्यादि रीतीसह सोडून दाखविले आहेत.

या पुस्तकाची किंमत ६ आणे ठेविली आहे. बाहेर गांवचे घेणारांस टपाल हशील पडणार नाहीं एकठोक १० प्रती घेणारास तेवढ्याच किमतींत ११ प्रती दिल्या जातील.

पैसा तिकिटांनीं पाठवावा, नाटपेड पत्रें घेतलीं जाणार नाहींत. पत्रें खालच्या पत्त्यावर पाठविलीं असतां तावडतोब पुस्तकें रवाना होतील.

तारीख १ जानेवारी सन १८७० इसवी. मुकाम अकोला.

नारो रघुनाथ मोहोळकर
मराठी नार्मलस्कुलचे मास्तर
अकोला प्रांत वऱ्हाड.

### किमतीचे ठराव.

| | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास ... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ६ |
| फुटकळ ... ... ... | ० | ६ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ अगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

### नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०४
एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

### TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present and past years, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० के०

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. V, AKOLA :—SATURDAY EVENING, JANUARY 22, 1870 NO. 4

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २२ माहे जानुएरी सन १८७० इ० अंक५


कायद्यासंबंधी नवीन मासिक पुस्तक

## वऱ्हाडरिपोर्टर.

अकोलें एथें कित्येक गृहस्थांची कमिटी होऊन विचार ठरला आहे कीं, वऱ्हाडांतील कामदार, वकील वगैरे लोकांच्या उपयोगाकरितां कायद्या कानूसंबंधी व सरकारी कामकाज आणि कामदार ह्या संबंधी माहितीचें दर महिन्यांस एक स्वतंत्र पुस्तक काढित जावें व वऱ्हाडरिपोर्टर असें त्यांस नांव द्यावें. त्याप्रमाणें सर्व सिद्धता करून हल्लीं या जाहिराती वरून सर्वांस कळविण्यांत येतें कीं, सन १८७० इसवीचे जानुआरी पहिन्यांपासून हें पुस्तक निघेल, व प्रतिमहिन्याचे अखेर तारखेस वाटलें जाईल. हें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत टाइपावर सुंदर रितीनें छापिलें जाईल, व थोरल्या चतुष्पत्री साच्याचीं याचीं ३२ पृष्ठें असत जातील. यांत विषय येतील ते येणें प्रमाणें:—

१. लॉ आफ एव्हिडन्स, ला आफ कंट्राक्टस्, ला आफ टार्टस्, जुरीस्प्रुडन्स, इक्विटी, इत्यादि कायद्यासंबंधी महत्वाच्या विषयांवर इंग्लिश विद्वानांनीं वेगवेगळे उत्तम ग्रंथ केलेले आहेत त्यांतील निवडक वेच्यांचीं भाषांतरें, किंवा निरनिराळ्या ग्रंथ कर्त्यांच्या व्याख्या, अथवा त्यांवर निबंध.

२. मुंबई, मद्रास, व कलकत्ता हाय कोर्टांचे ठराव, पंजाब व लखनौ चीफ कोर्टांचे ठराव, हैदराबाद रेसिडेन्सी कोर्टाचे ठराव, व वऱ्हाडच्या दोन्ही भगांच्या कमिशनरांचे ठराव, यांतून जेजे विषय उपयोगाचे व महत्विक असतील ते.

३. न्यायखात्या शिवाय मुलकी, पोलिस वगैरे खात्यांतील वऱ्हाडास लागू ठराव, सर्क्युलरें वगैरे.

४. सिविल प्रोसिजर, क्रिमिनल प्रोसिजर, पिनलकोड वगैरे मोठाले कायद्यांवर कामेंटरीज् म्हणजे टिका झालेल्या आहेत त्यांतून कधीं कांहीं भाषांतरें.

५. हिंदुस्थान सरकारचे नवीन कायदे ठरतील व वऱ्हाडास लागू होतील त्यांचीं मराठी भाषांतरें.

६. वऱ्हाडांतील सरकारी कामा विषयींच्या, कामदारां विषयींच्या, व कायदा कानू विषयींच्या खबरा; तसेंच कोणी कायद्याच्या अगर वहिवाटीच्या बाबदींत सवाल घातले, अगर घातलेल्या सवालास समर्पक उत्तरें दिलीं तर त्या विचक्षणा, व अशाच प्रकारचे इतर किरकोळ विषय.

———

इतकीं प्रकरणें दरमहा या पुस्तकांत थोड्या बहुतानें घेतलीं जातील व तीं वेगवेगळीं काढून घेऊन स्वतंत्र पुस्तक बांधितां यावें अशा सोई करितां त्यावर पृष्ठांक वेगवेगळे घातले जातील.

या पुस्तकांतील मोठ्या महत्वाचें जें पहिलें प्रकरण सदरीं नमुद केलें आहे तें तयार करून देण्या विषयीं रा. रा. विष्णु सदाशिव पिसोळकर एथील कमीशनर साहेबांचे क्लार्क आफ धि कोर्ट यांनीं साहेबांचे परमाणगीवरून कबूल केलें आहे व त्यावरूनच या कमिटीस या पुस्तकाचें काम हातीं घेण्यास विशेष उत्तेजन आलें. आहे.

या पुस्तकाची किंमत.

| | | |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ दिल्यास | ६ | रु० |
| " मागाहून. " | | ७॥८ |
| सहा महिन्याची अगाऊ दिल्यास | | ३॥८ |
| " " मागाहून " | | ४ |

फुटकळ एक महिन्याचे अंकास ०॥१२

बाहेर गांवचे घेणारास टपाल हाशिला बद्दल वर्षाचे बारा आणे सदरहू किमती शिवाय द्यावे लागतील.

पुस्तक घेण्याचें सुरूं केल्यापासून वर्षाची अगाऊ किंमत देणें ती दोन महिन्यांचे आंत, व सहा महिन्यांची देणें तर एक महिन्याचे आंत दिली पाहिजे. हें पुस्तक घेऊं इच्छिणारांनीं आपलीं नांवें अकोल्यास खालीं सही करणरांकडे अगर रा. रा. खंडेराव बाळाजी फडके वऱ्हाडसमाचारकर्ते यांजकडे पाठवावीं.

वऱ्हाड प्रांतीं हा उद्योग पहिलाच आहे व तो चांगल्या रीतीनें सफळ व्हावा अशी इच्छा आहे, आणि ती आश्रय दात्यांचे कृपादानावर अवलंबून आहे; या साठीं बहुत युरोपियन कामदार गृहस्थ व वकील लोक या अल्प सेवेचा आदर करून या ग्रंथास आश्रय देतील अशी आशा आहे व तसें घडल्यास त्यांचे उपकार मानूं.

तारीख १ जानेवारी सन १८७०

देवराव विनायक वकील
वऱ्हाडरिपोर्टरचे
म्यानेजर.

---

नवीन पुस्तक

### बरावर्दी हिशेबसंग्रह.

हें बरावर्दी हिशेबसंग्रहाचें नवें पुस्तक आम्ही तयार करून नागपूर युनियन प्रेस छापखान्यांत सुंदर ठसे छापावर छापून तयार केलें आहे. पुस्तकाचा साच्या चतुष्पत्री असून पृष्ठें सुमारें ६० आहेत. यांत मुख्य विषय. रेघांचे गुणाकार, उपयोगी कोष्टकें, हिशेब करण्याचे सामान्य नियम सुमारें १००, व त्या नियमास अनुसरून अनेक प्रकारचे व्यवहारी प्रश्न ४५० उत्तरा सहित, आणि जमीन मोजणी व मोत्यांचे हिशेब इत्यादि रीतीसह सोडून दाखविले आहेत.

या पुस्तकाची किंमत ६ आणे ठेविली आहे. बाहेर गांवचे घेणारांस टपाल हशील पडणार नाहीं एकठोक १० प्रती घेणारास तेवढ्याच किमतींत ११ प्रती दिल्या जातील.

पैसा तिकिटांनीं पाठवावा, नाटपेड पत्रें घेतलीं जाणार नाहींत. पत्रें खालच्या पत्त्यावर पाठविलीं असतां तावडतोब पुस्तकें रवाना होतील.

तारीख १ जानेवारी सन १८७० इसवी मुकाम अकोला.

नारो रघुनाथ मोहोळकर
मराठी नार्मलस्कुलचे मास्तर
अकोला प्रांत वऱ्हाड.

---

## वऱ्हाडसमाचार.

शनिवार सायंकाळ ता० २२ जानुआरी.

लाभीं हर्ष नको विषादहि नको निंदा प्रशंसा नको ॥ हानीचा मनिं शोक तूं धरू नको देहीं अहंता नको ॥ कोणाचें इति कृत्य तें स्मरू नको माझें तुझें हें नको ॥ आप्ताशी ममता नको गुरुपरब्रम्हासि सोडूं नको ॥ १ ॥

## अकोलें लायब्ररीचे नूतन ग्रहाचा समारंभ.

मोठी आनंदाची गोष्ट आहे कीं, वऱ्हाड प्रांत हा इतका वाईट मुलुख असे कीं, जेथें अन्याय आपलें घरच करून राहिला होता व तंटे बखेडे तर भी म्हणत होते. लुच्चे, दुराचरणी लोकांचें प्राबल्य होतें. असा प्रांत, सध्या ज्या स्थितींत आहे त्या स्थितींत येईल असा संभवच नव्हता, आतां हें खरें आहे कीं, जसा राजा त्याप्रमाणें प्रजा ह्यांत म्हणजे रयतेकडे दोष आहे असें नाहीं, ज्याप्रमाणें नावाडी वल्हें फिरवील त्याप्रमाणें नावेचें गमन होईल, व राजा ज्या न्यायनीतीनें वर्तेल त्याच न्यायनीतीनें पुढें प्रजाही वर्तेल एकूण आपला जो राजा ज्याचे हातामध्यें आपले राज्याची दोरी आहे त्यानें ती चांगल्या रीतीनें हालविल्यास प्रजेचें चांगलेंच होऊन प्रजाही चांगलेच प्रकारची निपजेल यांत काडी मात्रही शंका नको. अशा या अमानी मुलखांमध्यें, विद्येपासून लाभ काय, लायब्ररी (पुस्तकालय) यापासून उपयोग कोणता. व लोककल्याणाचीं कामें करावी असें ज्यांचे स्वप्नांत सुद्धां येत नसें ते लोक किंवा तो प्रांत विद्येकरितां किंवा हरयेक उपयुक्त गोष्टीकडे लक्ष देऊन आपला देश चांगले दशेंत यावा अशा विषयीं प्रयत्न करिल काय? नाहीं; कदापि करावयाचा नाहीं. असें सर्व लोक कबूल करतील परंतु अशा मुलखांतील लोकांचींही मनें फिरून ते लोक आतां हळु हळु वर डोकें काढावयास पहात आहेत. हें खालीं लिहिल्यावरून समजेल.

हा प्रांत इंग्रज सरकारचे हाताखालीं येऊन बरीच वर्षें झालीं तितक्या काळांत इकडील लोकांस विद्येची रुची लागत चालली, अंदाधुंदीनें आपलें गमन करून लोक मोठे सुखानें राहूलागले पुस्तक गृहें असावीं तशीं वाटूंलागलीं याजबद्दलचीं उदाहरणें ही पुष्कळ अढळतील. उमरावती सपुस्तकग्रह होऊन सुमारें दोनवर्षें झालीं व या थोडक्या काळांत ती फारच लवकर चांगले दशेस येऊन ती संगृह जमनादास शेटजीने दिलें. व सरकारांतून ही तीस चांगला आश्रय मिळून आणखी दुसरें चारविद्वान लोकांनींही चांगलें साह्य केलें याप्रमाणेंच बाळापूर वगैरे अनेक ठिकाणीं लायब्ऱ्या होऊन त्यांचे उत्कर्षाचेही ऐकत अहों आमचें येथें लायब्ररी स्थापन होऊन थोडके दिवस झालें व येथील प्रसिद्ध शेट गंगाधर जोरावरमल यांणीं लायब्ररीस गृह देण्याचें कबूल केले होतें त्याप्रमाणें त्यानीं घर चांगलें सुरेख रीतीनें तयार करून लायब्ररीस बोलल्या प्रमाणें बक्षीस दिलें. आतां शेटजींचें हें औदार्यत्व पाहून सर्वांस आनंद झाल्यावाचून राहणार नाहीं.

ता० १७ जानेवारी रोजीं प्रात:काळीं सात आठ बाजण्याचे सुमारास या नूतन गृहामध्यें लायब्ररी स्थापन करण्याचा समारंभ झाला. या समारंभास आमचे लोकप्रिय मेहेरबान लायल साहेब कमिशनर, डेपुटी कमिशनर, हारडेन साहेब, व आणखी दुसरे सरकारी अधिकारीसोहन, व मे० बैमनजी जामासजी असिस्टंट कमिशनर व शेट सावकार लोक येऊन त्यांनीं हा समारंभ साजरा केला. तेव्हां रा. रा. विष्णु सदाशिव क्लार्क आफ दी कोर्ट यांनीं इंग्रजींत चांगलें उपयुक्त संभाषण केलें. पुढें लायब्ररीचे सेक्रेटरी विष्णुपंत बापट यानीं शेट गंगाधर जोरावरमल यानीं लायब्ररीस घर दिलें, याजबद्दल आभार मानिले, नंतर अत्तर, गुलाब व हार तुरे वांटून समारंभ समाप्त झाला.

आतां अशा कामाबद्दल शेटजीनीं जें कृत्य केलें तें खरोखरच वर्णनीय आहे असें समजलें पाहिजे. याप्रमाणेंच दुसरे शेट सावकार लोक यानीं असल्या लोकोपयोगीं कामांस झटावें अशी त्यांस आम्ही शिफारस करितों.

---

## अण्णांचा वादाचे कामीं मागें पाय.

प्रत्येक प्राणिमात्रानें जें करणें तें दुरवर विचार करून कोणती ही गोष्ट केली तर ती उपहासास्पद होत नाहीं. आपले अंगांत शक्ति आहे तिचे बाहेर जर आपण आपली प्रौढी मिरवून मी आलों, मी आलों, अशा पोकळ डरकावण्यानें सर्वांस भीति घालून त्याप्रमाणें वर्तन न जहालें म्हणजे ते केवळ मरणोन्मुख जहाल्यासारखें होतें. अशाच प्रमाणें अलिकडील पुनर्विवाहाचे कामीं तंटा पडून त्याचा निकाल पुण्यामध्यें होणार होता हें सर्व आमचे प्रीय वाचकांस माहित आहेच. त्याप्रमाणें विद्वान दप्तरदार साहेब पुण्यास येऊन आपले वाक्पांडित्य सुरु करून आपआपले मध्येंच निर्णय ठरवून फार शैलीनें, विष्णु परशुराम शास्त्री येत नाहींत असेंच चार दिवस खुळ मांजवून अरेरावाप्रमाणें जे

चाहील तें बोलावयास लागले व सर्वांचे म्हणजे जीं जूनीं पोकळ भटें आहेत त्यांचे पुढें आम्ही जयी झालों असें म्हणवूं लागले असें जो होत आहे तों विष्णु शास्त्री पुनर्विवाहाचे पुढारी पुण्यास येऊन धडकले.

यांच्या येण्यापासून बहूतेकांस आनंद होऊन वादास कधीं आरंभ होणार असेंविषयीं सर्व वाट पहात बसले आज होईल, उद्यां होईल, अशावर होतां होतां अण्णा वादच करीत नाहींत व नाना प्रकारच्या अप्रयोजक कु कल्पना काढून उगीच लावणविर टाकून निकाल करण्याचें त्यांचें मनांत नाहीं असें तिकडील वर्तमान पत्रांवरून समजतें. हें जर खरें आहे तर खरोखरीच अण्णांस व त्यांचे प्रातिकूळ पक्षास फार लांछन असें म्हटल्यास अम्हांकडे त्याचा दोषरोप येणार नाहीं.

अतां शास्त्रा प्रमाणें चालल्यास दोन्ही पक्षांस पुरावे आहेत व ते पूर्वीं वहिवाटींत होते असेंही म्हणतात, व ज्या पेक्षां गोष्ट घडली त्यापेक्षां करणारानें केवळ थोताड मतानें एखादी गोष्ट अनादीसिद्ध नसतांच चालू केली असें नाहीं तर कांहींनाकांहीं तरी त्याला आधार असेलच असें अगदीं स्पष्ट होतें.

आतां धर्म शास्त्र सिद्धांतांची प्रतीतिती वरच अवलंबून बसलों तर दोन्ही पक्षां कडील लोकांचे वाद कधीं ही संपावयाचे नाहींत व एकजण आम्हीं थोर, दुसरे असें म्हणतील कीं, आम्ही महान् पंडित या घमेंडी मध्येंच राहून अखेर निकाल ही होण्याचे चिन्ह दिसत नाहीं.

विठोबा आण्णा वाद करीत नाहींत असें म्हटल्यास तें आपले काम सर्व येकीकडे ठेऊन पुण्यास येऊन दाखल झाले व वादाचे अवडंबर मांडून विष्णुशास्त्री यांची वाट पाहू लागले. बरें: विष्णुशास्त्री आल्यावर त्यांचे मन कां फिरलें असावें याचा उलगडा होत नाहीं परंतु एकंदरीचे मानांवरून असें दिसतें कीं, विष्णुशास्त्री बराबर अण्णाच्यानें वादांस उभें राहववणार नाहीं व अण्णांस असें वाटत असेल कीं यदा कदाचित् उभा राहीलों आणि पराजय झाला तर आपल्यास काळोखी लागेल असें झाल्यावर त्यांचा ( पुनर्विवाहाचा ) पक्ष प्रबळ होईल तर आपण भ्रमाचा भोपळा न फोडतां " झाकली मूट सव्वालाखाची " या म्हणीं प्रमाणें पानावर पान टाकून वे स्वस्थ ढेंकर देत बसले.

विष्णुशास्त्री हे पुण्यांस गेल्यापासून यानीं बरीच लोक कल्याणाचीं व स्मारककामें केलीं, विश्रामबागचे वाड्यांमधें टोलेजंग सभेमधें त्यानी विधवा विवाह खंडनावर फार चांगलें व सुरस भाषण केलें याप्रमाणें त्यांनी मांढे यांचे वाड्यांत अण्णानी केलेल्या विधवा विवाह संहार ग्रंथाचे खंडण चालू करून तें वर्तमान पत्रांतून ही प्रसिद्ध करीत आहेत यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, वे. सं. रा. रा. विष्णुशास्त्री पंडित यानीं खरोखरीच या विषयावर फारच चांगला व्यासंग केला आहे हें स्पष्ट दिसून येतें हे सद्गृहस्थ परोपकारार्थ फार झटतात हें पाहून, मर्मज्ञ, रसिक, व विद्वान पुणेकर मंडळीनें नजर पुरवून त्यांस शेला पागोटें बक्षिस दिलें. हें त्यांचें कृत्य भुषणास्पदच आहे हें लिहिणें नकोच.

या वादाचा भ्रम फुटला म्हणून पुनर्विवाहाकडील लोकांस फारच आनंद झाला आहे व हें हातीं धरलेलें सत्कृत्य शेवटांस नेण्याचे उमेदींत आहेत व दुसरी उमेद त्यांस अशी आली आहे कीं, बहिष्कार रूपीची धार बहुतेक लोकांनीं बोथी करून टाकली याजवरून सत्यपक्षास ईश्वर साथी आहे याजबद्दलची त्यांची खात्री होत चालली आहे. असो याचप्रमाणेंच परमेश्वरानें यश द्यावें अशी आमची ईश्वराजवळ प्रार्थना आहे.

आतां वे० स० रा० रा० विठोबा अण्णा दप्तरदार यांस या कामीं इतकेंच सूचवीणें आहे कीं त्यांनीं केलें हें फार वाईट केलें आपले अंगांत शक्ति नव्हती तर वादासच यावयाचें नवतें, व मुद्दाम येऊन आपली दुर्बलता दाखवून सर्व जनांचे हसें करून घेतलें हेंच कायतें मिळविलें, बरें वादास उभें राहून तरी पाहावयाचें होतें त्यांत कदाचित् जिंकले जाते तरी आपली दुर्बलता बाहेर पडली नसती, तर त्यांनीं सर्व येकिकडे ठेऊन गरीब विधवांची दया आणून ही गोष्ट परिचारांत आणण्यास झटानें इतकेंच मागणे आहे.

आतां वे० स० रा० रा० विष्णु शास्त्री पंडित यांस इतकेंच कळविणें आहे कीं त्यांनीं या अवडंबर सशास्त्र अशास्त्र याचे नादीं न लागतां आपला मार्ग चालू करून या वर्षीं एक दोन तरी लग्नें करून. गरीब विधवांस त्यांचे दु:खापासून सोडवतील अशी आशा आहे.

# बाळापूर येथील शाळांतील मुलांस बक्षिसें वांटण्याचा समारंभ.

तारीख २८ मिनहू रोज गुरुवार या दिवशीं बाळापूर येथील चार शाळांतील उत्तम विद्यार्थांस बक्षीसें वांटण्याचा समारंभ पेठेंत इंग्लिश मराठी शाळेत झाला. मेहरबान रेसिडेंट साहेबांच्या मडम साहेबांनीं पाठविलेला चांद हुशार मुलीस देण्याकरितां मेहेरबान डाक्टर सिंक्लेयर साहेब बाहादुर विद्याखात्याचे डायेरक्टर येथें गेले होते आणि सर्व शाळांस वार्षीक बक्षीसें ही वांटावयाचीं होतीं या करितां हा समारंभ झाला डैरेक्टर सिंक्लेयर यांच्या सांगण्यावरून रा. रा. हणमंत खंडेराव तहशीलदार हे अध्यक्ष स्थानीं बसले वे. सं. रा. गोपाळशास्त्री गावळ व त्यांचे बंधू, रा. रा. खंडेराव बाळाजी फडके छापखान्यांचे मालक, रा. रा. शामराव देशपांडे व रा. रा. अच्यूत राव देशपांडे रा. रा. सखाजी देशपांडे, धर्मार्थ दवाखान्यांवरील डाक्टर शाळा खात्या पैकीं अकोले जिल्ह्याचे डेपुटी ईन्स्पेक्टर, डैरेक्टर साहेबांचे हेड क्लार्क व दुसरे क्लार्क व शाळांतील सर्व मास्तर आणि कांहीं व्यापारी व वकील लोक या वेळेस आले होते. आरंभीं डारेक्टर साहेबानीं संभाषण केलें त्यांतील सारांश पुढें लिहितों.

आज एवढा मोठा समाज या समारंभास आला आहे हें पाहून मला फार संतोष झाला. पूर्वींच्या राज्यापेक्षां हल्लींच्या राज्यांत अधिकाऱ्यांचें लक्ष विद्येकडे फार आहे हें सर्वांस माहीतच आहे हल्लींच्या कामांत विद्या असल्या शिवाय कोणास मोठी योग्यता किंवा मोठा अधिकार प्राप्त होत नाहीं आणि ती विद्या प्राप्त होण्याचें हें स्थळ ( शाळा ) आहे. आपलीं मुलें मोठ्या योग्यतेस यावीं व त्यांस मोठे अधिकार व पुष्कळ धन मिळावें अशी आम्हां सर्वांची इच्छा असेल हें उघडच आहे ही इच्छा तृप्त होण्यास आमच्या शाळांत पाठविण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं जीं मुलें शाळेत जातील तीं अधिकार, द्रव्य, योग्यता, व मान या सर्व गोष्टींमध्यें पुढें जातील व जीं शाळेंत जाणार नाहींत ती मागें राहतील आणि ज्या लोकांनीं आपलीं मुलें पाठविलीं नाहींत त्यांस वाईट वाटेल पूर्वींच्या राज्या पेक्षां हल्लींचें राज्य चांगलें आहे पूर्वींचें राज्य तरवारीचें (म्हणजे लढायांचें व हाणमारीचें ) होतें व हल्लींचें राज्य बंदुकाचें ( म्हणजे ज्ञान वृद्धीचें) आहे या काळांतील सर्व राज्यें चांगल्या प्रकारें चाललीं आहेत. इंग्रज लोकांचें राज्य, फ्रेंच लोकांचें राज्य, जर्मन लोकांचें राज्य आणि इतमुयन लोकांचें राज्य हीं चांगल्या स्थितींत आहेत इंग्रजी राज्य पूर्वीं पेक्षां हल्लीं उत्तम प्रकारचे आहे आणि उत्तरोत्तर त्यांत अधिक सुधारणा होईल परंतु या चांगले पणाचा उपयोग आपले हिताकडे करून घेणें हें लोकांकडे आहे.

विलायतेत प्रतिष्टीत लोकांच्या स्त्रिया मोठ्या विद्या संपन्न असतात, व त्या गायनवाद्य इत्यादी मनोरंजक कामांमधे फार निपुण असतात हे गुण बायकांत असणें हें आमचे लोक प्रतिष्ठितपणाचे चिन्ह आहे असें मानितात. संतती चांगली होण्यास आई व बाप हीं दोघें चांगलीं असावीं लागतात बाप विद्वान व आई विद्वान नींति संपून असलीं तर मुलें पुढें विद्वान निपजतात

नेटिव प्रतिष्ठित गृहस्थांनीं स्त्रियां करितां येक शाळा मुंबइंत स्थापन केली आहे तीत मेहेरबान विनायक राव जगंनाथ शंकरशेट यांनीं पंचवीस रुपयांची येक स्कालरशिप दिली आहे व येक पियनो नावाचे मोठे इंग्रजी वाद्य शाळेचा उपयोगा करितां दिले आहे यावरून असें सिद्ध होतें कीं या देशांतील संभावित गृहस्थ आपल्या बायका युरोपियन मडमां प्रमाणें विद्वान् व्हाव्या असे इच्छीत आहेत हे उदाहरण घेण्या सारखे आहे किंवा नाहीं याचा लोकांनीं पूर्णपणें विचार करावा.

नंतर कांहीं मुलांनीं वाचण्याच्या पुस्तकांतील कविता गळ्यावर म्हटल्या त्या ऐकून लोक फारच खुश जाहले पुढें साहेबनीं च्यारी शाळांतील मुलांस बक्षीसें तहशीलदारांच्या हातुन वांटवीलीं मडम साहेबाचे पदक दिलें त्यावर " विद्या ददाति विनयं " हें संस्कृत वाक्य खोदले होतें. नंतर तहसीलदार यांनीं लिहून आणलेला निबंध ते आजारी असल्या मुळें त्यांचे चिरंजिवानीं सभेस वाचून दाखविला त्याचा सारांश असा होता.

पहा हा आपला वऱ्हाड देश मोठा सुपीक असून व्यवहाराचे हि मोठे सोईचा आहे पण येथील लोकांची स्थिति अशी निकृष्टावस्थेंत येण्याचें कारण येकतर हा देश जुलमि राजांचे ताब्यांत होता दुसरेया देशांत विद्येचा लेश ही नाहीसा झाला होता फार तर काय साधारण लिहिणें वाचणें किंवा अगदीं सामान्य व्यवहारी हीशेब तेही बहुत करून ब्राम्हण व थोडे वाणी वगैरे लोकांस मात्र येत होते.

आलीकडे श्रीकृपेने आपला देश दयाळु सरकारचे हातांत जाऊन थोडे दिवसापुर्वीं मेहेरबान डाक्टर सिंक्लेयर साहेब बाहादुर डायरेक्टर यांची नेमणूक झाली यांनीं गांवोगांव शाळा स्थापन केल्या आणि त्यांवर व्याकरण भूगोल गणित इत्यादी विषय शिकवीण्या करितां मास्तर नेमले आपली प्राचीन व प्रौढ संस्कृत भाषा शिकविण्या करितां शास्त्री लोक ठेविले व जित अनेक प्रकारचे उपयुक्त विषयांचें आलेलां प्रतिपादन केलें आहे व जी पृथ्वीवरील चारी खंडांत प्रसृत झाली आहि अशी अमोल्य इंग्लिश भाषा तीचें ज्ञान होण्याकरितां मोठमोठे हुशार मास्तर नेमले. या प्रांतांत मुसलमान लोकांची वस्ती बहूत आहे याकरितां उरदु भाषा शिकविण्यास हिंदुस्थानी मास्तर नेमले आहेत यासमयीं शाळांचें काम चांगलें चालावें यास्तव हरएक जिल्ह्यांत इन्स्पेक्टर व डिपुटी इन्स्पेक्टर हे देखरेख करीत असून साहेब बहादुरानीं स्वत:ही मोठे दक्षतेनें व्यवस्था ठेविल्यानें थोड दिवसांत या आपले लोकांस विद्यामृताचा इतकाच लाभ झाला कीं, पूर्वींचे स्थितीकडे पाहिलें असतां जमीन अस्मानचें अंतर दिसून येतें.

असेल जे परोपकारी सरदार यांची स्वारी येथें आली आणि येथील शाळांस उत्तेजन येण्याकरितां बक्षिसें देणार हा समारंभ पाहण्याकरितां एवढा समाज जमला आहे व माझी प्रकृति नादुरुस्त असतांनाही माझ्यानेंही आल्याशिवाय राहवेना.

आणखीअसले मोठे अधिकारीव महान्विद्वान सरदारांपुढें माझी योग्यता म्हटलीम्हणजे " कोटश्य किटायते " याप्रमाणें असतां त्यांनीं मला अध्यक्षस्थानी बसावयाची आज्ञा केली त्या आज्ञेचें उल्लंघन होऊंनये यास्तव मला तें कबूल करावें लागलें आणि मी त्यांचा फार आभारीही झालों आहें.

आतां सभासदांस माझी असी सूचना आहे कीं हें परद्वीपस्थ असतां आपले कल्याणाकरितां इतके झटत आहेत आणि या विद्या वृद्धीपासून आपलें व आपले देशाचेंच कल्याण होणार आहे याकरितां सर्व भार त्याजवरच घालून आपण स्वस्थ बसणें हें अगदीं गैर आहे तर आपण सर्वांनीं विद्या वृध्यर्थ झटावें आणि असें झालें तर बरें आपला देश फारच त्वरित मोठे भरभराटीस येईल यांत कांहीं संशय नाहीं.

शेवटीं आम्हीं सर्व शक्तिमान् परमेश्वराचीहि फार नम्रतेनें प्रार्थना करितों कीं तुझेच कृपेनें ह्या सर्व गोष्टी घडून आल्या व पुढें ही यावयाच्या याकरितां सर्वांचें अंत:करणीं तूं प्रेरणा कर. अलमितिविस्तरेण

या नंतर रा० रा० खंडेराव बाळाजी फडके यांनीं संभाषण केलें त्याचा सारांष येणे प्रमाणें :—

" येथें जमलेल्या मंडळींतून कित्येकांच्या सूचनेंवरून सर्व बाळापुरकर लोकच्या वतीनें मीं सांगतों कीं मेहेरबान डा० सिंक्लेयर साहेब बहादुर यांनीं जो आज आमच्या मुलांच्या परिक्षेचा थाट करून दाखविला तो पाहून आम्ही फार समाधान पावलों. आमचीं मुलें जीं शाहणीं होत चाललीं आहेत याकरितां ब्रिटीश सरकारचे आम्हांवर उपकार आहेत. व ते या प्रसंगीं स्मरल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. आमचे लाहानपणीं उदार व दयाळू ब्रिटीश सरकारचा अंमल आमचे प्रांतावर नसल्यामूळें अशा विद्या शाळा व ज्ञान वृद्धीचीं इतर साधनें आम्हांस नव्हतीं हें आमचे दुर्भाग्य होय असें आतां वाटतें. आमचे वऱ्हाड प्रतांत वो-

द्याखातें चांगले प्रकारें सुरू झाल्यास सुमारें च्यार वर्षें झालीं ईतक्या थोडया कालांतील सुधारणा व आमचे शेजारचे मुंबई इलाख्यांत विद्याखातें सुरू झाल्यास अजमासें ४० वर्षें झालीं त्याभानानें या मुलखांतील सुधारणा यांचें तारतम्य पाहिलें असतां इतक्या महदंतराचें न्युनाधिक असावें असें दिसत नाहीं व थोडयाच वर्षांत आमच्या वऱ्हाड प्रांताचें विद्याखातें हा फरक काढून टाकून मुंबई ईलाख्याशीं साम्य करूं शकेल असें आमचें अनुमान आहे. व या वऱ्हाडचे विद्या वृद्धी करितां आम्ही विशेषें मेह० डा० सिंक्लयर साहेब यांचे आम्हीं आभार मानितों. कारण साहेब बाहादुरांची हुशारी, योजना, पोक्त बुद्धी व सतत श्रम हींच यांस कारणीभूत आहेत असें आम्हांस खात्रीनें वाटतें. व आमच्या देशांतील शाळा हल्लीं चांगल्या रितीनें चालत अहेत थोड थोडे विद्यार्थी वर्षांस म्याट्रिकुलेशनचे परीक्षेस जात आहेत आणि यावरून आमची वऱ्हाडची मुलें ही पूढें युनीवर्सिटींतील बी. ए च्या वगैरे परिक्षेस जातील व तींत पास होऊन सरकारच्या ठरावा प्रमाणें मामलतीच्या वगैरे जागा मिळवूं सकतील अशी आम्हांस उमेद आहे

“ आज मुलींच्या शाळांची परीक्षा होऊन या समारंभांत एके मुलीस रेसिडेंट साहेबांच्या मडम साहेबांनीं रूप्याचें पदक पाठविलेलें बक्षीस मिळालें हें पाहून, आमच्या देशांतील स्त्रियांच्या विद्यावृद्धीचे कामीं या मडम साहेब इतकें लक्ष पुरवितात हें मनांत आणून आम्हांस फार संतोष झाला आहे. व हा आमचा संतोष आ साहेबांनीं त्यांस कळवावा अशी आमची इच्छा आहे.”

याप्रमाणें भाषण झाल्यार पानसुपारी अत्तर, गुलाब, व हार गजरे वांटून सभा विसरजन झाली.

## DISTRIBUTION OF PRIZES AT BALAPORE.

A large meeting of respectable Native gentlemen was held on the 20th instant at Balapore in order to distribute the annual prizes to the several schools in that important town and to give away Mrs. Saunders's medal to the best girl in the Female School. Dr. Sinclair our energetic Director was present on the occasion. We had the good fortune to be present to witness the interesting ceremony. The meeting was well conducted throughout and the new arrangement of the room filled the spectators with wonder and joy. Dr. Sinclair opened the meeting by addressing the assembly.

He spoke about the benefits which the people derive under the present Government and dwelt at some length on the advantages of Famale Education. He informed the people that some of the respectable and educated natives of Bombay had lately established a school for educating Native Females and Mr. Vinayekraw, son the late Honerable Jagonnath Sunkershett had given a Scholarship of Rs. 25 a month and presented a Piano for the use of the School. It was evident (he continued) that the enlightened natives of the Sister Presideney have begun to think that it is highly respectable in a womam to be educated. Mrs. Saunders's medal with some articles of dress and a book was presented to the best girl; and prizes were then distributed to the other girls and also to the best boys in the schools at Balapore.

The Tahseeldar and Mr. Khanderaw Balaji also addressed the people on the subject of education. Both these gentlemen Dwelt on the benevolent intentions of the British Government and their discretion in selecting for the important office of the Director of Public Instruction a learned gentleman who has long been distinguished in India for liberal views and the real love of the people of this country. They said that under Dr. Sinclair the educational Department of Berar has conferred lasting benefits on the Province and has achieved results the like of which it was impossible to expect before the organization of the Department.

For further particulars we beg to refer our readers to our Marathi Columns.

## वऱ्हाड.

मेहेरबान बापुजी रंगनाथ एकस्त्रा असिस्टंट कमिशनर यांचें कोर्ट तारीख १ फेब्रुआरी १८७० इसवी पासून कारंजें येथें जाणार.

मेहेरबान रेणिक साहेब असिस्टंट कामिशनर यांस फुलपावर माजिस्त्रेटचा अधिकार मिळाल्याचें समजतें व यांचा पगारही वाढेल अशी वारता आहे.

मे० दिनसाजी सोराबजी जुडिशियाल एकस्त्रा असिस्टंट कमिशनर एलिचपूर यांस एक हजार रूपये पर्यंत दिवाणिचा अधिकार मिळणार असें ऐकण्यांत आलें आहे. स. प्र.

### अकोला.

या आठवडयांत दोन च्यार दिवस रात्रीं पाऊस पडला गांवात तापाची सांत बरीच आहे.

मे. कमिशनर साहेब आपले क्लार्कांसह वाशिमास गेल्याचें समजतें.

मे. कमिशनर साहेब यांचे हुकूमावरून सर्वांस कळविण्यांत येतें कीं, दरसालप्रमाणे अपकारी बदलचा मक्ता अकोलें जिल्ह्याचा तारीख २७ जानेवारी १८७० रोजीं अकोलें येथें होईल, बुलढाणें येथील ता० ४ फेब्रुवारी सन १८७० रोजीं बुलढाणे येथें होईल व वाशिम जिल्ह्याचा ता० १२ फेब्रुवारी सन १८७० इसवी रोजीं होईल. ज्यांस मक्ता घेणें असेल त्यानें सदहू लिहिलेल्या तारखेस त्या त्या ठिकाणीं जावें.

डाक्तर सिंक्लेअर साहेब हे येथें येऊन आजच सकाळीं वासिमाकडे एक दिवस राहून गेल्याचें कळतें.

मे. हर्डन साहेब डेपुटी कमिशनर हे दवऱ्यावर आपले शिरस्तेदारासह गेले आहेत.

स्टांप विषयींचा बोभाटा. आमचे सर्व वाचकास माहितच आहे कीं मागील एक दोन अठवडयाचे पुर्वीं स्टांपाविषयीं गवगवा फार आहे याजबद्दल लिहिलें होतें त्याचा बंदोबस्त न होतां या आठवडयांत इतका बोभाटा झाला आहे कीं, ज्यांस कामाची नड आहे त्यानें एक अण्याचे स्टांपाबद्दल एक रुपयाचा स्टांप घेऊन काम चालवावें ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे कीं एथील खजिन्यांत एक आणा. दोन आणें, च्यारआणें व आठआणें यातून एकाही जातीचे स्ठांप नसणें म्हणजे गरीब बिच्यारे रयतेवर मोठें संकटच समजले पाहिजे, वरे हे थोडक्या किंमतीचे स्ठांपाबद्दल झालें मोटयाल्या रकमेचे तरी असावपाचे होतेतेंही नाहींत १००रुपयांचा स्टांप घेणेंअसेल तर त्यांने कशीतरी भरती होण्याबद्दल जसे कागद मिळतील त्याप्रमाणें घ्यावें अशा या गवगव्या वरून कमिशनर साहेबांनीं असा हुकूम दिलाआहे कीं ज्यास स्ठांप घेणेंअसेल त्यानें खजीन्यातूंनच जे पूर्वीं मुंबइचे स्टांप कागद शिलक आहेत तेच सध्या दुसरे हायदराबादी स्टांप कागद येई पावेतों घ्यावे, वाहावारे, न्याय. अशानेच खरा न्याय मिळतो

## जाहिरनामा.

विद्यमान लेफ्टनेंट करनल जान बुश्बी साहेब बहादूर डेपुटी कमिशनर जिल्हा ऊन प्रांत पूर्व वऱ्हाड यांजकडून सर्व लोकास कळावयाकरितां प्रसिद्ध करण्यांत येते कीं, ऊन जिल्ह्याचे मक्तबाबीचा म्हणजे अपकारी, अफू, गांजा आणि विषयुक्त वगैरेचें लिलांव सन १२८० फसली मु० सन १८७०।७१ इसवी सालाबद्दल तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १८७० इसवी रोज गुरुवारीं येवतमाळ येथें सदर ष्टेशनचे छावणींत डेपुटी कमिशनर साहेब बहादूर यांचे कचेरींत होईल. लिलांवाच्या शर्ती गुदस्त सालाप्रमाणें असून त्या लिलांवसमयीं पूर्वीं वाचून दाखविण्यांत येतील. लिलांवाची सुरवात सदहू तारखेस दिवसा १० वाजतां होईल. यास्तव ज्या कोणास मक्ते घेणें असतील त्यांनीं त्या दिवशीं हजर रहावें कळावें तारीख १८ माहे जानेवारी सन१८७०इसवी मुक्काम येवतमाळ

परशुराम गणेश अ. रि.

शिरस्तेदार.

J. T. Bushby

Deputy Commissioner Woon.

नोटिस—राम दयाळ नथमल साहू दुकान खामगांव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते जे तुम्हीं कस्तुरचंद रीदकर्ण यांचा हवाला रुपये ८७७॥= चा घेऊन आठ पंधरा दिवसांत रकम देण्यांचा करार केला त्यास आज पावेतो सुमारें दोन सवादोन महिने झाले असून अद्याप दिले नाहींत व प्रत्येक वेळीं मगतो तेव्हां आठ च्यार दिवसांत देतो म्हणून करार कारितां यास्तव कळविण्यात येते कीं या नोटिसीचे तारखे पासून ८ दिवसांत सदरी ऐन व व्याज नोटिसीचे खर्चासह आणुन द्यावे ह्या मुदतीत हे न दिल्यास तुम्हांवर दिवाणीत दावा केला जाईल कळावें तारिख २१ माहे जानेवारी सन १८७० इसवी.

( सही नानक राम संतुकलाल दस्तुरखुद.

नोटिस—खाज्या महबुब इनस्पेक्टर पोलिस हाल्लीं अकोट यांस खाली सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते ऐसिजे तुम्हांकडेस खातेबाकी बद्दल रुपये घेणे आहेत आणि तें तुम्हीं देण्याचा करार केल्यास फार दिवस होऊन दरमाहा तुम्हांस नाटपेट व रजिष्टर पत्रें ही पाठविलीं पण तुम्हांकडोन रुपये आले नाहींत सबबहीं नोटिस देण्यांत येत आहे तर आजपासुन १० दिवसांत व्याज व रुपेये पाठऊन द्यावे ह्या मुदतीत रुपये न दिले तर तुम्हवांर दिवाणीत या नोटिसीचे खर्चासह दावा केला जाईल कळावें तारीख २१ जानेवारी सन १८७० इसवी.

(सही) नानक राम संतुकलाल दस्तूर खुद.

## वर्तमानसार.

पुर्णें मे. रिचर्डसन् साहेब बाहादूर सिटी माजिस्त्रेट पुर्णें हे व चिंतामण सखाराम गवररमेन्ट प्रासिक्यूटर हे फिर्यादी गणेश सखाराम यानें ब्यांकेंत ठेव ठेवलेली मिळावि म्हणून हाय कोर्टांत फिर्याद केल्यावरून सरकार मार्फत साक्षी साठीं सीटि माजिस्त्रेट साहेब हे आजरोजीं तिहींच्या गाडींतून मुंबईस गेले. व प्रासिक्यूटर हे सरकार तर्फे खटला चालविण्यास गेले.

ज्ञां. च.

**नासिक**—वे० सं० रा० रा० विष्णु शास्त्रि पंडित पूनराविवाहाचे पूढारी हे येथें आल्यास सुमारें ४ | ५ दिवस झालें. यांचा हेतू इतकाच आहे कीं या नाशिक क्षेत्रांतील विद्वजन शास्त्री वगैरे सभ्य लोकांसी कांहीं पूनरविवाहाच्या संबंधानें वाद विवाद करावा हाच आहे. परंतू येथील फक्त विद्वजनशास्त्री वगैरे.भिक्षूक लोकांनीं असा कटाव केला आहेकीं.मूळींच यांच्या सभेस जायवाचे नाहीं व वादाविवादही करणे नहीं. इंगित काय असेलतें विद्वजन मंडळीसच माहित असेल.

**बाडोदें**—गायकवाड सरकारानें माहाराणीचा पूतळा कराविलेला लवकर पाठवावा म्हणून बिलायतेस लिहून पाठविलें आहे कारण तो लौकर आल्यस डयूक येण्याचे वेळेस बसविण्याचा समारंभ करतां येईल-व हाफतळ मूंबईचे कापावर नवीन पास्ट अफिसान जोक बसवावयाचा आहे.

येत्या माघ महिन्यांत चंद्रनगर एथें पूनरविवाह होणार आहे. वधूवर कायस्त जातीचीं असून विद्धान पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर हे तें लग्न लावणर आहेत. मूलीचा पाहिला नवरा १० वे वर्षी मयत झालेला आहे.

**बेळगांव**—या गांवांत यशवंत सोनार या यानांवाचा एक अगदी तरूण गृहस्थ राहत असे त्याणें २॥३ दिवसांखालीं हजामत करविते वेळीं मस्तका बरची चाभखूळी सारखी झालेली पूळी कापविली व स्नान केलें नंतर संध्या काळीं येफायेकोत्याचें तोंड सूजण्यास प्रारंभ होऊन शेवटीं आतिशय मोठें होऊन तिसरे दिवशीं तो मृत्युपावला बे. स.

—सर होप ग्रांट यांस हिंदुस्थानाच्या मुख्यकमांडर इनचीफची जागा मिळणार असें आर्मी व नेवी ग्याझेट वरून कळतें.

—मुंबई युनिवर्सिटीचे अंडर ग्राजुएट म्हणजे माट्रिक्युलेशनची परिक्षा दिलेले लोक, कायद्याच्या संबंधाची“ लायशेन्शिएट आफ ला” अशी पदवी करण्या विषयीं युनिवार्सिटीचे वैसचान्सलर व सेनेटचे सभासद यांस अर्ज करणार आहेत असें बांबे ग्याझेटच्या समजण्यास आलें आहे. हा अर्ज हाऊन तो मंजूर झाल्यास त्या अर्जापासुन पुष्कळ उपयोग होईल असे वाटतें.

मुंबई युनिवर्सिटीच्या अंडर ग्राजुएट लोक व्हाइस चान्सेलर व सिनेट यांस असा अर्ज करणार आहेत कीं एल एल म्हणजे लायसेन् सिएट आफला म्हणून एक नवीन डिग्री करावी.

मुंबई इलाख्यांत मिठाची स्थिती समजण्या करितां सरकाराने खानदेश पैमाषी कडील मि. पेडर यांस स्पेशीयल डिपुटी कमिशनर नेमिलें आहे. व ते अमदाबादे कडे पात्री येथें मिठाचे कारखाने आहेत ते पहाण्याकरितां गेले आहेत.

मुंबईचे गवरनर सर सिंमोर फिटझरलड साहेब कलकत्यास गेले आहेत ते २० वे तारखेस मद्रास मार्गें मुंबईस परत जाणार आहेत.

सोलापुरा पासून पुढें कलबुर्ग्यापर्यंत ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवेची लाईन फेब्रुआरी महिन्याचे पहिले तारखेस सुरु होणार.

जयपुरचे महाराज हे कलकत्यास असतांना जेवढे नाच ( बाल ) होतील तेव्हढ्यांत नाचणार आहेत म्हणून समजतें. महाराजांनीं हा एक नवीनच गुण संपादन केला.

विलायतेस तारायंत्रांतून बातम्या पाठविण्याचे दहा शब्दांचे अर्धे ग्रुपास जो पैसा पडत असतो तो या सालापासून १० रुपये कमी केला आहे.

कलकत्यास मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस १७३० उमेदवार आले होते त्यातून ८६१ म्हणजे सुमारें निम्मे उतरले. दुसऱ्या म्हणजे बी० ए० च्या परीक्षेस ६२१ आले होते त्यांतून ३१० उतरले.

ज्ञानोदय.

बार्लिन ( प्रसिआ देशची राजधानी ) शहरांतील एका फोटोग्राफरानें, फोटोग्राफीचे योगानें, अंतरावरील पदार्थाची लांबी व उंची मोजण्याची युक्ती शोधून काढली आहे. प्रशिआ देशच्या राजाचे हुकूमावरून एका गांवकुसाची लांबी व उंचविर सांगितल्या रीतीनें मोजली. ने. ओ.

## पत्रव्यवहार.

### अंजनगाव येथील मुलीस पदक देण्याचा समारंभ.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस— विनंती विशेष.

येथील शाळेंतलि समारंभ तारीख १९ जानेवारि सन १८७० इसवी रोजीं मराठी इंग्रजी शाळेंत झाला हें शाळा गृह निमशाई पैशाने रा. रा. लक्ष्मण बाळाराम तहशीलदार तालूके दर्यापुर यांचे मार्फत बांधलेंगेलें गेलें आहे. गृह बरेंच विस्तीर्ण असून फार सोयवार बांधलें आहे तहशीलदार साहेबांनी फार मेहनत घेऊन तयार केल्याचें स्पष्ट दिसतें. शाळेचे दरवाज्यास केळीचे खांब बांधले होते. आंब्याचे टाहळ्याचीं तोरणें बांधलीं होतीं. बसण्याचे जागीं सत्रंज्या गालीचे फार उत्तम प्रकारानें घातले व खुर्च्या वगैरे सर्व सामान तयार बसण्या करितां ठेविलें होतें. गांवांतील संभावित गृहस्थ सर्व जमून मेहेरबान डिपुटी कमिशनर साहेब बाहादुर यांची वाट पाहात बसले होते सुमारें चार वाजतां साहेब बाहादुरांची स्वारी पत्नी व भगिनी सह येऊन दाखल जाहली. अध्यक्ष स्थानावर बसल्यावरून डिपुटी इनस्पेक्टर जिल्हा येलिचपूर यांनीं साहेबांचे आज्ञेवरुन सभेचा उद्देश वगैरे थोडक्यांत कळविला. नंतर पहिल्या वर्गांतील मुलींनीं सुरस कविता म्हटल्या व बक्षिसें वाटण्याचे काम सुरु केलें. मराठी इंग्रेजी शाळेंतील मुलांस साहा रुपये किमतीचीं बक्षिसें वाटलीं, व हिंदुस्थानी स्कुलास चार रुपयांची बुकें वांटलीं हें अटोपल्यावर साहेब बहादुरांनीं लिहून दिलेलें. निरानिराळे शाळेवरील विचार डिपुटी ईनस्पेकटर यांनीं मराठींत सर्व जमलेल्या लोकांस कळविलें. त्यांतील भावार्थ कीं, सर्व लोकानीं पैसा खर्च करुन येथें सुंदर शाळा गृह बांधून दिलें व बहुतेक प्रकारें शाळेस मदत दिली. मुलींचे शाळेविषयीं साहेबांनीं असें लिहिलें होतें की, "मुलीनो तुम्ही जेव्हां विद्या शिकूं लागला ते वेळेस तुम्हांस असें वाटलें असेल कीं आम्हीं शिकतों हें फक्त आमचे मास्तरासच माहित परंतु तसें नाहीं डिपुटी इन्स्पेक्टर यांस माहित आहे कारण शाळा पाहणें हें त्यांचे काम आहे. आम्हांस माहित आहे कारण तुमचे कल्याणाविषयीं आम्ही झटत आहों मेहेरबान रेसिडेंट साहेब बहादुर यांचे मडम साहेबांस कळलें व त्या अन्वये त्यांनीं रुप्याचें पदक करुन येथील शाळेंतील उतम मुलीस देण्याकरितां पाठविले आहे तें आज येथें दिलें जाईल." असें बोलणें झाल्यावर लटकन या नांवाचे मुलीसहें पदक मेहरबान डिपुटी कमिशनर साहेबांचे मडम साहेबांनीं आपले हातानें मुलीचे गळ्यांत बांधलें नंतर खण व बुकें सर्व शिलक राहिलेलीं मुलांस व मुलीस दिल्यानंतर पानसुपारी अत्तर गजरे वगैरे वाटले तहशीलदारांनीं फार मेहनत घेउन व्यवस्था उत्तम ठेविली यामुळें डि० साहेब फार खुष झाले. नंतर हवया, चंद्रजोत्या वगैरे दारुकाम उडविल्यानंतर दिपुटी साहेब आपल्या तंबूत गेले. मेहेरबान डिपुटी साहेब व तहशिलदार साहेब शाळेच्या कामांत फार लक्ष्य पोंचवितात हें ऐकून सर्वांस आनंद होत आहे त्याचप्रमाणें पुंढे ही होईल अशी उमेद आहे डि. ए. इ. साहेब हे या कामांस फार झटलं होतें लोकांचें कल्याणाकडे यांचें फार लक्ष असल्याचें दिसून आल्यावरुन आम्हीं फार त्यांचे आभारी आहों.

ता० १९ जानेवारी सन १८७० } आपला एक ज्ञ.

---

**नो**टिस—वऱ्हाडवाशी देश कल्याणवर्द्धी लोकांस शेतकरी लोकांची सभा असें प्रार्थीते कीं, आपले देशांत इंग्रज सरकारचा अंमल होऊन बरींच वर्षें झालीं. आतां आपण इंग्रज लोकांच्या देश कल्याण करण्याच्या ज्या चाली त्यांचा अंगिकार करणें हें अवश्य आहे असें समजून पुढील महिन्याची तारीख १३ फेब्रुवारी सन १८७० रविवारीं बारांवर २ पासून ५ वाजे पावेतों मुक्काम शिरसो तालुके मोर्तिजापुर जिल्हा उमरावती येथें भरणारे वार्षिक सभेस येऊन सभा शोभिवंत करावी कळावें तारीख ९ जानेवारी सन १८७० इसवी.

व्यवस्थापक यांचे आज्ञेवरुन
नारो विनायक दात्ये
चिटणीस नि. शे. लो. सभा.

---

**नो**टिस—पुनमचंद चुणिलाल मारवाडी दुकान कसबे चिखली तालुके मजकूर यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, सन १८७९ फसलीचे आशाढमाशीं रोख रुपये ३७ व रोख रु० ३१ चा कपाशी खंडी एक असे दोन रोखे मजजवळून लिहून घेऊन एकंदर रुपये ६८ तुम्हांजवळून घेणे पैकीं रु० ९८८ ची भरती तुम्हीं मजला करुन दिली बाकी रुपये ५८८८ तुम्हा जवळून घेणें आहेत ते मागत असतां आज उद्यां देतों असें म्हणत गेलां परंतु दिले नाहीं. विनाकारण रुपये नदेतां रोखे लिहून घेतले त्यांस सदर्हू रुपये नोटिस पावल्यापासून च्यार दिवसांत द्यावेत आणि आलाहिदा पावती द्यावी. तसें न होईल तर पुढें तुम्हीं खोटेपणा करुन फिर्याद केल्यास त्याचा जबाबदार मी नाहीं फक्त नऊ रुपये आठ आणे रोख्यापैकीं तुम्हास देणें आहेत.

सन १२७८ वैशाख मासि नागफरी खाचरचिरीव आयाजी व विठोबा पाटील गहोदरीकर याचे घरीं मी ठेविली असतां तुम्हीं सदरील खांचर माझें नांव सांगून घेऊन गेलांत नंतर मजला समजल्यावर दोन दिवस राहूंदे असें सांगून ठेऊन घेतलें. व तुमचे चांगले वर्तणुकीबद्दल पाठिमागील वहिवाट पाहून मी ठेविलें आणि पुष्कळ वेळ मागण्यास आलों, परंतु दिले नाहीं करितां नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत खाचर भाड्याचे किंमती बद्दल दरमहा रुपये १५ प्रमाणें ८ महिन्याचे रुपये १२० आणून द्यावे न दिल्यास भाड्याबद्दल रुपये व खाचराचे किंमती बद्दल रु० १०० एकूण २२० ची फिर्याद केली जाईल कळावें. तारिख ७ माहे जानेवारी सन १८७० इसवी मुक्काम चिखली.

( सही ) सैद भिकन वल्लद सैद बजढन नाइकवाडी राहणार मौजे महोदरी तालुके मेहेकर
मुक्काम चिखली.

---

**नो**टिस—पर्वता वल्लद भगवंता पाटील गायकवाड मौजे कुंफळ परगणे चांढोळ तालुके चिखली यांस खालीं सह्या करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मौजे कुंभफळ परगणें चांडोळ येथील पाटिलकी व मळे ४ आमचे असून पूर्वी मोंगलाई अंमलांत आमचे वडिलांनीं तिसरे हिश्शाची पाटिलकी मळयासुद्धां तुम्हांस फरोक्त केली असून सन १२६९ फसली पैकीं मळयांत आम्ही वहिवाट केली, तसेंच सन १२७० फसली पावेतों तुम्हीं व आम्ही मिळोन पाटिलकीचें काम करुन उपभोग घेतला. सन १२७१ फसलीस इंग्रजी अंमल सुरु झाला तेव्हांपासून तुम्हीं पाटिलकीचें काम करितां त्यास या नोटिशीने असें कळविण्यांत येतें कीं, मौजे मजकूरचे पाटिलकींत २ हिश्शाचें मालक आम्हीं असोन एक हिश्शाचे तुम्हीं आहां असे विषयीं सरकारांत अर्ज देऊन आमची नेमणूक करुन द्यावी. बिरदावन्याचा मळा १ व मोठा मळा १ व लिंबवाडीचा मळा १ व पांसरिचा मळा १ एकूण ४ आमचे वहिवाटीस आहेत त्यास पंच मार्फत च्यारही मळ्यांत एक हिस्सा तुमचा वजा जातां बाकी २ न हिस्से आम्हास द्यावे याप्रमाणें पाटिलकी बद्दल व मळ्याबद्दल नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत सदरीं लिहिलेप्रमाणें निकाल करुन द्यावा; न केल्यास तुम्हांवर कायद्याप्रमाणें तजवीज करुन व शिवाय नोटिशीचा खर्च द्यावा लागेल कळावें तारीख १३ माहे जानेवारी सन १८७०.

( सही ) लक्षुमण वल्लद कृष्णाजी पाटील वाघ मौजे कुंभेफळ निशाणी खुद्द.
कडतु वल्लद धोंडी पाटील वाघ मौजे कुंभेफळ नि० खु०

---

### किमतीचे ठराव.

| | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ५ |
| फुटकळ ... ... ... | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षांचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरुन नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

### नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

| | |
|---|---|
| १० ओळी पर्यंत... ... ... | १ रुपया |
| १० ओळींवर प्रत्येक ओळीस | ०१०६ |
| इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस | ०४ |

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

### TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present and past years, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

---

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरु केलें त्यास सवा दोन वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

**वऱ्हाडसमाचार** वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरुन ज्या लोकांनीं त्यांजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

**वऱ्हाडसमाचाराचे मालक**

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० के०

# वऱ्हाडसमाचार.

## THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. V, AKOLA :—SATURDAY EVENING, JANUARY 29, 1870 NO. 5

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २९ माहे जानुएरी सन १८७० इ० अंक५

| किंमतीचे ठराव. | रु | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास... | ६ | ० |
| साल अखेर ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ५ |
| फुटकळ ... ... ... | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व साल अखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ८१८६
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ८४
एकच मजकूर वारंवार छापणें झाले दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present and past years, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

---

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

---

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धे आणाप्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

## जाहिरनामा.

विद्यमान लेफ्टनेंट करनल जान बुश्बी साहेब बहादूर डेपुटी कमिशनर जिल्हा ऊन प्रांत पूर्व वऱ्हाड यांजकडून सर्व लोकांस कळावयाकरितां प्रसिद्ध करण्यांत येते कीं, ऊन जिल्ह्याचे मक्तेबाबीचा म्हणजे अपकारी, अफू, गांजा आणि विषयुक्त वगैरेचें लिलांव सन १२८० फसली मु० सन १८७०।७१ इसवी सालाबद्दल तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १८७० इसवी रोज गुरुवारीं येवतमाळ येथें सदर ष्टेशनचे छावणींत डेपुटी कमिशनर साहेब बहादूर यांचे कचेरींत होईल. लिलांवाच्या शर्ती गुदस्त सालाप्रमाणें असून त्या लिलांवसमयीं पूर्वीं वाचून दाखविण्यांत येतील. लिलांवाची सुरवात सदर्हु तारखेस दिवसा १० वाजतां होईल. यास्तव ज्या कोणास मक्ते घेणें असतील त्यांनीं त्या दिवशीं हजर रहावें कळावें तारिख १८ माहे जानेवारी सन१८७०इसवी मुक्काम येवतमाळ

परशुराम गणेश अ. रि.
शिरस्तेदार.

J. T. Bushby
Deputy Commissioner Woon.

---

**नोटिस**—माधवराव नारायण संगवई वस्ति दही हंडे तालुके अकोट यांस तुम्हीं घर खालींकरून देण्याचे अगर लेख करून देण्याचे बाबतींत तारिख १५ माहे दिसेंबर सन १८६९ इसविची नोटिस वऱ्हाड समाचारांत दिल्ही त्याचें उतर हेच कीं जेंघर तुम्ही खालींकरून मागतां तें घर सुमारें ८० वर्षांपासून आमचे वडिलही त्या घरात नांदले हल्लीं माझी तिसरी पिढी आहे आज परयंत तुमची मालकी जाणत नाहीं आज सुमारें माझे वय ६०।६२ वर्षांचे आहे या घराचा ऊपभोग आम्ही घेत आहो इमारत वगैरे सर्व आमचे वडिलाचेच हातची बसविलेलि असोन आम्हीं सालोसाल डागदुजी म्हणजे दुरुस्ती करित आहो त्याजवर तुमचा हक्क नाहि— घर खालिंकरून देतों अगर लेख करून देतों असें बोलण्याचा मजकूर नोटिसित प्रदरशीत केला त्यास हें बोलणें तर कधींच झालें नाहिं यांवरून सदरीं लिहिलेले आपले मनाचे उद्गार दिसून येत आहेत— व घरावर तुमचा हक्क नसतां तुम्हीं दिवणीत फिर्याद केल्यास त्या विशाई मी जबाबदार नसोन खर्चही देवाल नाहीं वरून नोटिसीने आपणास कळविलें आहे तारीख ९ जानेवारि सन १८७० इसवी.

( सही ) नारायण राजाराम चेडके
दस्तूर भगवंत राजराम चेडके राहाणार दहीहंडे.

---

**नोटिस**—बापु वल्लद शिवराम पाटिल वस्ती मर्छीदरखेड तर्फ माटरगांव तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हीं आम्हांस खोटी नोटिस दिली जे आम्हांस कांहीं पूर्जाबद्दल रुपये दिले नाहीं तर आम्हीं खातेबाकीबद्दल पुर्जा रुपये ९०६ नवशें साहा रुपयांच्या सालबंद्या साहा तुम्ही जळगांवस येऊन लिहून दिल्या त्यांस तुमचे हातची सही पुर्जावर व खात्यावरही आहे यास्तव ही नोटिस देण्यांत येते कीं आमची सालबंदी दोन बद्दल रुपये ३०० तीनशें व व्याज रुपये ९०६ नवशें साहांचा रुपये २५० अडीचशें रुपये येकूण रुपये ५५० पांचशें पन्नास हे रुपये-तुम्ही आजतारखे पासून आठ दिवसांत द्यावे नाहीं तर रितीप्रमाणें फिर्याद करून नोटिसिचे खर्चासुद्धां भरून घेऊ व दुसरे ईमाम भाई बद्दल ५८८१३ अठ्ठावन रुपये तेरा आण्याचा हवाला घेतला त्यापैकीं तुम्हीं उवारी खंडी दोन व रुपये २० विस कबूल केले आणि आमचे खात्यावरही सही करून दिली त्यापैकीं वसूल रुपये १० दाहा रुपये दिले व आम्ही सालबंद्या ईमाम भाई यांच्या बांधल्या व तुमच्या हीं बांधल्या ही नोटिस लिहून दिली सही तारीख २५ माहे जानेवारी सन १८७० इसवी मुकाम अकोलें.

(सही) हिरालाल बाळचंद आगरवाले
जळगावकर हल्लीं रा० जळंब.

---

**नोटिस**—सकु मर्द बापूसा कलाल राहाणार मौजे झोडग परगणें पिंजर तालुके अकोलें यांसी खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हीं सन १२७९ सालचे कलाली मक्ता आम्हांपासून कबुल करून घेतला तो.

५५१. मौजे देवदरी जांवरूण परगणें बारसी टाकळी तालुके अकोलें. भट्टयां २ बाबदची कबुलायत तुम्हीं बारा महिन्याची लिहून दिल्ही ती रकम.

२१६८≡ मौजे झोडग परगणें पिंजर भट्टी १ इसवी तारिख २५ जून सन १८६९ इसवी तागाईत तारिख ३१ मार्च सन १८७० इसवी पर्यंत मक्ता कबूलकरून घेतला असून आज परियंत कबुलायत दिल्ही नाहीं.

---

७६७८≡

सातशे सदुसष्ट रुपये तीन आणे कबूल करून घेतला त्याजबद्दल हाप्ते बंदी प्रमाणे अखेर नवंबर पर्यंत तुम्हीं वसुल दिल्हा तो ५२०।।८६ बाकी घेणें२४६ ८६८६राहिली व कबुलायत स्टांपकागदावर मौजे झोडग्या बद्दल घेणें सबब तुजकडे लुष्टी सिपाई पाठविला असतां तूं तगादा न ऐकतां रोजंदारी ही दिल्ही नाहींस आणि आम्हांस रपोट लिहुन पाठविलास कीं वाघेकर कलाल हां आमचे गावचे गिऱ्हाइक त्याचे गावी गेल्यास दारू पिण्यास देत आहे आणि ते लोक जंगलांत रस्त्यानीं पडून मरतील त्याचा जबाब आम्हांस सरकार विचारतील यास्तव या बाबद तुम्ही कांहीं बंदोबस्त करून द्यावा नाहीं तर मी कांहीं एक रुपाया माहावारीचा देत नाहीं म्हणोन वगैरेचा मजकूर लिहिलास त्याजवरून तुजला नोटिशीनें कळविण्यात येतें कीं हा बहाणा बिनाकारण तूं अम्हाशीं कराकरून रुपये अमचे बाकी राहिले ते देतनाहींस व कबुलायत लिहून देण्यास येत नाहीं. दुसरे गावीं गिऱ्हाइक लोक दारू पिण्यास गेल्यास कोणी त्याजला हरकत करूं सकत नाहीं. व ते लोक कोणाचे बांधले नाहींत आणि त्यां लोकांस दारू पिण्यास दुसरे गांवीं प्रतिबंध व्हावा असें म्हणणार तूं कोण आहेस व कोणते आधारावरून लिहिलेस याचा जबाब विच्यार करून द्यावा.

आतां आमचे रुपये तुजकडें निघालेले आज तारखे पासून दाहा दिवसाचे आंत व्याजा सुद्धां नोटिसीचे खर्चा समेत आणि तुजबाबद जवानास रोजदारी बाराआणे दिल्हे असे तुम्ही आमचे अकोले एथील दुकानीं येऊन दाखल करून आम्हांपासून रसिद घ्यावी —व स्टांप कागदावर कबुलायत लिहून घ्यावी असें तुजकडून न झाल्यास तुजवर दिवाणी कोडतांत फिर्याद करून खर्चा समेत रुपये तुजपासून घेण्यात येतील कळावें तारिख २४ माहे ज्यानेवारि सन १८७०इसवी.

( सही ) कुसरी लाल दालचंद मक्तेदार कलाली.

---

## वऱ्हाडसमाचार.

शनिवार सायंकाळ ता०२२ जानुआरी.

लाभीं हर्ष नको विषादहि नको निंदा प्रशंसा नको ॥ हानीचा मनिं शोक तूं धरू नको देहीं अहंता नको ॥ कोणाचें इतिकृत्य तें स्मरू नको माझें तुझें हें नको ॥ आप्ताशीं ममता नको गुरुपरब्रम्हासि सोडूं नको ॥ १ ॥

---

## युनिवर्सिटीच्या पदव्यांचा समारंभ.

हा वरील समारंभ ता० ११ जानेवारी सन १८७० रोजीं सायंकाळीं पांच वाजतां मुंबई येथील टाऊन हालांत झाला. ह्या टाऊन हालांतील मुख्य दिवाण खान्यांत निरनिराळ्या तऱ्हेचे बैठकीनीं ती जागा फार सुशोभित दिसत होती व त्यांत बी. ए. एम. ए. च्या परीक्षेंत पास पडलेल्या लोकांस निरानिराळ्या फेलोसाठीं वेगळ्या व दुसऱ्या गृहस्थांकारितां भिन्न भिन्न बसण्याच्या जागा केल्या होत्या, ह्या समारंभास समुदायही बराच जमला होता, फेलो लोक झगे घालून आपआपल्या जाग्यावर बसले, पाठिमागून वैसचेनसेलर नामांकित विद्वान रेवरेंड डाक्टर विलसन साहेबांनीं युनिवर्सिटीचे चेन्सलर आपले गवरनर सा-

हेब हे आपल्या राणी साहेबांचे द्वितीय
चिरंजीव ड्यूक आफ एडिंबरो यांचे भेटीस
गेल्यामुळें त्यांचें स्थान सुशोभित केलें, ते
हालामध्यें येऊन बसण्याचे वेळीं सर्व लो-
कांनीं खडी तालीम दिली, व ते अध्यक्ष
स्थानीं बसेतों पर्यंत सर्व लोक उभे होते.
नंतर रीतीप्रमाणे पदव्या देण्याचा क्रम
झाला. युनिवर्सिटी संबंधाचीं बक्षिसें दिलीं.
यांत अति आनंदकारक गोष्ट ही कीं, एलि
स साहेबांचें बक्षीस इंदुरच्या शाळेंतील वि
द्यार्थी रा. विष्णु केशव कुंटे यांस म्याट्रिक्यु
लेशनच्या परीक्षेंत मराठी भाषेमध्यें सर्वांहू
न अधिक गुण मिळाल्याकारणानें त्यांस
मिळालें याजवरून हें सिद्ध आहे. कीं, इंदु
र होलकर सरकारच्या इलाख्यांत शिक्षण क
माविषयीं तिकडील अधिकारी फार मेहेनत
घेतात हें पाहून सर्वांस आनंद झाल्यावांचून
राहणार नाहीं. हीं बक्षिसें दिल्यावर युनि
वर्सिटीचे राजिस्ट्रारांनीं जमलेल्या मंडळीस
अमुक गृहस्थांस अमुक पदव्या दिल्या व
ते कोण कोणत्या शाळांतून किंवा कालेज
मधून आले यांजविषयीं ही सर्व हकिकत वा
चल्या नंतर डाक्टर विलसन साहेबांनीं सु
रस संभाषण केलें त्यांतील मुख्य मुख्य मुद्दे
येणें प्रमाणें.

प्रथम आजचे समारंभास गवरनर साहे
ब नाहींत म्हणून थोडेंसें दुःख दाखविलें व
त्याचप्रमाणें कलकत्यास राणीचे चिरंजीवां
स भेटण्यास गेल्याचा आनंदही दाखविला.
डाक्टर विलसन साहेबांनीं बोलण्यांत असें
सुचविलें कीं, ड्यूक साहेबांनीं मुंबई पाहिल्या
शिवाय जाऊंनये, दुसरें युनिवर्सिटीचे संबंधा
नें बोलतांना असें बोलले कीं, यंदां म्याट्रिक्युले
शन व बी. ए. ची पहिली परीक्षा देण्या-
करितां आलेले विद्यार्थ्यांपैकीं फारच थोडे
उतरले याजबद्दल फार वाईट वाटतें व या
चें इंगित काय असेल तें कळत नाहीं व
यांत चुकी कोणाची याजविषयीं त्यांनीं स्प
ष्टीकरण करून दाखवीलें नाहीं. बाकीच्या
परीक्षांचा निकाल आनंद दायक आहे अ
सेच विद्येस उत्तेजन येण्या करितां परोपका
री लोकांनीं आपल्या पैशाचा सद्व्यय करू
न स्कालरशिपा व बक्षिसें दिलीं याजबद्दल
त्यांचे उपकार मानले. याप्रमाणेच युनिवर-
सिटीचे बाबादींत बोलतांना युनिवर सिटी
चे फेलोची संख्या वाढविणे हें अगदी गैर
आहे याप्रमाणेंच देश भाषा पैकीं मराठी आ
दिकरून युनिवर्सिटीच्या परिक्षेंतून काढल्या
व पारसी भाषा परिक्षेंत दाखल केल्या नाही
त यान विषयीं नाखुशी दाखवीली. याच प्रमा
णें कायदे, वैद्यशास्त्र व एंजिनीयरींग यांचे अ
भ्यासांत घडी घडी फेर फार करणे लागेल व
लायसेन शियेट ऑफ लॉ " अशी एक अ
डंर ग्राजुयेट करितां पदवी स्थापन कर्ण्या
विषयीं अर्ज आला आहे त्याचा विचार
करून त्याप्रमाणे ती एक पदवी व्यवहा
रात आणावी. पुढें त्यांनी या चाळीस वर्षां
त विद्येचा फैलाव कसकसा होत चालला
या विषयांवर ही त्यांनीं फारच लांबलचक
सुंदर व्याख्यान दिले. व पहिल्याने ईकडे
वीद्यांमृत पाजण्या करितां इकडलि
पहीले अधिकारी लोकांस कीती श्रम पडले
हेही स्पष्ट करून दाखविलें पुढें जसजसे लो
क विद्वान होत गेले त्याप्रमाणें त्यांस मोठ
मोठया हुद्याच्या ही जागा मळित गेल्या अ
शा या सर्व वृतांतावरून उत्तरोत्तर शाळा
खात्या मधे फार फरक पडून लोक गुणाने
पजले हें मुंबई युनिवर्सिटीचे रिपोटेर वरून
ध्यानात येईल. दिवसानु दिवस लोक नाना-
प्रकारचे वाद विवाद करून नव्या वाईटा
चा सारासार विच्यार करित चालले वर्तमा
न पत्रांचा देशात फैलाव होऊन नेटिव लो
क इतिहास व नानाप्रकारची उपयुक्त बुकें
करावयास लागले. ज्ञानापासून साहाजिक
परीणाम होणार तो स्विकार कर्ण्यास आप
ण तयार व्हावें असेयानी नानाशंकर शेट
हे वाईस चान सेलर जवळ बोलले होते व
त्याप्रमाणे काळ ही येत चालला आहे व या
जविषयीं बंगाल्यांत तर प्रत्यक्ष उदाहरणे
द्रिष्टी गोचर होत चालली आहेत. सरते
शेवटी वाइस च्यान सेलर याणी या देशां
त आल्या पासून सर्व हकीगत सांगून असे
च या नेटिव लोकांनीं सत्कृत्यातमधें साध्य
होऊन आपल्यास सुख करून ध्यावें अशा वि
शयीं आपला जो प्रती पालक सर्वेश्वर यानें
सर्वांस बुद्धि ध्यावी असें म्हणून व्याख्यान
समाप्त केलें.

## इंडियन स्कालरशिपूवर धाड.

या जगांतील मनुष्यांकडे लक्ष पूर्वक अ
वलोकन केल्यास असें दिसून येतें कीं, आ-
पल्या बोलण्यांत व कृतींत साम्य ठेवणारे
लोक फारच थोडे सांपडतील; किंबहुना ना
हीं म्हठल्यासही चालेल; मग ते लोक सु-
शिक्षित असोत अगर असिक्षित असोत
याच नियमावरून एक म्हण आहे कीं,
"बोले ऐसा चाले त्याचीं वंदावीं पाऊलें"
कारण तोंडानें पुष्कळ बोलतात परंतु त्या
प्रमाणें कृति करण्याची वेळ आली म्हणजे
स्वार्थ, हेवा, मत्सर, हे मनोविकार पुढें उ-
भे राहतात; जे लोक आपलें कर्तव्यकर्म क
य आहे व न्याय, अन्याय, नीति अनिती,
समजून त्याप्रमाणें आपली वर्तणूक ठेवि-
तात त्यांची गणना देवादिकांत होते, त्यां
चीं चरित्रें वाचणें, ऐकणें पुढील लोक पु
ण्य समजतात, उत्तम घडलेल्या गोष्टीच्या
दृढी करणार्थ त्यांचे दाखले घेत असतात
हें सिद्ध करण्यास फार लांब जाणें नको
आपले देशांत पांडव कौरव वगैरे जे मोठा-
ले प्रतापी, शूर, परोपकारी, दयाळू पर-
हितेच्छु, राज्यकर्ते होऊस गेले त्यांजकडे
थोडी मागें नजर पुरऊन पाहिलें असतां
सहज लक्षांत येणार आहे तसेंच ज्या लो-
कांचें बोलण्यांत व कृतींत अगदीं मेळ न
सतो बोलावें एक व करावें एक खाण्याचे
दांत व दाखविण्याचे दांत निराळे अशांस
लोकांमध्यें किती मान मिळतो व त्यांचेमा-
गें त्यांची कीर्ति लोक किर्ति गात असतात
याचा विचार आमचे प्रीय व सुज्ञ वाचक
यांस सहज करितां येईल. किर्ती किंवा
अपकिर्ती ही ज्याचे त्याचे वर्तनावर आहे;
पोकळ पांडित्यावर नाहीं, आतां साधारण
मनुष्याचे हातून जर करितां अशा प्रकार-
ची एकादी गोष्ठ घडून आल्यास तिजविष
यीं फारसें वाईट वाटत नाहीं परंतु विद्वान,
हुशार, सुशीक्षित, ज्ञाते, राज्यकर्ते, ज्यांचे
हातून हजारों लोकांचें बरें किंवा वाईट,
होणार ज्यांच्या एका शब्दावर लक्षावधी
लोकांची आशा लागणार अशा गृहस्थांचे
हातून असें विपरीत झाल्यास लोकांनीं त्यां
जवर कसा भरंसा ठेवावा? राजाचे मनांत
प्रजेविषयीं व प्रजेचे मनांत राजाविषयीं प्रे-
मभाव उत्पन्न होण्यास एकमेकांनीं
एकमेकांशीं व कशा राजनिष्ठेनें
वागलें पाहिजे असें नसेल तर
त्यापासून दोघांसही सुख होत नाहीं इतकें
च नाहीं तर उलट मोठमोठाले अनर्थ हो
तात व " यथा राज्या तथा प्रजा " याप्र-
माणें होऊन लोकांत सुद्धां विश्वास, पत
नाहींसी होऊन उदीम, व्यापार हे बंद
होतात. देशांत कोणीं कोणाची काळ-
जी वाहात नाहीं अशा गोष्टीं आपण इति
हासांत किती वाचल्या असतील? व अशा रा
जांचे शेवटही कोणत्या प्रकारचे झाले
असतील याची अटकळ करणें हें आम्हीं
आपले सुज्ञ वाचकांवरच ठेवितों. आज आ
मचे मनांत हे विचार येण्यास कारण इंडि-
यन स्कालरशिपस होत आमचे हल्लींचे हिं
दुस्थानचा राज्य कारभार चालविण्याकरि-
तां इंग्लंडमध्यें जे सेक्रेटरी आहेत त्याणीं ह्या
स्कालरशिपस बंद केल्या. आजपावेतों
आम्हांस असें वाटत होतें कीं, जे लोक
चांगले सुशिक्षित असतात, ज्याणीं लक्षावधी
लोकांस वागविण्याची जोखीम आपले आं-
गावर घेतली असते ते लोक स्वार्थ, हेवा,
मत्सर ह्या दुष्ट मनोविकाराचे दास होत
नाहींत परंतु हा आमचा समज हल्लींचे से-
क्रेटरी यांणीं अगदीं खोटा करून दाखवि-
ला. त्यांणीं ह्या ठरावावरून असें दाखवि
लें कीं, तुम्ही हिंदु लोक मूर्ख आहां, तुह्मा
स तारतम्य ज्ञान नाहीं तुम्ही विश्वासुक
गरीब, आशाबद्ध, लोंचट, कृतज्ञ आ
हां तुमचे आंगीं ठकबाजी, कावेबाजपणा,
लुच्चेगिरी, हे गुण मुळींच नाहींत. पहा,
ज्यावेळेस हा मुलुख खुद्द राणीसाहेबसाहेबां
नीं आपले ताब्यांत घेतला त्यावेळीं जो
जाहीरनामा लाविला आहे त्यांत किती
साकर पसरली आहे धर्म, जात, रंग वगैरे
म्हणजे पाहिजे त्या धर्माचा असो, पाहिजे
त्या जातीचा किंवा पाहिजे त्या रंगाचा
असो तिकडे अगदीं लक्ष न देतां फक्त
सचोटी, लायकी, हुशारी हे गुण पाहून
नेटिवास मोठाल्या जागा देण्यांत येतील
तरी पण काय आमचे गरीब हिंदुस्थानचे
लेकरांस याप्रमाणें आजपर्यंत कांहींच न
मिळतां फक्त कायती जाहिरनाम्यांतील
अक्षरेंच पाठ करण्यास मिळालीं या ठरा-
वा प्रमाणें काहीं येक घडून आलें नाहीं
राजकीय कामांत नेटिवांचा प्रवेश होण्या
विषयीं पुष्कळ परोपकारी गृहस्थानीं मेह-
नत केली तरी तीज पासून कांहीं एक फा
यदा झाला नाहीं. सिव्हील सरवीसची
परीक्षा इंग्लंडासच जाऊन दिली पाहिजे
बरें, आतां या ठरावास काय म्हणावें!!!
ती परीक्षा हिंदुस्थानांत मला घेऊं नको
म्हणते किंवा त्या परिक्षेस इकडील हवा
मानत नाहीं अगर तिला काळे लोक अ-
शक्त असल्यामुळेंच आवडत नाहींत यांस
म्हणावें तरी काय? तस्मात " वळी
तो कान पिळी " ही म्हण अक्षरशः खरी
आहे या परीक्षेस आमचे लोक असावे अ-
शाविषयीं पुष्कळ वर्तमान पत्रांतून गवग-
वा झाल्यावरून व हिंदु लोक गरीब, त्यांस
इकडे राहण्यास ऐपत नाहीं जे लोक श्री
मंत आहेत त्यांचे मनांतही हो गोष्ट नाहीं
वगैरे गोष्टींचा पूर्ण विचार करून हिंदुस्था
नचे माजी सेक्रटरी याणीं दर वर्षास न-
ऊ स्काल्लर शिपस् देऊन प्रत्येक वर्षीं त्या
लोकांस इकडे पाठविण्याचा ठराव केला का
रण सन १८३३ सांत सिव्हील सरव्हीस-
च्या परीक्षे विषयीं जो ठराव केला त्यांत फे
र फार कराण्यास त्यांस कांहींच अधिकार न
सल्या मुळें त्यांत फेर फार करितां येईना वही
परीक्षा हिंदुस्थांत घेण्याचा हुकूम हो देतां
येइना परंतू हिंदुस्थानचे खर्चांत हात घा
लण्यास त्यांजला पूर्ण अधिकार असल्यामुळें
त्यांणीं परोपकार बुद्धीनें म्हणा अगर या लो
कांनीं फार त्रास दिला त्या अर्थी याचे
तोंडावर थोडा तुकडा कुत्र्या प्रमाणें टाका
वा असें म्हणा. तें कसेंही असो त्याप्रमाणें
गतवर्षीं नऊ लोक इकडून इग्लंडामधें गे-
ले व यावर्षीं जाणार इतक्यांतच हा ठराव
रद्द; झाला वाहावा! याचे नाव राज्य रिती-!
जर आरांभेंच हा ठराव केला नसतां तरी
ही बरें वाटलें असतें, परंतु एक वेळ ठराव-
करून पुन: आपणच आपल्या भाषणास
हरताळ लावणें या गोष्टीस काय म्हणावें!
हें आम्हांस अगदीं समजत नाहीं त्यांचे-
त्यांसच ठाउक कारण ते सुधारलेल विद्वा
सुशिक्षित, तेव्हां ते जें करतिल ते दुरवर
पाहुन कोणत्या रितीनें आपले व आपल्या-
लोकांचें पोट भरेल त्यांचें हित होईल व फु
कट्या हिंदु लोकांचा पाय आंत शिरणार
नाहीं हें पाहून आम्ही वेडे असल्यामुळें मा-
त्र आम्हांस तो ठराव वाइट वाटतो असो)
हा ठराव असा कां झाला वगैरेचें कारण
ही कांहींच दाखवीलें नाहीं परंतु एवढें खरें
कीं कारणा वांचून कार्य घडत नाहीं या-
नियमास अनुसरून विचार केल्यास मागील
सिव्हील सरविसची परीक्षाच कारण होय.
पुर्वीं त्यांस असें वाटलें असावें कीं ही परीक्षा
हिंदुस्थानांत न घेतां विलायतेसच घेण्याचा
ठराव केला म्हणजे हिंदु लोक गरीब, द-
रिद्री, धर्म भोळे, प्रवासभीरू, भित्रे असे
असल्यामुळें, इतके लांब खचितच येणार
नाहीं, बरें कदाचित एक दोन आल्यास
इकडील हवा थंड असल्यामुळें ती त्यांजला
मानणार नाहीं. यदाकदाचित मानवल्यास
थंड हवेमुळें त्याची बुद्धी तरी थंड होईल.
परंतु गांठ पडली हिंदुशीं त्यांणीं त्यांचें अ
नुमान अगदीं खोटें करून सोडलें हा अप
राध काय लहान म्हणतां येईल, पहा जेवढे
परीक्षेस गेले, तेवढे सर्व पास झाले त्यांनीं
हा केवढा बरें अविचार केला? मुळीं अ-
गोदर जाणें हेंच वाईट गेल्यावर तरी आप
ण काळे लोक आपण आपला नंबर पांढरे
लोकांच्या खालीं आणावे हा सारासार वि-
चार न पहतां तीनशें उमेदवारांतून आपले
नंबर वर आणले या वेडेपणास काय म्हणा
वें? या एकंदर हकिकतीवरून पाहतां हा
जो ठराव झाला तो अगदीं रास्त झाला
असेंच म्हटलें पाहिजे, पहा दरवर्षास नऊ
नऊ म्हटले म्हणजे किती युरोपियन लोकां
चें नुकसान होणार किती पांढरे लोकांचीं
घरें बुडणार याची काळजी कांहीं हिंदु
लोकांस आहे? बरें हिंदुलोकांस कामें थो-
डीं आहेत असेंही नाहीं, सडकेवर पांट्या
वाहाणें, पूल, बांधणें, नवीन रेलवे, चपरा
शी, बुटलेर, घोडेवाले बगिवाल्यांचीं वगैरे
कामें पाहूं गेल्यास किती सांपडतील बरें
बिचारे युरोपियनाची मात्र दशा त्यांजला
नोकऱ्या कोठें आहेत काय शंभर रुपायांपासू

न जागा मिळणार खर्चाकडे जर पाहिलें तर त्यांचा खर्च तरी थोडा आहे काय ?

(पुढें चालू.)

To,

*The Editor of the "Berar Samachar."*

Dear Sir.—The cold weather has become more chill than it was about two months ago. The Sudden and unexpected charge that has taken place in the weather has been the principal topic of conversation with every-body. From Yesterday afternoon we have had rain without any intermission and I am given to under stand that considerable damage will ensue to cultivation in general; inconsequence of this fall of rain. The sky or (if you will grant me your Editorial permission to express it poetically) the Vaulted firmament" has been entirely cloudy Yesterday and today and every thing in the "airy regions" wears the appearance of rainy season.

A Reading Room has been lately establised here in connection with the Kamptee Zilla School chiefly through the instrumentality of the Assistant Masters and the Scholars of the Senior division. The total absence of Such an institution in a place where commerce flourishes and civilization peeps out through every door of the Natives is surely a matter of great Shame especially to those who have shown so much forward ness in the general improvement of the town for so many years. To them Government have shewn their appreciation of the interest they have taken (of course to secure their good will) in public Matters by conferring high honors on them but it is regretful to observe that these grandies should have neglected such a principal object which tends so much to the improvement of society. It is true that the town being entirely of a military orgnization is over-flooded with speculators hat. I say, what has been done as yet by those who call themselves the admirers of English refinement in the cause of English education—the principal entrance for every-thing that is English ? The Central Provinces being nowadays quite destitute of a Native organ through which any one can expose each and otner short comings of the big gentry of this and many other important places to bring them to their sense of duty towards their fellow countrymen, I have sent this to you with no little regret. In the attempt for the formation of this Reading Room Mr. Balaji Vinayake Gokhley deserves due mention and I feel assured that his services to this infant society shall be most valuable. Our thanks are also due to Mr. G. Delahoyde who has displayed so much of his high spirit to encounter the various impedements that came in the way at the time of its organization.

The P. W. D. at Kamptee has also suffered much on account of the present reduction. The works of the Kanhan Bridge have been partly stopped and they are now progressing at a very Slow rate. The Superintendent Engineer office at Kamptee has been removed to Nagpoor where it will be amalgamated with the Chief Engineer's office so that many clerks shall be left without employments.

## पोच.

सत्यसदन—या नावानें आलिबाग येथें शिळा प्रेसावर दर आठवड्यांत एक पत्र निघूं लागलें आहे. त्याचें पत्रकर्त्यांनीं आमचेकडे दोन अंक पाठविले त्याचा मोठे अत्यानंदानें स्वीकार करतों, व त्यांस आम्ही आपलें पत्र मोबदला पाठवीत जाऊं. याजबद्दलचें जें लिहिणें तें फुरसतीनुसार लिहूं.

व्याकर्णसार अथवा प्रश्नोतर लघू व्याकरण ह्या पुस्तकाचे सखाराम बापु शेट दांडेकर हे कर्ते आहेत व त्यांनीं आम्हांस हे बूक नजर पाठविलें त्याचा आम्ही मोठे आनंदानें स्विकार करतों. हें टाइपावर छापून त्यांची किंमत घेणारांस सुलभ पडण्याकरितां दर प्रतीस दीड आणा ठेविली आहे. एकंदरींत या बुकापासून लहान मुलांस फार उपयोग होईल. व. स. मा.

## वऱ्हाड.

रा० रा० भास्कर महेश्वर, वणि जिल्ह्यात तिसऱ्या प्रतीचे अफिसीयेटिंग तहशीलदार नेमल्याचें लिहिलेंच आहे. यांस रेसिडेंट साहेब मेहेरबान होऊन त्यास पहिल्या प्रतिचे मानिस्त्रेटचा अधिकार दिला. व सन १८६९ च्या ८ आक्टाच्या ६६ कलमाप्रमाणें जे खटले येतील ते कमिट आपण आपल्या अखत्यारींत किंवा पोलिस मार्फतीनें पाठविण्याचा अधिकार दिला व ५०० रुपयापर्यंत दिवाणी मुकद्दमेही तपासण्याचा अधिकार दिला असें रेसीडेन्सी आडरवरून कळतें.

पुसद—या अठवड्यांत या प्रदेशांत रात्रंदिवस पावसानें झोड लाविली आहे त्यामुळें नद्या नाले हे तुडूंब भरून वहाताहेत. अशा या अकालीं पर्जन्य वृष्ठीनें गहू, हरभरे, लाख, मसूर ह्यां धान्यास धोका आहे असें म्हणतात इश्वरीय इच्छा.

मे. अलार्डाइस साहेब डेपुटी कमिशनर बुल्ढाणा ह्यांची स्वारी विलायतेहून येऊन आपले कामाचा च्यार्ज घेतला असें कळतें

मेहरबान मेंकंजी साहेब हे वाशीमास गेलें व तेथील प्रस्तुतचे आफिसीयेटींग कमिशनर मे. फिटीझरलड साहेब हे आपले कायमचे जाग्यावर बदनेरास लवकरच जाणार असें कळतें.

उमरावती येतील कमिशनर साहेबांचे हपीसांतील रा० रा० बापुजी वैजनाथ नायब शिरस्तेदार यानीं तिन महिन्यांची व जुडिसीयेल एक्स्ट्रा असिसटंट कमिशनरचे शिरस्तेदार रा० रा० गणपत पांडूरंग यानीं दोन महिन्याची, याप्रमाणें उभयतांनीं रजा घेऊन महायात्रेस गेल्याचें स. प्र. वरून कळतें.

### अकोला.

हवामान या आठवड्यांत अभ्रे वगैरे कांहीं नाहीं उष्णतेनें आपलें वर्चस्व उत्तरोत्तर चालविलें आहे पहाटेस थंडी बहुत गुलाबी थंडी पडत असते रोगराई कांहीं नाहीं,

मे. हार्डर्न साहेब डेपुटी कमिशनर हे खामगांवास गेल्याचें कळतें.

रा. रा. हणमंत खंडेराव बाळापूर येथील तहशिलदार हे आजारी असल्यानें डेपुटी कमिशनर साहेबांस भेटण्याकरितां आले होते. भेटीस येण्याचें कारण पेनशनाचा अर्ज करून पेनशन घ्यावें असें आहे.

### पुनार्विवाहास वर तयार.

एक चितपावन जातीचा ब्रह्मण वय सुमारें २९ गोत्र आत्रि हे विधवेशीं लग्न करण्यास तयार आहेत ह्यांस वऱ्हाडांत अकोलें जिल्ह्यांत कारकुनिची जागा आहे हे मराठींत चागले वाकनगार आहेत व ह्यास इंग्रजीचा अभ्याही थोडासा आहे ज्यास याजविषयींची माहिती पाहिजे असल्यास त्यानें अकोल्यास रा. रा. वामनराव प्रभाकर हायस्कुलचे असिस्टंटचे मास्तर यांजकडे किंवा वऱ्हाडसमाचार छापखान्यांत रा. रा. केशवराव नारायण कोल्हटकर यांजकडे मागीतल्यास मिळेल.

## वर्तमानसार.

### FRERE'S SPEECHES.

We are glad to learn that Mr. Balkrishna Nilaji Pitale of Bombay is Editing the speeches delivered by the Honorable Sir Bartle Frere the late illustrious Governor of the Bombay Presidency. We cannot, doubt that the Englightened Public, both European and Native, will highly appreciate the labours of Mr Balkrishna. These speeches were delivered by the popular Governor on several important accasions and contain matter which might be advantageously taken by our native Chiefs and Sirdars, as valuable lessons on Education, Politics, Social science, Legislation and other useful subjects.

We wish every success to the undertaking and hope that the work will soon come out.

फ्रीयर साहेब माजि गवरनर यांचे स्पीचेस—आम्हांस चांगल्या आधारावरून समजण्यांत आलें आहे कीं मुंबई मुकामीं बाळकृष्ण निळाजी पीतळे ह्या गृहस्थानीं वरील साहेबांचो इंग्रजी स्पिचेस ( भाषणें ) जीं झालीं तीं एकंदर करून छापण्यास प्रारंभ केला आहे. त्यांतील विशय फार उपयुक्त आहेत असें समजतें.

सदरील बूक लवकर छापुन तयार होईल अशी आशा आहे ह्या बुकांस थोर लोक व राजेरजवाडे ह्यानीं जरूर साह्य करावें अशी आम्ही त्यांस सीफारस करितों

### बहिष्कार.

रा. गणेश शास्त्री मालवणकर व हरि शास्त्री बर्वे यांस अनेक प्रकारच्या धर्मविरुद्ध आचरणांबद्दल, पौष वद्य ६ शनिवार, ता० २२ जानेवारी १८७० रोजीं मुंबईंतील शेंडे, माडकुळकर, प्रभृति ग्रामस्थ शास्त्री, भिक्षुक व गृहस्थ यांनीं बहिष्कार घातला. हा बहिष्कार श्रीभुलेश्वरीं काशी विश्वेश्वराच्या देवळांत घातला. दोन्ही आरोपित इसमांस त्यांजवरील दोषांचा जबाब देण्यासाठीं बोलावणें केलें असतांही ते आले नाहींत व अमर्यादेचा जबाब पाठविला. हें तेथें जमलेल्या ब्रह्मवृंदांस अतिशय वाईट वाटून त्यांनीं उभय शास्त्र्यांसही बहिष्कार घालण्याच्या कारणांची सादंत हकीकत तेथें जमलेल्या सुमारें १००० ब्राह्मणांस विदित करून सदर दोन इसमांस सर्व संमतानें बहिष्कार घातला व त्यांजबरोबर अन्नोदकादि हरएक प्रकारचा ज्ञाति व्यवहार कोणीं करूंनये केल्यास ते दोषी होतील असा निर्णय केला. या सभेस सर्व ब्राह्मण मंडळीस येण्याविषयीं पत्रें गांवांत वांटलीं होतीं व प्रसिद्धजागीं चिकटाविलीं होतीं.

* यांजकडे वऱ्हाडांतील सर्व शास्त्री भिक्षूक व ईतर सर्व लोकांनीं लक्ष द्यावें.

व. स. ए.

पुणें येथील तुरुंगांतून कांहीं दिवसामागें हजिम्स नांवाचा गोरा कैदी पळून गेला होता त्यास शिरवळास मोठ्या शिताफीनें धरला. ह्यानें तुरुंगांतून पळून जाण्यास अशी तजवीज केली कीं रात्रीस बारा वाजतां कैदी जेवण्यास सोडतात त्या वेळीं. पाठीमागल्या चौकांत दगडांचा ढीग पडला आहे त्याचे मागें भिंतीस लहान दरवाजा आहे त्याचें कुलूप तोडून बाहेर पडला तिकडून निघाल्यावर एक भाड्याचें घोडें करून महाबळेश्वरास जाण्यास निघाला. नंतर शिरवळास जाऊन रहदारीचे बंगल्यात उतरला. खर्च करण्यास पैसा नसल्या कारणानें बंगल्याचे मेसमनास बोलावून त्यांस जवळचें घड्याळ विकण्यास दिलें. त्या पूर्वीं एक गोरा कैदी तुरुंगांतून पळून गेल्याचे वर्तमान चोहोंकडे पाठविण्यांत आलें होतें त्याजवरून त्या मेसमनास संशय येऊन त्यानें झालेली हकीकत पोलिसास कळविली व पोलिसानें त्या गोऱ्यास पकडला. ज्ञा. प्र.

अविचारामूळें अतिदारुणअनर्थ—धूळेंतालूक्यांत मोराशेवडी म्हणून एक खेडें आहे. तेथील एका शेतकऱ्याच्या घरचीं ७ माणसें खळ्यांत होतीं. त्यांणीं आपल्या सोयीकरितां एक लाकडी छपर करून त्या छपरावर आजमासें ३।४ हजार गवत विक्रीकरितां रचून ठेविलें होतें हीं मनुष्यें तारिख १७ जानूआरी रोजीं म्हणजे ग्रहणाचे दिवशीं रात्रीं ग्रहणसुटल्यावर भाकरीवगैरे खाऊन छपरांत नीजलीं त्यामनुष्यानीं निजेतळीं दिवा विझवावा तो नाविझवितां तसीच निजलीं तों त्यांसगाढ निद्रालागली उंदरानें तीवात ओढून नेऊन त्याच्यायोगानें त्यां छपरास अग्निस्पर्शहोतांच एकदमडोंब होऊं नगेला तीं मनूष्यें गाढ निद्रेंत असल्यामूळें त्यांस जागनयेऊन तेंसर्व गवत व छपर त्यांचे अंगावर कोसळून त्या ७ इसमांपैकीं ६ असामी अनोठारझाले व १ वृद्धबाई अर्धांग भाजून बाहेर पडली ती हल्लीं इस्पीतलांत आहे. कायहा अनर्थ !!!

पुनर्विवाहासतयार—एक चितूपावन जातीची १३ वर्षांची बाल विधवा आपल्या पालकांच्या संमतीनें पुनार्विवाहास तयार आहे. हिचा पूर्वपती ८ व्या वर्षी मृत झाला असून हीला रजोदर्शन अद्यापि झालें नाहीं. वर कुलीन, साधारण विद्वान, नीतिमान आणि २९ वर्षांपेक्षां कमी किंवा त्या सुमारानें वयाचा असावा. वधूच्या माहेरचें गोत्र शांडिल्य आहे. सदरहु बालेशीं जे गृहस्थ विवाह करण्यास तयार होतील त्यांस चाकरीची गरज असेल तर मराठी कारकुनीची जागा दरमाहा २९ रुपयांची पांच वर्षें पर्यंत तयार आहे. विशेष माहिती पाहिजे असल्यास " महाराष्ट्रमित्र " " ज्ञानप्रकाश " व " अरूणोदय " या पत्रांच्या एडिटरांकडे गेलें असतां मिळेल.

**विलक्षणजीव.**—रायबरेली एथें एका बाईस मूल झालें. त्यास दोन डोकीं, तीन हात व तीन पाय आणि बाकीचे शरीर एकच होतें. हें मूल पाहून आई भिऊन घाम सुटून आजारी झाली.

**रंगून.**—येथून आलेल्या सरकारी वर्तमान वरून असें समजतें कीं एथील मोठे तुरूंगांवरील कित्येक कैद्यांनीं दंगा करून मुख्य अंमलदारास ठार मारलें. व ज्या कैद्यानीं हा दंगा केला त्यांस रांगेनें ऊभे करून फांशीं दिले.

खा० वै०

मुंबई ग्याझिटवरून असें समजतें कीं, श्री० रा. रा. रघुनाथराव विठ्ठल उर्फ दादासाहेब विंचुरकर यांनीं मे. ओव्हन साहेब नासिक एथील आक्टिंग कलेक्टर यांचे मार्फत चिफ सेक्रेटरी ओफ गवरनमेंट यांस असें पत्र पाठविलें आहे कीं, ड्यूक आफ एडिंबरो यांचे स्मरणार्थ पुणें एथें बुधवारांत लायब्ररीचे वरचे मजल्यावर एक घड्याळ लावण्याबदलची परमाणगी मागितली आहे त्याप्रमाणें सरकारांतून तसें करण्याविषयीं ठरविलें आहे याप्रमाणें आमचे सर्व जहागिरदार लोक पाहून कित्ता घेतील अशी आशा आहे.

---

खामगांव ता० १४ जानेवारी १८७०

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

ता० १४ मिनहुरोजीं सायंकाळीं येथील इंग्रजी मराठी, उडदु व मराठी मुलींची शाळा यांतील उत्तम विद्यार्थ्यांस वार्षिक बाक्षिसें वांटण्याचा समारंभ येथील इंग्लिश शाळागृहांत झाला. त्यावेळीं मेझर व मिसिस मीड, क्यापटन् आणि मिसिस ओडहौस, मिस्तर आणि मिसेस डइल्सन् मिसिसकरी, मिसेस ठिंडलू, मि. मेकडालन, मेशरस, सोकी, आईझाट, थ्याकर, मेगनाटन, बुथ, उईलचर, क्लिनी आणि दुसरे गांवातील शेट साहुकारादि करून सुमारें २०० गृहस्थ या प्रसंगीं आले होते. अध्यक्षस्थानीं मेझर मीड यांणीं सुशोभित केल्यानंतर मे० डायरेक्टर साहेब यांणीं एक सुरस निबंध वाचला त्यांतील साराश खालीं लिहिल्याप्रमाणें.

मि० चेरमन, लेडीज आणि सभ्यगृहस्थहो आपण आजरोजीं या स्थळीं आलां आहां त्याजबद्दल मी आपला मोठा आभारि झालों आहें. ह्या प्रांतांत ज्या ज्या ठिकाणीं मी गेलों त्या त्या ठिकाणीं मजला असें दिसून आलें आहे कीं, इकडील विद्याखात्यास चोहोंकडून चांगली मदत मिळत आहे. आणि गेल्या दोनवर्षांत युरोपियन व एतद्देशीय गृहस्थ लोकांकडून ह्या खात्यास जी मदत मिळाली आहे तिचें वास्तविक स्वरूप मुंबई येथील वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध झालेंच आहे तें पाहून मजला अत्यानंद होतो. सालगुदस्तां कांपिटिटिव परिक्षेंत येणाऱ्या मुलांस सर्व प्रकारची सोय करून देवविल्यास ह्या प्रांतांतील लोकांकडूनजो उदार आश्रय देण्यांत आला तो असा कीं ज्यांचा कित्ता घेण्यास दुसऱ्या प्रांतांतील लोक एकमत होऊन झटत आहेत. ही एक वाखाणण्यासारखी गोष्ट आहे ह्याशिवाय कामिशन खात्यांतील आफिसर लोकांकडून जी मोठी मदत मिळाली आहे, मिळत्ये, व मिळाली पाहिजे हें मजला येथें सांगणें नको तरी इकडील विद्याखात्याला शाळागृहें वगैरे नां घेण्याचे कामांत अवश्य मदत मिळाली पाहिजे तिसुद्धां क्रमाक्रमानें पुरविली जाईल बजातही आहे, आपण ज्या जागीं एकत्र जमलों आहों हें ह्या शहरचे नवीन शाळागृह आहे हें सर्वांस माहीत असेल व तें क्यापटन ओडहौस साहेब यांचे देखरेखी खालीं तयार झालेलें आहे. येथील लायब्ररीही यांणींच उत्तम दशेश आणली आहे सार्वजनिक कामांत ते नेहमी पुढारी असतात आतां येथें जी मुलींच्या शाळा गृहाची व हिंदुस्थानी मुलांच्या शाळागृहाची आवश्यकता आहे ती ते लौकरच पुरवितील अशी आशा आहे. येथील हिंदुस्थानी स्कुलचे स्कुलमास्तर हे चांगले असल्या मुळें त्यांच्या शाळेंत बऱ्याच मुली जमल्या आहेत याजकारितां मी अशी आशा कारितों कीं, जशी मराठी मुलींची शाळा आहे तशी मुसलमानीं मुलींची शाळा येथें लवकरच होईल, महाराज, हिंदुस्थानांत स्त्रिशिक्षणाचे काम फार नाजूक आहे तरी तें येथील विद्याखात्याचे अधिकाऱ्यानें अशा रितीनें चालविलें आहे कीं, आपल्या कर्तव्य कर्मांपैकींच हें एक कर्म आहे असें आतां येथील लोकांस वाटूं लागलें आहे व ते असें मानितात कीं मुलांच्या शाळांतशा मुलींच्या शाळा झाल्या आहेत आणि मुलिंच्या शाळांस निमें मदत गांवकरी लोकांकडून मिळावी व निमें सरकारांतून मिळेल असा ठराव लवकरच होणार आहे व असें झालें म्हणजे ह्या शाळांकडे लोक विशेष लक्ष पुरवितील ह्यांत संशय नाहीं.

स्त्रिशिक्षणाविषयीं मी आज थोडेंसें विस्तारानें बोललों आहे व आपणास दिसून येईल कीं, आपल्या विद्याखात्यांतील मोठ्य पदवीच्या नटीव आफिसरांच्याच मदतीनें हें काम इतक्या दशेस येऊन पोंचलें आहे व हें काम आणखी पूर्ण दशेस यावयाचेंच आहे तरी हल्लीं कोणत्या प्रकारचें चाललें आहे हें खालील गोष्टीवरून आपल्या सहज लक्षांत येईल.

सभासदहो मजला प्रसीद्ध रितीनें म्हणण्यास फार आनंद वाटतो कीं स्त्री सिक्षणाचें अस्थीत्व आमच्या विद्याखात्यांतील डे० ये० ईन्स्पेक्टर व सर्व मिडल क्लास स्कुलचे हेड स्कुलमास्तर याचे लोकांशीं सौजन्य असल्या मुळें व त्यांच्या विद्वते मुळेंच प्राप्त जाहले आहे व हें प्रदर्शित करण्यास मजला योग्य शब्द आढळत नाहींत.

गेल्या फेब्रूआरीत जेव्हां मि सिकंदराबादेस गेलों होतो तेव्हां आपल्या मेहेरबान रेसिडेंट साहेबांच्या पत्नीनें, स्त्री सिक्षणाच्या कृत्यास आधिक उत्तेजन द्यावें असा आपला अपला मानस प्रदर्शित केल्या वरून मि त्यांस सांगीतलें कीं हा आपला हेतु फार स्तुत्य असून तो लोकांस फार आवडेल असें मला वाटतें. त्यावरून इकडील जाणत्या लोकांस कळविल्यावर त्याणीं ही त्यास मान्यता दिल्याचे मि त्यांस कळविल्यावर वऱ्हाडांतलि मुलींच्या दर येक शाळेंतलि येक येक उतम विद्यार्थ्यास आपल्या नावाचे ऐकैक चांदिचें पदक बक्षीस देण्याचें ठरउन त्याजवर “ विद्या ददाति विनयं ” ही संस्कृत म्हण ( मोठा ) कोरविली आहे.

आज रोजी येथील इं० मराठी शाळेत सर्व शाळांतील मुलांस व मुलींस बाक्षिसें वांटण्याचा समारंभ आहे. व वर लिहिलेल्या पदकां पैकीं येक पदक येथील हुशार मुलीस ह्याच प्रसंगीं द्यावयाचे मला योग्य दिसत आहे.

मिसेस सांडर्स यांच्या पदका सिवाय व सरकारी बाक्षिसा शिवाय मुलींस खण देण्या करितां शेठ गोविंद लाल चंदुलाल दलाल याणी १० रुपये दिल्हे आहेत. व इं० मराठी स्कुलांतील विद्यार्थ्यां पैकीं उतम मराठी भाषा जाणणरास बक्षिसें देण्या करितां नरसोबाची वाडी येथील नारायण स्वामिचे सिष्य दत्तदास बोवा याणीं मोठ्या औदार्यानें दहा १० रुपये दिल्हे आहेत.

येणेंप्रमाणें भाषणानंतर मिसीस ओडहौस यांणीं आपल्या स्वहिस्तानें मुलींच्या गळ्यांत पदकघालून इतर मुलींस बक्षिसें वांटलीं, व अध्यक्षानीं इं. मराठी व हिंदुस्थानीं स्कुलांतील मुलास बक्षिसें वांटलीं नंतर आत्माराम शास्त्री यांनीं थोडेंसें संभाषण केल्यावर मेझर मिड सहिब यांणीं संभाषण केलें. त्यांतील सारांश खालीं लिहिल्याप्रमाणें.

कांहीं वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांतील कित्येक भागांपेक्षां विद्यावृद्धीचे कामांत हा वऱ्हाड प्रांत फारच यागें पडला होता. परंतु आतां दुसऱ्या प्रेसिडेन्सितलि मोठमोठ्या शहरांत जसा विद्येचा प्रसार झाला आहे तसा ह्या प्रांतांतही अल्पकाळांत झाला आहे असें मला वाटतें ह्या सर्वांस कारणीभूत आपले डायरेक्टर साहेबच आहेत.

सभासदहो आपणास माहीतच असेल कीं, मी नुकताच येथें हैदराबादेहून आलों आहें व ज्या सुजन स्त्रिची ( मिसेस सांडर्स हिची ) आपल्या डायरेक्टर साहेबांनीं जी स्तुति केली आहे तीस त्या व त्यांचे प्रियपाति किती योग्य आहेत हें मला स्वानुभवावरून माहीत आहे व त्यांचे प्रत्यक्ष उदाहरण मिसेस ओड हौस यांनीं तिकडून आलेलें पदक देऊन प्रगट केलें आहे आतां जगानियंत्या परमेश्वरास हीच प्रार्थना आहे कीं, ह्या खामगांव शहरांत विद्यावृद्धि होवो. व असें होण्यांत आपण सर्वजण अंतःकर्णपूर्वक इच्छित आहोंत.

येणेंप्रमाणें संभाषण होऊन पानसुपारी अतर गुलाब वगैरे झाल्यावर सभा विसर्जन झाली.

एक मित्र.

---

तारीख १९ माहे जानेवारी सन १८७०

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. आपल्या वऱ्हाडच्या प्राचीन व अर्वाचीन स्थितींत फार अंतर पडत चाललेंआहे ह्यादेशांत आपल्या दयाळू इंग्रजसरकारानें शाळा खातें स्थापन केल्यापासून ह्या दोनतीन वर्षांत तर अतीशय सुधारणा झाली व होत आहे. ह्या विषयीं उदाहरणें पदोपदीं आढळतात. मोमोठाल्या शहरांत तर काय परंतु खेड्या पाड्यांत ही सुधारणुकीचीं कृत्यें नजरेस पडत चाललीं आहेत यास उदाहरण—

खोलापूर हा गाव उमराती तालुक्यांत आहे. एथें चालू महिन्या पासून दर रविवारीं एक सभा भरत असते. तिला “ गांवसुधारणूकीची सभा ” असें म्हणतात सदरहु गांवची सुधारणा अशी व्हांवी, व तेथील रहाणाऱ्यांच्या कल्याणार्थ कोणत्या कोणत्या गोष्टी अवश्य असाव्या ह्या आणि तत्संबंधीं इतर विषयांवर ह्या सभेंत संभाषणें व वाद विवाद होतात त्याच व दुसऱ्या विषयांवर निबंध ही वाचले जातात. ही सभ स्थापन करण्यांत एथील चिफ कान्स्टेबल शेख हैदर व स्कूलमास्तर विष्णुहारि जोशी याणी पराकाष्ठेचे श्रम घेतले. ईश्वर करो आणि उत्तरोत्तर ह्या सभेचा उत्कर्ष होवो; म्हणजे त्यांच्या श्रमाचें सार्थक होईल.

एडीटर, महाराज वरील चार ओळी आपणाकडेस पाठविल्या आहेत व अशी आशा आहे कीं त्यांस आपल्या येत्या सुंदर पत्रीं जागा मिळेल.

आपला मीत्र एक खोलापूरस्थ

क्ष

---

**नोटिस**—तिर्थरूप रा० धवापा शेट मुंजाळ वस्ती दुकान पेठ बाळापूर याशी विठोबा सेट मुजाळ वस्ती दुकान पेठ बाळापूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचा व आमचा वडिलोपार्जित दुकानदारीचा व्यापार आजपर्यंत एकसारखा चालत आला असून सुमारें आठ नऊ महिनें झाले कांहीं गृहसंबंधाच्या कारणांमुळें विभक्तपणा करणें जरूर पडलें व एकंदरींत दुकानाच्या व घराच्या सामानाचा व जिंदगी पैशाच्या वांटण्या पंच मार्फत व्हाव्या असें इमानें इतबारें ठरलें व त्याप्रमाणें एकंदर माल दुकाने व कुळें वांटून द्यावीं असेंही पंचानीं सांगितल्या प्रमाणें वांटणी झाल्यावर एकंदरींत पावत्या होतेसमयीं वही खात्यांत पाहतां सुमारें बऱ्याच सालच्या वह्या आमच्या दृष्टीस न पडल्या कारणानें आम्हास माठा संशय उत्पन्न होऊन नंतर तपास करितां असें समजलें कीं, रोख नक्त रक्कम जी घरांत शिल्लक होती तिचा कांहींच भाग आम्हास न मिळतां फक्त वर जी रकम होती तिचा मात्र कांहीं भाग आम्हास मिळाला व बाकीचा ठिकाणच नाहीं हें अगदीं जेव्हां समजलें तेव्हां आम्ही पावत्यांवर सह्या वगैरे होतेसमयीं सदर्हू तकरार आम्हीं तुम्हास कळविली असतां तुम्ही सांगितलेंत कीं, जी रकम तुम्हांस समजली नसेल तिचा शोध लावावा असें तुम्ही आम्हास एकदांच सांगून त्यावर येथील दुकानदार कन्हय्यालाल देवलाल यांच्या दुकानीं पुनः सांगितलें कीं, सदर्हू रकमेचा विचार करून नंतर पावत्या वगैरे होतलि त्यास आज साहा माहिनें झाले परंतु आपण कांहींच निकाल केला नाहीं. व एकंदर पावतीही विभक्तपणाची नाहीं तर हें आपसांत बरें नाहीं करितां या नोटिशीनें कळवितों कीं, ही नोटिस तुम्हांस पोचल्या दिवसापासून १५ दिवसांचे आंत एकंदर गुप्त रकमेचा व पावत्यांचा निकाल करून या नोटिशीचें उत्तर तुम्हास काय देणें असेल तें द्यावें. नाहीं पेक्षां आम्ही एकंदर तपास करून तपासाअंतीं जी रकम आम्हास समजलीव समजेलती व या नोटिशीस जो खर्च लागला तो असे एकदम जी रकम होईल त्यासुद्धां आम्हास दुसरी तजवीज करावी लागेल आपसांत बेबनाव नव्हावा म्हणोन ही गुप्त नोटिस दिली आहे कळावें तारीख १८ माहे जानेवारी १८७० मुकाम पेठ बाळापूर.

( सही ) विठोबा कृशनप्पा मुंजाळ
दुकान बाळापूर.

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केले.